कट्टर

सुहास शिरवळकर



कट्टर

सुहास शिरवळकर

एक

प्रत्येक पाऊल उचलून पुढे टाकताना त्याला पुनर्जन्माचा प्रत्यय मिळत होता; आणि आपली चिकाटी पाहून त्याचा तोच आश्चर्यचकित होत होता.

पायाखाली तप्त वाळवंट होतं.

आकाशात रखरखीत सूर्याचा गोळा.

वाळवंटातली उष्णता सरळ शरीरात.

एकवटल्यासारखं शरीर वाफांनी फणफणलेलं.

आणि तो आपला चालतोय... अनवाणी!

पायांत साखळ्या. हात मागे करकचून आवळलेले.

तापानं शरीर तडकायला लागलेलं. मेंदूत घणाचे घाव.

कोणत्याही क्षणी तो कोसळला असता;

आणि संपला असता.

म्हणूनच तो चालत होता.

भाजल्यामुळे पायाला फोड आले होते. तळपायातून रक्त ठिबकायला लागलं होतं. एकदा

नाकाचा घुळणाही फुटला होता. हात मागे बांधलेले असल्यामुळे त्याला रक्त पुसतादेखील आलं नव्हतं. ते तसंच तोंडावर, हनुवटीवर सुकलं होतं.

हो, कैदेतून पळाला होता तो!

जगला-वाचला, तर मौलवीचा त्याला सूड घ्यायचा होता. तेवढ्याकरता तरी त्याला जगायचं होतं.

आणि डोक्यावर गिधाडं घिरट्या घालायला लागली होती. तो कधी कोसळतो, ह्याची वाट पाहत होती.

म्हणूनच तो जिद्दीनं चालत राहिला होता.

नाहीतर, दोन दिवस पोटात अन्नाचा कण नाही, सकाळपासून पाण्याचा थेंब दृष्टीस पडलेला नाही; अशा परिस्थितीत, अंगात ताप असताना इतकं चालणं त्याला कधी जमलंच नसतं.

पहाटे तीनपासून चालत होता तो!

आता सूर्य माथ्यावर होता. दुपारचे बारा वाजले होते.

तब्बल नऊ तास तो सतत चालत होता. भेरी वीस-बावीस मैल मागे टाकून त्याने एक विक्रमच प्रस्थापित केला होता.

शेकडो वेळ थांबण्याचा मोह त्याला झाला होता. नको ते जिणं! त्यापेक्षा गिधाडांच्या स्वाधीन व्हावं, असं प्रकर्षानं वाटलं होतं; आणि या विचारावर मात करून तो अव्याहतपणे चालत राहिला होता.

थांबलो की संपलो!

पुन्हा चालता येईलच, असं सांगता येत नाही.

शरीरात प्राण असेपर्यंत चालत राहायचं. मरण आलं, तर ते उभ्या-उभ्याच येईल – मग मृत देह कुठेही कोसळला, तरी पर्वा नाही.

एका तंद्रीतच तो चालत होता. आपण कुठे चाललो आहोत, ह्याचं-देखील त्याला भान नव्हतं. पायाला वळण लागल्यामुळे पाय पुढे पडत होते.

◇◆◇

आपल्या घराच्या भिंतीला टेकून बसलेला दीदारसिंग एकटक त्या

तरुणाकडे पाहत होता. आणि त्याच्या आश्चर्याला पारावर उरला नव्हता. त्याच्या दृष्टीनं सत्तावीस मैलांचा हा विस्तीर्ण वाळवंटी तुकडा पायी पार करून येणारा अजबच होता. त्याच्या झोकांड्या जाणं साहजिकच होतं.

तो तरुण लडखडत पुढे आला, तसं त्याला जाणवलं, त्याचे हात अजिबातच दिसत नाहीत.

हे असं कसं ?

तोल सावरताना तो हात कसे हालवत नाही ?

मग एकदम त्याच्या डोक्यात कल्पना चमकली – त्याचे हात मागे बांधलेले असावेत.

दिवस कलायला लागल्यामुळे नीट दिसत नव्हतं.

दीदारसिंग ताडकन् उभा राहिला; आणि डोक्यावर हात आडवा धरून किलकिलत्या डोळ्यांनी त्या तरुणाचं बारकाईनं निरीक्षण करायला लागला.

अन् त्याच वेळी त्या तरुणाच्या डोक्यावर त्याला अंधुक सावली फडफडताना दिसली. त्याने दचकून वर मान केली.

गिधाड !

काय घडतंय, ह्याचा त्याला ताबडतोब अंदाज आला. तो चटकन मागे वळला, एका झेपेत दरवाज्यातून आत गेला; आणि भिंतीवर टांगलेली लांब पल्ल्याची रायफल घेऊन बाहेर आला.

तो तरुण कसाबसा उभा होता, त्याच्या हालचाली क्वचितच होत होत्या; आणि एक गिधाड आता त्याच्या दिशेनं सुळकांडत होतं.

दीदारने घाई-घाईनं नेम धरला. बंदुकीचा चाप दाबला.

वातावरण दणाणलं.

नेम चुकणार होताच; पण त्या आवाजानं गिधाड मात्र पळून गेलं.

बंदुकीच्या आवाजानं तरुणाला माणसांची चाहूल मिळाली. आपण माणसांत आलो, या सुरक्षित जाणिवेनं बहुधा त्याच्या मनावरचा ताण एकदम ऑफ झाला.

सैलावत तो खाली कोसळला.

◇◆◇

दोन तरुणांना मदतीला घेऊन दीदार वाळवंटाच्या दिशेनं धावला. ते त्याच्या जवळ पोहोचले, तर तरुण शांतपणे पालथा पसरला होता.

एकाने त्याला उताणा केला.

''दीदार, ह्याला सडकून ताप भरला आहे.''

''पण जिवंत आहे ना ?''

दुसऱ्याने त्याचा श्वास चालू असल्याची खात्री करून घेतली.

''हो.''

''तेच खूप झालं ! सत्तावीस मैलांचं वाळवंट असं हात-पाय बांधलेल्या अवस्थेत या माणसाने पार कसं केलं असेल, तेच मला नवल वाटतंय !''

''ह्याला गोरक्षकडे न्यायचा का ?''

''छे ! माझ्या घरात नेऊन ठेवू. गोरक्षलाच बोलवून आणावं इकडे. गगन, तू असं कर .... गोरक्षला बोलवून आण. त्याला तरुणाची हालत नीट सांग; म्हणजे तो त्याची औषधं वगैरे नीट बरोबर घेईल. तोपर्यंत मी आणि गोली त्याला माझ्याकडे घेऊन जातो.''

गगन नावाच्या तरुणाने मान डोलावली. शर्यत जिंकण्याच्या इराद्यानं स्पर्धकाने जीव तोडून पळावं, तसा तो धावत सुटला.

दीदार आणि गोलीने त्या अनोळखी तरुणाला नीट उचलला; आणि दीदारच्या झोपडीत एक चारपाई होती, त्यावर आणून निजवला.

दीदारने त्याच्या बेड्या निघू शकतात का, म्हणून प्रयत्न करून पाहिला. ते जमेना, तसा गोली पळत-पळत लोहाराकडे गेला. त्याच्याजवळून त्याने हातोडा मागून आणला. तोपर्यंत गोली काय करतोय्, ते लक्षात घेऊन दीदारने स्टोव्ह पेटवला होता; आणि बेशुद्ध माणसाला खाटेच्या कडेच्या कुशीवर झोपवून तो त्याचे पाय स्टोव्हवर धरून बसला होता.

पंधरा मिनिटात पायांच्या बेडीमधली साखळी तापून लालबुंद झाली.

गोलीने हातोड्याचा एक ठोका मारताच साखळी अक्षरश: तुटली. मग हाताच्या दोऱ्या कापून त्यांनी त्याला झोपवला. त्याच्या अंगावर पांघरुणं टाकली.

तेवढ्या वेळात गोरक्षला घेऊन गगन घाई-घाईनं दीदारच्या झोपडीत शिरला.

''त्याची पांघरुणं काढा.''

हातातल्या दोन कातडी बॅगा जमिनीवर ठेवून गोरक्ष म्हणाला.

पुन्हा त्याची पांघरुणं काढण्यात आली.

''त्याचे कपडे उतरावायला मदत करा जरा.''

तिघं त्याला मदत करायला लागले.

''फाडूनच टाकू या. लक्तरंच झाली आहेत.'' गोली म्हणाला; आणि त्याने सरळ कपडे टरकवायलाच सुरवात केली.

''बापरे!''

''का, भाजलंय् ना खूप?''

''सगळं शरीर उन्हानं होरपळलं आहे त्याचं. तडे गेलेत!

''जगेल का?''

''बघू आता. त्याची इच्छा-शक्ती चिवट दिसते. नाही तर या हालतमध्ये वाळवंट पार करणं कोणालाच शक्य झाल नसतं.''

गोरक्षने त्याला पालथा-उताणा करून त्याचं संपूर्ण शरीर तपासलं. मग एका बॅगेतून एक मोठा शिसा बाहेर काढला.

''एक भांडं घे.''

दीदारने ॲल्युमिनियमचा मोठा वाडगा त्याच्यासमोर ठेवला. गोरक्षने हातातला सगळा शिसा वाडग्यात ओतला.

पार डोक्यातून पायाच्या तळव्यापर्यंत हे लावा. तोपर्यंत मी इतर तयारी करतो.''

तिघंजण वडलांची सेवा करण्याच्या श्रद्धेनं त्याला ते मिश्रण लावायला

लागले. गोरक्ष एका मोठ्या सहाणेवर काही मुळ्या उगाळायला लागला.

त्याचं काम उरकेपर्यंत त्याने पाच-सहा प्रकारचे लेप आणि चाटणं तयार केली. त्यातली काही त्याला चाटवायची होती; काहींचा डोळ्यांवर लेप द्यायचा होता. एक लेप डोक्यावर थापायचा होता. दीदारला त्याने सगळ्या सूचना दिल्या. मग एक तेलाची बाटली आणि औषधाचा एक शिसा त्याच्या हातात देऊन तो म्हणाला,

"रात्री त्याला ती चाटणं चाटवा. सकाळी तो शुद्धीवर आला; किंवा किमानपक्षी जिवंत असला, तर तो वाचू शकेल. नाही तर मेलेलाच असेल! मी सकाळी सहाला येतो. त्यापूर्वी शुद्धीवर आला, तर त्याला बाटलीतलं निम्मं औषध प्यायला लाव. आणि त्याच्या कानांत, नाकात, डोळ्यांत या तेलाचे चार-चार थेंब टाकत रहा."

गोरक्षने आपलं सामान उचललं. तो निघून गेला.

"गोली, तुम्ही थांबता का?"

"रात्री? हो ऽ."

"आपण पत्ते तरी खेळत बसू. त्याला इतका वाचवलाय्, तर आता त्याची काळजी घेतली पाहिजे. मेला, तर उचलून फेकून देऊ; पण जिवंत आहे, तोपर्यंत प्रयत्न करीत राहिलंच पाहिजे."

"ठीक आहे. मी जेवण करून येतो. तोपर्यंत गगन इथे थांबेल. मग तो जेवण करून येईल."

"येताना तुझ्याकडचे पत्ते घेऊन ये."

"माझ्याकडच्या पत्त्यांत तीन पानं नाहीत रे! सोनीच्या हाती पत्ते लागले, तर तिने पानं पार फाडूनच टाकली."

"मी आणतो."

"ठीक आहे."

गोली निघून गेला.

गगन आणि दीदार त्या तरुणाच्या पायथ्याशी बसून राहिले.

तीन अनोळखी तरुण आपल्याकरता खस्ता काढतायत, याची त्या तरुणाला कल्पना नव्हती. ती आपला जीवन-मृत्यूच्या सीमेवर रेंगाळत होता.

इस पार, या उस पार ?

त्याचा अजून निर्णय होत नव्हता.

आणि कोणाच कोण तो; पण हे मात्र त्याच्याकरता उगाच काळजीत पडले होते.

हेच ते माणुसकीचे ओलावे ...

ज्यावर राजस्थानचं शुष्क वाळवंटी जीवन तग धरून होतं.

◇◆◇

गोलीने पत्ते पाहिले. तोंड वाकडं केलं.

आज त्याचं लक्ष नव्हतं. तोच सारखा हारत होता. मधून-मधून दीदारही हारत होता; पण तो डाव गोलीचा होत नव्हता. गगन फॉर्ममध्ये होता. प्रत्येक डाव दीदार किंवा गगनने घेतला होता.

गोलीने अचानक पत्ते फेकले. तो ताठरला.

"ए! हे काय ?"

"असं नाही चालायचं. भिकार डाव आला म्हणून काय झालं ?"

"गाढवांनो–"

पुढे काही बोलण्याऐवजी त्याने चारपाईकडे बोट दाखवलं. दोघांनी चमकून पाहिलं. त्यांच्या हातांतले पत्ते आपोआप फेकले गेले.

तो शुद्धीवर आला होता; आणि त्याच्या शरीराची वळवळ सुरू झाली होती.

एकमेकांकडे पाहत तिघं चारपाईभोवती जमा झाले.

तरुण अस्पष्टपणे कण्हत होता. त्याचे डोळे अजून मिटलेलेच होते.

"ए .... ए ऽ .."

"शुत्-शुत् ....!"

"अं हं, अजून ग्लानीत आहे तो."

''पण गोरक्षनी सांगितल्याप्रमाणे आपण त्या शिसातलं निम्मं औषध त्याला प्यायला लावू.''

''अरे! वेड लागलं का तुला?''

''का, त्याने तसंच सांगितलंय.''

''होऽ, पण अजून डोळे उघडता येत नाहीत त्याला–''

''ते कायमचे मिटू नयेत; म्हणून तर औषध पाजलं पाहिजे.''

''बघ बुवा, तू म्हणत असशील, तर आपण प्रयत्न करू.''

''गगन, तो ग्लास घे रे. गोली, त्याचं तोंड उघड.''

दीदारने शिसाचं बूच काढलं.

खोलीत एक कडवट, उग्र दर्प दरवळला.

बुद्-बुद्-बुद्-बुद्.

''अरे .... बास-बास-बास-बास! .... कितीऽऽ? त्याला नाही पिता आलं, तर वाया जाईल ना सगळं!''

''पील, तो नाही त्याचा बाप पील! जगायचंय् त्याला!''

दीदारने ग्लास तरुणाच्या तोंडापाशी आणला.

''अजून जरा फाकता येत असेल, तर बघ.''

गोलीने दोन्ही हातांची बोटं आणखी थोडी ताणली.

ओठांचा तडकलेला कोपरा थोडा टरटरला. त्यातून रक्त आलं.

''अस्सं! एकदम फट तरी; नाहीतर एकदम दरी तरी! जबडा फाडशील अशानं त्याचा.'' दीदार खवळून म्हणाला.

दीदारने अगदी काळजीपूर्वक एक घोट त्याच्या तोंडात ओतला.

तो थोडा वेळ तसाच साठून राहिला, मग गुटुक्कन गिळला गेला.

दीदारचे डोळे चमकले. त्याने दोघांकडे पाहिलं. मग तो हळू-हळू त्याला औषध पाजत राहिला.

अर्धा शिसा संपायला वीस मिनिटं लागली.

''दीदार, ते तेल काना-नाकात घालायचं ना?''

"ते जरा वेळानं करू. त्याला फार त्रास नको द्यायला."

"ठीक आहे. पत्ते खेळू या आता ?"

"हं, चला, मघाचा डाव पुढे चालू करू."

"तो नको – तो नको."

"का? खराब पानं आली होती का ?"

"नाही, पहिला डाव देवाला देतात, तसा तो डाव आपण नव्या तरुणाच्या वाचण्याला देऊन टाकू !"

"तू पक्का बदमाश आहेस गोली !"

गोलीने घाई-घाईनं सगळे पत्ते एकत्र केले. मग हसत-हसत तो पत्ते पिसायला लागला.

गगनला त्याचा तो चावटपणा अजिबात आवडला नव्हता. कारण, त्याला फार सुंदर पानं आली होती; पण पत्ते मिसळले गेल्यामुळे तो गप्प राहिला.

◇◆◇

परत तीन-चार डाव होईपर्यंत सगळे अस्वस्थच होते. सारखं वाटायचं, जागा झाला तो ! उठला ! परत-परत त्याच्याकडेच लक्ष जायचं.

मग ते एकदम पुतळ्यासारखे ताठ होऊन एकटक त्याच्याकडे पाहत राहायचे.

कोणीतरी वैतागून म्हणायचा ....

"चला-चला ! .... खेळा !"

मग पुन्हा खेळ सुरू व्हायचा.

पण त्याच्यावर इतकं लक्ष केंद्रित झालेलं असायचं, की हमखास कोण खेळलं आणि त्याने काय पान टाकलं, ते झटकन् लक्षात यायचं नाही.

"वैतागच आहे !"

"कसला ?"

"तो आपला शांत झोपलाय आणि आपणच उगाच त्याच्याकरता

जागे राहून खेळत बसलोय्! काही अर्थ आहे का त्या खेळण्याला?''

''ए, आता नीट लक्ष दे रे! काय पानं टाकतोस तूऽ!''

''तूच मध्ये खेळलास.''

''मला वाटलं, ह्याने पान टाकलं!''

''उठला!''

लगेच नीट खेळण्याचं विसरून तिघांनी त्याच्याकडे पाहिलं.

तो खरंच जागा झाला होता. किलकिल्या डोळ्यांनी, आश्चर्यानं खोलीवरून नजर फिरवत होता.

तिघं त्याच्याभोवती जमा झाले.

''बरं वाटतंय् का आता?''

''ताप उतरलेला दिसतोय.''

''आम्ही काय बोलतोय, ते ऐकू येतंय ना?''

सर्व प्रश्नांकरता त्याने एकदाच होकारार्थी मान डोलवली.

''मौ... ल... वी...?''

त्याने भित्र्या स्वरात विचारलं.

तिघांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

तो भेरीच्या मौलवीच्या कैदेतून सुटून आला होता.

मौलवीच्या छळांच्या - शौर्याच्या कथा आसपासच्या भागात मशहूर होत्या. त्या ऐकून कित्येकदा त्यांचंही रक्त कधी गोठलं होते; तर कधी खवळून उठलं होतं.

''तू सुटलाय कसा पण....?''

तेही एक आश्चर्यच होतं.

मौलवीचा कैदखाना म्हणजे अक्षरश: नरक! एकदा माणूस आत गेला, की त्याचं शवच बाहेर पडायचं – तेही अस्थिपंजर झालेलं.

तरुण भकासपणे हसला.

त्याला सगळं आठवत होतं; पण बोलायला त्याच्यात त्राण नव्हतं.

सारं बळ एकवटून तो कसंबसं इतकंच म्हणाला –

"मला... सूड उगवायचाय..."

तेवढ्या सात-आठ शब्दांनीही त्याच्या ओठांच्या तडकलेल्या कोपऱ्यांवर ताण पडला. त्यातून रक्त ठिबकायला लागलं.

"बघ!..."

दीदारने रक्त पुसून घेतलं.

"बोलू नकोस. पडून रहा नुसता. सकाळपर्यंत आणखी बरं वाटेल. नंतर बोलूच आपण. हं?"

त्याने तिघांकडे कृतज्ञतेनं पाहिलं. बघता-बघता त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

"आभार!"

थरथरते हात जोडून तो पुटपुटला. मग त्याने डोळे मिटून घेतले.

मिटल्या डोळ्यांसमोर ते काळे दिवस त्याला जसेच्या तसे दिसायला लागले...

* * *

दोन

मौलवीचं घराण हे भेरी गावातलं सर्वांत पुरातन. पूर्वापार या घराण्याकडे गावचं धर्मगुरूपण. या घराण्यातल्या पूर्वजांनी कुराण कोळून प्यायलेलं. त्यातली सगळी पवित्र वचनं ह्यांच्या जिभेवर सतत खेळत असायची. खुदाने प्रत्येकाला वाणीही अशी मिठास दिली होती, की प्रवचन चालू असताना बाजूनं एखादा हिंदू चालला असेल, तर त्यानेही बोलणं ऐकण्याकरता आवर्जून थांबावं! आणि पूर्वापार अभ्यासानं मुद्दे विवरण करताना त्यात असा काही प्रासाद असायचा, की ऐकणाऱ्याला वाटावं – इस्लाम हाच खरा सर्वांत श्रेष्ठ धर्म!

कदाचित, मौलवी घराण्याच्या या ओजस्वी वाणीनंच असेल; भेरी गावातल्या कित्येक हिंदूंनीदेखील इस्लाम धर्माची दीक्षा घेतली होती. आणि आजची परिस्थिती अशी होती की, कडव्या काही कडव्या हिंदुनिष्ठ कुटुंबांचा अपवाद वगळता, सगळं गाव इस्लाम धर्माच्या ध्वजाखाली नांदत होतं!

मौलवीचं मूळ नाव शोधायचं असेल, तर त्यांच्या घराण्याचा इतिहासच चाळावा लागेल, इतकं ते घराणं

मौलवी म्हणूनच ओळखलं जात होतं.

आदिल हा भेरींचा अकरावा धर्मगुरू.

पस्तिशीच्या या तरुणाला कोणी धर्मगुरू म्हणणारच नाही, असं सुंदर, रुबाबदार व्यक्तिमत्त्व या आदिलला लाभलेलं. चेहऱ्यावर खानदानी देखणेपण होतं, सहा फुटी तगडा देह लोखंडाच्या कांबीसारखा कणखर होता; आणि मनाचा कण न् कण इस्लामने भारलेला होता.

धार्मिक निष्ठुरतेच्या बाबतीत आदिल मौलवी औरंगजेबालाही कोकणभही सरस ठरला असता; आणि पहिल्या दहा मौलवींमध्ये नव्हतं, असं क्रोर्य या आदिलच्या ठायी एकवटलेलं होतं.

अर्थात, इतर वेळी तो कोणाला त्रास द्यायचा नाही. गावाकरताही त्याने बरंच काही केलं होतं. कारण, हळू-हळू या घराण्याकडे गावची सत्ता एकवटली असल्यामुळे, मौलवी भेरीचे अनभिषिक्त सत्ताधीशच होते. गावाची जबाबदारी ओघा-ओघानं त्यांच्यावर येऊन पडली होती. ती आदिल मौलवीने आपल्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत फार आदर्शपणे निभावली होती.

पण हा आदिल आपल्या धार्मिक मतांशी मात्र तडजोड करायला कधीच तयार नव्हता. त्याच्या समजुतीनुसार मूर्ति-भंजन हा इस्लाम धर्माचा एक अत्यंत अविभाज्य पवित्र घटक होता; आणि म्हणूनच, मूर्तिपूजक हिंदू त्याचे कट्टर वैरी होते.

आदिलच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत गावात जेवढ्या मशिदी बांधल्या गेल्या, त्यापेक्षाही कितीतरी पटीनं मंदिरं उखडली गेली आणि त्यातल्या मूर्तींच्या पार ठिकऱ्या-ठिकऱ्या झाल्या.

"मी या काफरांच्या मूर्ती फोडल्या! त्यांचा तो देव होता! पण तो स्वत:चं रक्षण करू शकला नाही, का मला त्या कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी दहशत दाखवू शकला नाही!" असं तो उघड-उघड अल्प-संख्याक हिंदूंसमोर, आपल्या धार्मिक प्रवचनात प्रौढीनं सांगायचा.

इस्लाम धर्माची दीक्षा घेतलेल्या हिंदूंना मात्र त्याने कधी बाटगे म्हणून

हिणवलं नाही. त्यांना आपल्यातलंच मानलं. पण गावचे कायदे कट्टर हिंदूंसाठी मात्र फार कडक होते.

तत्त्वं नेहमीच चांगली असतात, कोणत्याही धर्माची वचनं ही खरोखरच अमृतवाणी असते; पण ही तत्त्वं राबवणाऱ्याने त्यांचा योग्य अर्थ मात्र घेतला पाहिजे... हेच खरं!

◇◆◇

पहाट व्हायला अजून अवकाश होता, दिशा अजून अंधारातच गुरफटलेल्या होत्या; पण नित्य-नियमाप्रमाणे गाव मात्र उठलं होतं. सामुदायिक नमाज पढण्याची वेळ होत होती.

आदिल आपला पांढराशुभ्र पोशाख परिधान करून तयार झाला. डोक्यावर हिरवा मंदिल ठेवून त्याने अंगात हिरवा चाँद असलेलं जाकीट घातलं.

तेवढ्यात त्याचा नोकर मान खाली घालून आत आला. कुर्निसात करून म्हणाला,

"चलावं खाविंद. रथ तयार आहे."

कुपीतलं अत्तर अंगाला फासून आदिल निघाला.

रथातून प्रवास करतानाच त्याच्या प्रसन्न मनात बांग घुमायला लागली होती. कधी एकदा अल्लापुढे आपलं मस्तक नम्र होतं, असं त्याला झालं होतं.

"हसन, रथ जरा तेज चालव." आपली कोरलेली, काळीभोर दाढी कुरवाळत आदिल म्हणाला.

"क्यों हजूर, नमाज पढायला तर वेळ आहे अजून. देरी झालेली नाही."

"फिर भी तेज चलो."

"हिंदू मुहल्ल्यातून घेऊ? लवकर जाता येईल."

"घे."

धडधडत रथ हिंदू मुहल्ल्याच्या दिशेनं वळला.

रथ कुठूनही गेला, तरी गावात सत्ता मौलवीची होती. गाव आदिलचं

होतं. त्याला कोणी अडवणार नव्हतं. तसा प्रयत्न कोणी केलाच, तर त्याची मान कलम केली जाणार होती. त्यामुळे आदिल निश्चिंत मनानं बसला होता.

अन् हिन्दू महल्ल्यातून रथ गुजरत असताना त्याच्या कानांवर धीरगंभीर स्वरातले ते गीतेचे श्लोक आले.

"तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसार सागरात्!"

"भवामि नाचिरात्पार्थ मय्यावेशित चेतसाम्।।"

आदिलची समाधी खाडकन् भंग पावली. तो ताठरला.

"रोको!"

"रोको ऽ!"

हसननेही तो श्लोक एकला होता; आणि त्याचा अर्थ त्याला कळला नसला, तरी मौलवीचा मूड त्या श्लोकामुळेच बदलला आहे, हे त्याच्या लक्षात आलं होतं.

सापडला कोणीतरी!

हसनने लगाम खेचून थोडे थांबवले.

ताडकन् उडी मारून मौलवी खाली उतरला, दमदार पावलं टाकत मागे आला; आणि ज्या घरातून तो श्लोक ऐकू आला होता, त्या घरासमोर येऊन थांबला.

बाहेर संकट दत्त म्हणून उभं आहे, ह्याची आतल्या माणसाला कल्पना नव्हती. तो एकाग्र चित्तानं गीता-पठण करीत होता.

"अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुणा एव च।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी।।

अन् आदिलने दरवाज्यावर ताड्कन लाथ मारली.

चिरफळत दरवाजा तुटला.

"को ऽऽ ण?"

आतून आवाज आला.

"मी मौलवी! बाहेर ये!"

''क्षमा करा मौलवीसाहेब, माझा अध्याय वाचून पूर्ण झाल्याशिवाय मी बाहेर येऊ शकत नाही.''

अस्सं ? साक्षात मौलवीला हे उर्मट उत्तर !

''तर मग मी आत येऊ शकतो.''

चढ्या आवाजात मौलवी म्हणाला. रागा-रागानं पाय आपटत तो आत शिरला. त्याच्या आवाजानं जागी झालेली माणसं भीतीनं थरथरत एका कोपऱ्यात गोळा होऊन उभी होती. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून मौलवी थेट देवघरापर्यंत जाऊन पोचला.

''थांबा !''

आवाजात जरब होती. नकळत, मौलवी देवघराच्या उंबऱ्यापाशी थबकला. त्याच्या जळजळीत नजरेलाही आतलं दृश्य क्षणभर मोहवून गेलं.

एक बलदंड तरुण लालभडक, चकचकीत रेशमी कद नेसून बसला होता. त्याच्या कपाळावर केशराचा टिळा होता. समोर देवघरातल्या देवांची पूजा झालेली होती आणि त्यांवर सुंदरशी फुलं वाहिलेली होती. उदबत्तीचा आणि कापराचा दरवळ वातावरणाला एक प्रकारची पवित्र शुचिर्भूतता प्रदान करीत होता.

''तू हे काय करतो आहेस ?'' मौलवीने संतापावर नियंत्रण ठेवत विचारलं.

''गीता वाचतो आहे.''

''हा तुमचा धर्म-ग्रंथ ना ?''

''होय.''

''आणि तरी तू माझ्याशी बोलतो आहेस !''

''होय, कारण आमच्या धर्माने आम्हाला उलट कर्मठपणा कधीच शिकवलेला नाही. तुम्ही बाहेर यायला वाट करून दिलीत, तर मी बाहेर येऊन तुमचं आदरातिथ्य करीन. मग पुन्हा कद नेसून पुढे वाचायला लागेन.''

''लक्षात ठेव, यापुढे तू तुझा धर्म-ग्रंथ मनात वाचशील.''

''का ?''

''घराबाहेर त्यातलं काहीही ऐकू येणार नाही.''

''आणि तुमची बांग सगळ्या गावाला जागं करते ते ?''

आदिलच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

एका काफरने एवढं धाडस दाखवावं ?

''काय नाव तुझं ?''

''भरत.''

''भरत, लक्षात ठेव.... मला इतर काहीही माहीत नाही. मी उद्यापासून रोज या वेळी याच मुहल्ल्यातून जाणार–''

''तर मग, रोज तुम्हाला या घरातून गीतेचे श्लोकच ऐकू येतील.''

''ठीक आहे ! घरच उरलं नाही, म्हणजे तुला बसायला जागाही उरणार नाही; आणि तू श्लोकही वाचू शकणार नाहीस !''

''कल्पना आहे मौलवी तुमची ! तुम्ही माझं घर उद्ध्वस्त करून पहा; मी तुमच्या घरासमोर बसून गीता-पठण करीन.''

''तू स्वत:चा सर्वनाश करून घेत आहेस !''

''तुमच्यासारख्या धर्मवेड्या, सत्तांध मौलवीकडून आणखी काय अपेक्षा करायची ? राम - रहीम - जीजस.... सगळे देव शेवटी एकच आहेत; प्रत्येक धर्माचे त्याच्यापर्यंत पोचण्याचे मार्ग भिन्न असले, तरी अंतिम ध्येय एकच आहे. हे कळलं नाही कधी तुम्हाला. आमचा धर्म आम्हाला शिकवतो –

आकाशात पतितं तोयम् तथा गच्छति सागरम्।

सर्व देव नमस्कार: केशवम् प्रति गच्छति ॥

कोणत्याही देवाला नमस्कार करा; किंवा त्याच्यापुढे गुडघे टेकून नमाज पढा; वा चर्चमध्ये जाऊन त्याची प्रार्थना करा – शेवटी तो नमस्कार एकाच देवाला पोचत असतो.

''मी साधा उपासक असून मला हे समजलं; पण तुम्ही दहा वर्षं धार्मिक

प्रवचनं करूनही या अंतिम सत्यापासून वंचितच राहिलात! आणि या अज्ञानापायी आज तुम्ही माझ्या सर्वस्वाची होळी करायला निघाला आहात! मौलवी, तुमचा अल्लाच तुम्हाला या पापाचं प्रायश्चित्त देईल!''

''खामोऽऽश!''

संतापान बेभान होत मौलवी ओरडला, आपण काय करतोय्, ह्याचा त्याला विसर पडला; आणि दात-ओठ खात आत शिरत त्याने, भरतने मांडलेली पूजा उधळून लावली.

''सामर्थ्य असेल तुझ्या देहात, तर कर म्हणावं शिक्षा!''

भरत तरीही शांत होता. तो खाली मान घालून म्हणाला,

''त्या दगडाच्या मूर्ती मौलवीसाहेब! त्या तुम्हाला काय शिक्षा करणार? मानला तर तो देव आहे; नाहीतर दगडाचे पुतळे! त्यामागची संकल्पनाच तुम्हाला कळलेली नाही. पण एक गोष्ट विसरू नका – प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात याच ईश्वराचा अंश असतो. कंसाला सजा देण्याकरता हा ईश्वरी अंश भगवान् श्रीकृष्णाच्या हृदयात अवतरला होता. मग रावणाला ह्यानेच रामाच्या माध्यमातून सजा दिली होती. एक ना एक दिवस असा येईल, की हाच ईश्वरी अंश कोणा बलाढ्य मानवाच्या रूपानं तुमच्यासमोर उभा ठाकेल! आणि त्याच वेळी तुम्ही त्याला शरण जाल. पण तो तुम्हाला क्षमा करणार नाही. कदाचित तो सोहळा पाहायला मी जिवंत नसेन. कारण, माझं भवितव्य मला दिसत आहे. पण त्या वेळी तुम्हाला माझे शब्द आठवतील.''

भरतचं बोलणं ऐकून मौलवी खदाखदा हसला.

''भरत, या षंढांच्या वल्गना पुरे कर! हे मवाळ तत्त्वज्ञान दुर्बलांच आहे. तू....''

काय होतंय् ते कळण्यापूर्वी भरतचा हात उंचावला गेला आणि फडाडकन मौलवीच्या हनुवटीवर आपटला.

सण्णकन् मौलवीच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. मौलवी देवघरातून

थेट बाहेर गेला.

''हे षंढांचं तत्त्वज्ञान नाही मौलवी!'' तुच्छतेन त्याच्याकडे पाहत तो म्हणाला, ''काय होणार आहे, ते मी तुला सांगितलं होतं. तू मूर्तीचा अपमान केलास; पण तुझा तो स्पर्श आमच्या देवापर्यंत पोहोचू शकत नाही, म्हणून मी गप्प बसलो. त्याचा तू चुकीचा अर्थ घेतलास. माझं तुला आव्हान आहे आणि मला आता वाटायला लागलं आहे – ज्या हृदयात तुझा सर्वनाश करणारा ईश्वर प्रकाशणार आहे, ते हृदय माझंच असावं!''

एव्हाना मौलवी सावरला होता.

''तर मग, मला तो ईश्वर प्रकाशणारं ते हृदयच नाहीसं केलं पाहिजे.''

''तो मीच असेन, तर तुझ्या बापालाही ते शक्य होणार नाही. आणि तू मला मारू शकलास, तर ते हृदयच दुसऱ्या कोणाचं तरी असेल.''

मौलवीने एकदा जळजळीत नजरेनं त्याच्याकडे पाहिलं आणि तीन टाळ्या वाजवल्या.

हसन धावत-धावत आत आला.

''ह्याला गिरफ्तार कर!''

हसन झटकन् पुढे झाला. पण एक अल्पसंख्य हिंदू इतकं धाडस दाखवणार आहे, ह्याची त्याला कल्पना नव्हती.

हसन पुढे येताच भरतने सरळ त्याला उचलला; मौलवीच्या अंगावर फेकून दिला.

''तौबा-तौबा!''

कमरेवर हात दाबत हसन कळवळला.

''मौलवी, मला अटक करायची असेल, तर किमान चार तगडी माणसं पाठव! तीसुद्धा सगळी जिवंत राहतील, अशी आशा बाळगू नकोस.''

''अस्सं?'' अशा थाटात मान हलवत मौलवी घराबाहेर पडला. त्याच्यामागे हसन लंगडला.

त्याला कोणीतरी हा धडा शिकवायलाच हवा होता, असं संपूर्ण हिन्दु-

मुहल्याचं मत होतं आणि भरतने तो शिकवला, म्हणून भरतबद्दल त्यांच्या मनात चांगलाच आदर निर्माण झाला होता.

सगळ्या गावातच ती बातमी पसरली होती; आणि माथेफिरू तरुण वगळले, तर बऱ्याच समजूतदार मुसलमानांनादेखील मौलवीचं ते कृत्य पटलेलं नव्हतं. ते भरतला दोष द्यायला तयार नव्हते. पण प्रतिक्रिया कोणीच व्यक्त करत नव्हतं. गाठ मौलवीशी होती !

घडायचं ते घडून गेल्यामुळे भरत मात्र आता शांत होता. कोणत्याही परिस्थितीत सहजासहजी मौलवीच्या हाती लागायचं नाही, असं त्याने ठरवून टाकलं होतं. या कामाकरता सर्व मुहल्याने एकजुटीनं एकत्र यावं, अशी त्याची इच्छा होती. कारण, मौलवीला वचक बसवायचा असेल, तर ही चांगली संधी होती. पण मौलवीच्या जुलुमांना घाबरून कोणीही पुढे येणार नाही,, ह्याची त्याला जाणीव होती. त्याला एकट्यालाच तो लढा द्यावा लागणार होता. त्यामुळे जिवावर उदार होऊन तीन तरुण त्याला मदत करायला तयार झाले, तेव्हा त्याला फार आनंद झाला.

चौघेजण ताबडतोब तयारीला लागले.

एकट्या भरतकडे बंदूक होती; म्हणून तो घराच्या छपरावर जाऊन बसला. गोल फिरून चौफेर गोळीबार करणं त्याला त्यामुळे शक्य होणार होतं.

इतर तिघांनी मुठीएवढ्या आकाराचे दगड गोळा करून आणले. काठ्यांना रबर बांधून गिलोरी तयार केल्या. एकजण पुढच्या दरवाज्याशी थांबला, दुसऱ्याने खिडकी गाठली; आणि तिसरा मागच्या दारापाशी गेला.

बस्! यापेक्षा जास्त काही करणं त्यांना शक्य नव्हतं; आणि आपली तयारी फार कमी पडणार, हेही त्यांना ताबडतोब कळून चुकलं.

पन्नास घोडेस्वारांनी अख्ख्या हिन्दु-मुहल्ल्यालाच वेढा दिला होता.

सुलतान त्याचं नेतृत्व करत होता.

''भरऽऽत.... बऱ्या बोलानं आमच्या स्वाधीन होऽऽ''

उत्तरादाखल एक गोळी सणसणत आली.

सुलतानाचा घोडा पाय उडवून खिंकाळला; आणि सुलतानाला पाठीवरून झुगारून त्याच्याच अंगावर धप्पकन् कोसळला.

चार-पाच जणांनी धावून घोडं उचललं, तेव्हा अर्धमेला झालेला सुलतान उठून बाजूला झाला.

त्याच वेळी लागोपाठ आणखी चार गोळ्या सणाणल्या.

तीन स्वार किंचाळत खाली आपटले.

''भरऽऽत...'' धापा टाकत सुलतान ओरडला, ''आम्ही सगळा मुहल्ला जाळून टाकूऽऽ''

ते ऐकल्यावर मात्र भरत विचारात पडला.

आपल्यामुळे सर्व मुहल्ल्याला त्रास सहन करावा लागणं काही चांगलं नाही.

काय करावं ?

''सुलतान, तुझं वैर माझ्याशी आहे. हिम्मत असेल, तर मला पकड. मुहल्ल्याला कचाट्यात पकडण्याची बायकी चाल खेळू नकोस.'' शेवटी तो ओरडला.

सुलतान हसला.

''त्याच्या घरावर पेटत्या मशाली उडवा. छपरावरच आहे तो !''

एकाने लगेच मशालीवर रॉकेल ओतलं.

अन् तो आडवा झाला !

अं ?

बंदुकीचा आवाज नाही. मग.....

धडाधड दगडांचा वर्षाव सुरू झाला. अक्षरश: पावसासारखे दगड कोसळले. आणि त्यांत आंधळेपणा नव्हता. नेम अचूक बसत होते. कोणी ना कोणी टचकन् जखमी होत होतं.

जिवावर उदार होऊन चौघांनी मशाली पेटवल्या; आणि दोन्ही हातांत

दोन-दोन जळत्या मशाली घेऊन ते पुढे सरसावले.

त्यांना पुढे येताना पाहून भरतचा पारा आणखीनच तीव्र झाला. त्यातच गोळीबारालाही सुरुवात झाली.

तीन जण कोसळले.

एक मात्र जिद्दीनं घरापर्यंत पोचला.

मशाल फेकली गेली.

घराच्या छपरानं पेट घेतला.

मग हां-हां म्हणता घर ज्वालांनी वेढलं गेलं.

* * *

तीन

परिस्थिती अगदी अवाक्याबाहेर जाईपर्यन्त त्यांनी झुंज दिली होती. ज्याला कुठेही लागलं नाही, असा आदिलचा एकही माणूस मिळणं कठीण होतं. बंदुकीच्या गोळ्यांनी सोळा बळी घेतले होते; तर दगडांचा मारा असा वेगवान आणि प्रचंड होता, की त्या माऱ्यानं प्रत्येकजण जखमी झाला होता. कोणाचं कपाळ फुटलं होतं, कोणाच्या कोपरावर दगड बसल्यानं कोपर कामातून गेला होतं, काहींची थोबाडं सुजली होती; काहींच्या नडग्या टम्म झाल्या होत्या. खुद्द सुलतानच्या ओठावर एक दगड लागून त्याचे दोन दात पडले होते आणि ओठ फाटला होता.

तिघांमधला एक मोठा जळका वासा डोक्यात पडल्यानं मेला होता; आणि भरत त्यांच्या तावडीत सापडल्यानंतर मात्र दोघांनी पळायला सुरुवात केली होती. एक पळण्यात यशस्वी झाला होता, दुसरा मात्र पाठीत गोळी लागून धपकन खाली पडला होता; आणि त्याने डोळे मिटेपर्यन्त त्याला सर्वांनी तुडवून काढला होता.

तुरुंगाच्या गजाआड जाऊन भरतला एक दिवस झाला होता. आपले साथीदार मरतानाचं दृश्य त्याच्या

डोळ्यांसमोरून हलायला तयार नव्हतं.

आपलं काय होणार, ते तो जाणून होता. कारण, आल्या क्षणापासूनच त्याच्या छळाला सुरवात झाली होती.

रात्रीच्या जेवणात मांसाचा एक तुकडा होता आणि चपातीखाली फुगीर. काय आहे म्हणून पाहिलं, तर छोट्या वाटीत विष्ठा भरून ठेवलेली होती. तो भडभडून ओकला होता. त्याला देण्यात आलेलं पाणीसुद्धा अशुद्ध होतं. छळ करायच्या कैद्यांना नेहमी ठराविक विहिरीतलंच पाणी देण्यात येत असे. त्या विहिरीत गावातला सगळा मैला येत असे. तेच पाणी किड्यांसकट, मूत्राच्या वासासकट त्याच्याही वाट्याला आलं होतं.

अर्थातच, त्याला निर्जळा उपवास घडला होता.

त्याच्या दृष्टीनं, त्यातल्या त्यात एकच गोष्ट समाधानाची होती...

त्याच्या घरचे लोक या सैतानाच्या तावडीतून वाचले होते.

पण...

त्याचं हे समाधान फार काळ टिकलं नव्हतं.

संपूर्ण उपवासाचा त्याचा दुसरा दिवस !

तो तरुण होता. त्याची भूक जबरदस्त होती.

आणि काल सकाळपासून त्याच्या पोटात अन्न नव्हतं. घशाखाली पाण्याचा एक घोटदेखील उतरलेला नव्हता.

आता पोटात खड्डे पडत होते. डोळ्यांसमोर अंधारी येत होती. पाय लटपटायला लागले होते. उभं राहणंदेखील अशक्य होऊन बसलं होतं.

तो जमिनीवरच पडून राहिला होता.

मध्यरात्रीच्या सुमाराला त्याच्या तुरुंगाच्या दरवाज्याचं कुलूप वाजलं. पाठोपाठ दरवाजा उघडला गेला. कोणीतरी आत आलं.

त्याने ढुंकूनही पाहिलं नाही.

त्याच्यात डोळे उघडण्याचंही त्राण नव्हतं.

कोणीतरी दोन बाजूंनी त्याचे दंड धरले. त्याला खस्‌दिशी उभं

करण्यात आलं.

एकाने त्याचे हात मागे खेचले; ते दोरीनं आवळून बांधले.

कोणीतरी त्याच्या पायांत बेड्या घातल्या.

''अरे...कशाला त्रास देता ? मी पळून जाणार नाही.'' तो अशक्त आवाजात कसातरी म्हणाला.

''चल, तुला मौलवीसाहेब बोलवतात.''

''कशाला ?''

''त्यांना तुझ्यावर रहम आला आहे.''

तशाही परिस्थितीत तो हसला.

मौलवीला; आणि दया ... ?

जगातली घडणारी शेवटची घटना ठरेल ती !

त्याला तुरुंगाची दालनं ओलांडून वाड्यात नेण्यात आलं. एका दालनात प्रवेश करताच त्याला मौलवी आदिल दिसला. भरतकडे दयार्द्र नजरेने पाहत तो चुकचुकत होता.

त्याच्या समोर येताच सर्व बळ एकवटून भरत ताठ उभा राहिला. छाती ताणून, ताठ, तिरप्या मानेनं मौलवीकडे पाहून हसला.

''वा ! खरा बहादूर आहेस तू !''

मौलवी पर्यंकावर बसला. त्याने एक टाळी वाजवली. त्याबरोबर आतून मिठाई आणि फळांनी भरलेली दोन तबकं बाहेर आणण्यात आली.

ते सुग्रास पदार्थ पाहून क्षणभर भरतचं चित्त विचलित झालं. दुसऱ्या क्षणी तो समोर दगड असल्यासारखा निर्विकार झाला.

मौलवीने शांतपणे द्राक्षाचा एक घड संपवला. मग भरतकडे वळून त्याने विचारलं...

''भूक लागली ?''

''लागणारच !''

''तुला हे पदार्थ हवे आहेत ?''

''नकोत.''

''का, तुला भूक लागली आहे ना ?''

''भूक लागली; म्हणून माणूस विष्ठा खात नाही !''

''अरे !... असं-असं ! आलं लक्षात. मी तुला या फळांबद्दल विचारतोय् ?''

''नाही, तुझ्यासारख्या माणसाने दिलेली फळंही विष-वृक्षाचीच असणार !''

छत्तीस तासांनंतरही माणसात हा पीळ राहू शकतो, ही गोष्टच मौलवीला नवीन होती. तो विचारात पडला.

काय पवित्रा घ्यावा ?

शेवटी तो निर्णायक स्वरात म्हणाला,

''हे बघ भरत, तुझ्यासारख्या पराक्रमी माणसाला आपल्याजवळ स्थान द्यावं, असा मी विचार करतोय.''

''वा ! गुणांची कदर आहे तर तुम्हाला !''

''आहे. म्हणूनच तू अजूनही जिवंत आहेस.''

''पण तुमचे उपकार मी घेईनसं मला नाही वाटत.''

''नीट विचार कर.''

''क्षणभर असं मानलं – तुमची नोकरी स्वीकारायची. त्याकरता मला काय करावं लागेल ?''

''विशेष काहीच नाही. तुला माझी जाहीर माफी मागावी लागेल, सभेत सांगावं लागेल की, हिन्दू धर्मापेक्षा मुस्लिम धर्म श्रेष्ठ आहे आणि तुला आमचा धर्म स्वीकारावा लागेल.''

''अस्सं ! आणि त्या बदल्यात मला काय मिळणार ?''

''तुला मी माझा मुख्य अधिकारी नेमेन. माझ्या बहिणीशी तुला निका लावून देईन.''

तो मौलवीच्या धर्मवेडानं थक्क झाला. कट्टर हिन्दूला इस्लाम धर्म स्वीकारायला भाग पाडण्याकरता हा माणूस काय वाटेल ते करायला तयार होता.

म्हणूनच, आपलं हिंदुत्व राखण्याकरता आपणही वाटेल त्या प्रसंगाला तोंड द्यायला तयार राहिलंच पाहिजे.

''मौलवी, ही सौदेबाजी झाली.''

''सौदा समज. तुझ्या फायद्याचा आहे ना!''

''छे! दुसऱ्याला आपल्या धर्मात सामावून घेण्याकरता तुझा धर्म प्रत्यक्ष बहिणीचा सौदा करायला मागे-पुढे पाहत नाही. हा सौदा कसला फायद्याचा ठरणार? आणि तो मला कसा मानवणार?''

''थोडक्यात म्हणजे, तुझी तयारी नाही.''

''नाही.''

''मी तुला पुन्हा सांगतो भरत, विचार कर. विचारांकरता हवा तर अवधी मागून घे.''

''मला असल्या फालतू मुद्द्यावर विचार करण्याची आवश्यकता भासत नाही.''

''तर मग, मी काय करू शकतो, ते ऐक! मी तुझ्या वडलांना भर समाजात विवस्त्र करीन, त्यांच्या चेहऱ्यावर चित्रविचित्र रंग फासेन, त्यांची मेंढ्यावरून मिरवणूक काढीन. लोक त्यांना शेण... दगड मारतील. ही मिरवणूक वाळवंटापर्यंत जाईल. तोपर्यंत तुझे वडील रक्तबंबाळ होऊन मेलेले असतील; किंवा मरायच्या पंथाला लागले असतील. मग त्यांना वाळंवटात फेकून दिलं जाईल.''

भरत छद्मीपणे हसला.

''आणि हे इतकं कशासाठी?''

''तू इस्लामचा गौरव मान्य करावास म्हणून!''

''मला भेरी गावच्या मुस्लिम समाजाची कीव करावीशी वाटते मौलवी! बदनसीब त्यांचं.... त्यांना तुझ्यासारखा क्रूर माणूस धर्मगुरू म्हणून लाभला! आदिल, तुला धर्मगुरू म्हणण्याचीसुद्धा मला लाज वाटते. तू म्हणजे इस्लाम धर्माला काळिमा आहेस. तू क्रूर आहेस, मठ्ठ आहेस; तू राक्षस आहेस!''

''खामो ऽऽ ष!''

''उगाच ओरडू नकोस आदिल. तुझ्या शरीफ कुराणात मला असा आधार दाखवून दे, ज्याला धरून तू एका हिन्दू माणसाला त्याच्या मनाविरुद्ध इस्लाम बनवू पाहत आहेस. त्यासाठी त्याच्या कुटुंबाचा बळी देण्याचीही तुझी तयारी आहे. आहे तुझ्या या कृत्याला आधार?''

''आधार?...अशा घटनांचेच पुढे आधार बनतात! मी हा पायंडा पाडला, की उद्या माझ्या या पाक कृत्याकडे लोक आधार म्हणून बोट दाखवतील.''

''चुकीची कल्पना आहे. तुला कुराणाचा अर्थच कळला नाही आदिल. प्रवचनं करतोस तू; पण कुराणातली पवित्र वचनं तुझ्या हृदयापर्यंत पोचलेली नाहीत. पण म्हणून पुढच्या पिढ्यांनाही तो अर्थ गवसणार नाही, असं मानणं चुकीचं आहे. आणि त्या वेळी ही माणसं तुझ्या दुष्कृत्यांकडे क्रूरतेचा, धर्मांध सत्तेचा एक पाषाणी नमुना म्हणूनच बोट दाखवतील.''

''तुझ्या मूर्ख बडबडीकडे मी लक्ष देणार नाही भरत. तुझ्या या सगळ्या निरर्थक बोलण्याचा मी इतकाच अर्थ घेतो की, तुला तुझ्या धर्मापुढे आपल्या पित्याच्या प्राणांचीही पर्वा नाही.''

''तसं समज! ज्या कट्टरपणे तू हे कृत्य करायला तयार झाला आहेस, तितक्याच प्रखर धर्माभिमानानं प्रेरित होऊन मी माझ्या धर्माकरता स्वत:च्या पित्याची कुर्बानी देत आहे.''

''ठीक आहे. आता पुढे ऐक! मी तुझ्या बहिणीला आणि आईला मुस्लिम धर्माची दीक्षा देईन, तुझी बहीण आमच्या जनानखान्यात जाईल;

आणि तुझ्या आईला आम्ही आमची दासी म्हणून ठेवून घेऊ.''

''आदिल,' संतापाने थरथरत भरत म्हणाला, ''तुझ्या मूर्खपणाची आणि अडेलतट्टूपणाची आता मात्र हद्द झाली. पुन्हा माझ्या आई-बहिणीबद्दल तू असलं काही बोललास तर...''

''तर काय करशील काफर ?''

''बोलून बघ....!''

''असं ? मी पुन्हा सांगतो.....'' हातात एक द्राक्ष घेऊन ते बोटांनी कुरवाळत आदिल म्हणाला, ''याच बोटांच्या जागी तुझ्या बहिणीची....''

तो काय म्हणणार, याची कल्पना येण्याचा अवकाश; भरतने शरीराला ताडकन हिसडा मारला. त्याच्या हातांच्या दोऱ्या घट्ट बांधलेल्या होत्या; त्यामुळे त्याच्याकडून कसलीच हालचाल अपेक्षित नव्हती. त्याच्या पायांत बेड्या आणि त्यांना जोडणारी साखळी होती. त्याला घेऊन येणारे पहारेकरी निश्चिंत मनानं बाहेर उभे होते. हिसडा मारून भरतने उडी मारताच आदिल दचकला, मागे सरकला; पण भरत काय करतोय्, ते त्याच्या लक्षात आलं नाही. कोसळल्यासारखा भरत धडपडला, मग ताडकन उडाला; पण त्यापूर्वी त्याचे पाय आदिल मौलवीच्या खांद्यापर्यन्त गेले होते आणि त्याची मान पायांच्या साखळीत ओढली गेली होती.

भरत खाली कोसळला. त्याच्याबरोबर आदिलही खाली पडला. आदिलच्या तोंडून काही आवाज निघण्यापूर्वीच त्याच्या गळ्याभोवती साखळी आवळली गेली. तो कळवळला. घुसमटला. क्षणा-क्षणाला भरतचे पाय ताणले जात होते आणि त्याच्या गळ्यात साखळी रुतत चालली होती. आदिलच्या चेहऱ्यावरच्या नसा, शिरा टरारून फुगल्या होत्या. जबडा लुळा पडला होता. डोळे बाहेर डोकवायला लागले होते. जीभही बाहेर यायला लागली होती. काय करावं, ते सुचण्याच्या पलीकडे चालला होता तो. मृत्यूची हाक केवळ काही सेकंदांच्या अंतरावर होती.

पण आदिलचं आयुष्य अजून बळकट होतं. आतून कसलाच आवाज येत नाही; म्हणून एका पहारेकऱ्याने कुतुहलानं आत डोकावून पाहिलं होतं.

आतलं दृश्य पाहून क्षणभर त्याची बोबडीच वळली. मग दुसऱ्या पहारेकऱ्याला सावध करत तो आत धावला.

एकाने प्रसंगावधान राखून भरतच्या कानावर बंदुकीचा दस्ता फटकन मारला. दुसऱ्याने त्याच्या पोटरीवर दस्ता मारून त्याचा पाय निर्जीव केला.

भरतला तिरमिरी आली. कानावरचा मुका मार त्याला सहन करता आला नाही. भोवळ येऊन तो सैलावला. दोघांनी आदिलचा गळा सोडवला आणि त्याला धरून पलंगावर निजवला.

नॉर्मलला यायला त्याला दहा मिनिटं लागली. त्याने आधी सुरईतलं पाणी गटगटा प्यायलं. मग दोन्ही हात छताच्या दिशेनं करून वर डोळे फिरवत तो उद्‌गारला–

"याऽल्ला! या खुदा! परवरदिगार, तेरा लाख-लाख शुक्र है, जो तूने बचा लिया। वरना हम आज मरहूम हो जाते।"

परवरदिगारच्या बाबतीतलं शुक्रिया अदा करण्याचं कर्तव्य पार पडताच तो रागारागानं भरतच्या दिशेनं वळला.

तो अजून निश्चेष्ट पडला होता.

"शैतान की औलाद!" असं दात-ओठ खात म्हणत तो भरतच्या जवळ आला आणि त्याच्या कमरेत लाथ मारत पचकन् त्याच्या तोंडावर थुंकला.

"मालिक, ह्याचं काय करायचं?"

"पडू देत इथेच! पण तुम्ही इथून हालू नका. तो शुद्धीवर आला, की त्याला त्याच्या गुस्ताखीची मी सजा देणार आहे... जन्मभर याद राहील त्याला!"

पहारेकरी मख्ख कुत्र्यासारखे भरतच्या दोन्ही बाजूंना उभे राहिले.

शुद्धीवर येण्याची वाट पाहत आदिल पर्यंकावर बसून दाढी कुरवाळत राहिला.

पाच-दहा मिनिटांनी भरतचे होश परत आले.

"क्यों, कैसे हैं मिजाज ?"

आदिलने दाढीला पीळ देत विचारलं.

"फार वाईट वाटतंय्!"

"असं ना!"

"उगाच दोन दिवस उपाशी राहिलो."

आदिलचे डोळे चमकले. त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुललं.

"नीट जेवलो असतो, तर अंगात ताकद तरी राहिली असती. अंगात ताकद असती, तर तुझा गळा केव्हाच चिरला गेला असता."

"हं ऽऽ!" गंभीर होत आदिल हुंकारला. "अजून मगरूरी गेली नाही तर तुझी ?"

"कशी जाणार ? काही मिनिटांकरता बेशुद्ध होतो. पुनर्जन्म नाही झाला माझा.... माझ्यात पूर्ण बदल व्हायला ?"

"सबूर कर बेटा ! पुनर्जन्म न होताही तुझ्यात बदल घडवून आणण्याचं सामर्थ्य या आदिल मौलवीच्या अंगात आहे."

"दिसलंच आता ते ?"

"अजून तू काहीच पाहिलेलं नाहीस. जुम्मन....!

त्याने हाक देताच एक काळा-कुळकुळीत आडदांड तरुण कुठूनतरी धावत आल्यासारखा आत शिरला आणि आदिलला कुर्निसात करून नम्रपणे उभा राहिला.

"जुम्मन, आज सकाळी तू कुठे गेला होतास ?"

"सूखीला!"

भरतने चमकून जुम्मनकडे पाहिलं.

डोळ्यांच्या कोपऱ्यातून आदिल त्याच्याकडेच पाहत होता. त्याच्या

चेहऱ्यावरचे रंग उडालेले पाहून तो गालातल्या गालात हसला.

''कशाला गेला होतास ?''

''भरतच्या आई-वडिलांचा शोध घ्यायला ?''

''सापडले ?''

''हो.''

''कुठायत मग ते ?''

''हुकूम असेल, तर आत्ता हजर करतो.''

''कर.''

जुम्मन पुन्हा कुर्निसात करून निघून गेला. भरतने जळजळीत नजरेने आदिलकडे पाहिलं. तो कळवळून म्हणाला,

''आदिल, मी केलेल्या अपमानाचा सूड तू माझ्या आई-वडलांवर आणि माझ्या बहिणीवर अन्याय करून उगवू नकोस. मी तुझ्या ताब्यात आहे. माझं तू काय वाटेल ते कर. हवं तर तुला मी छळ करण्याचे निरनिराळे उपाय सुचवतो.''

आदिल खदखदा हसायला लागला.

''भरत, तुला यातना देण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग माझ्या हातात असताना मी तू सांगणार असलेल्या छोट्या मार्गांचा अवलंब कशाकरता करावा ?''

''तू काय करणार आहेस ?''

''तू इस्लाम धर्मापेक्षा....''

''नाही, इस्लाम धर्मापेक्षा हिंदुधर्म श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे, असा अजूनही माझा दावा नाही. प्रत्येकाला आपापला धर्म प्यारा असावा, या मताचा मी आहे. आणि कोणी कोणावर धर्मांतराची सक्ती करू नये, असं मला वाटतं ते मी तुला सांगितलं.''

''तू माझ्यावर दोन वेळा हल्ला केलास.''

''त्याबद्दल मी तुझी क्षमा मागतो. तू माझ्या पाठीची सालटी सोलून

निघेपर्यंत मार. मी सहन करीन. पण...''

''इस्लाम धर्माचा स्वीकार करतोस ?''

''करतो.''

''पण आता मघाच्या सवलती तुला मिळणार नाहीत. मघाशीच मान्य केलं असतंस, तर माझ्या बहिणीशी तुझा निका पढ़वला असता मी. आता तू शरण येऊन माझा धर्म स्वीकारतो आहेस. माझा अटी आता तुला मान्य कराव्या लागतील.''

''बोल...''

''तू गुलाम म्हणूनच इथे माझ्या सेवेत राहशील. रोज सकाळी माझी विष्ठा आणि मूत्र डोक्यावर घेऊन नेऊन टाकण्याचं काम तुला करावं लागेल. त्या बदल्यात तुला....''

''आदिल ! एक शब्द बोलू नकोस पुढे.'' तो खवळून म्हणाला, ''जा ! तुला काय करायचं ते कर. माझ्या नातेवाइकांच्या नशिबात असेल, ते त्यांचं होईल.''

''तर मग...''

आदिलने वाक्य तोडलं. तो प्रसन्नपणे हसला. पण तो भरतकडे पाहत नव्हता. त्याचं लक्ष दरवाज्याकडे होतं.

भरतने मान वळवून पाहिलं.

त्याचे आई-वडील आणि बहीण दरवाज्यात उभे होते. त्यांना कडेकोट बंदोबस्तात आणण्यात आलं होतं.

आदिलने खूण करताच त्यांना आत आणण्यात आलं. त्याची नजर भरतच्या तरुण बहिणीच्या जवानीनं मुसमुसलेल्या शरीराशी खेळायला लागली.

''ही तर खूपच सुंदर आहे जुम्मन !'' तिच्या गालावरून बोट फिरवत आदिल म्हणाला.

"आदिल...!"

भरत जीव खाऊन ओरडला. त्याच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करत आदिलने फळांजवळची सुरी उचलली, तिचं टोक न्याहाळलं; आणि मग शांतपणे त्याने सुरीचं ते टोक तिच्या कुडत्याच्या दर्शनी भागावरून फिरवत खाली ओढलं.

भरतचे आई-वडील पुढच्या कल्पनेनं भोवळू पडले.

दात-ओठ खात भरतने डोळे गच्च मिटून घेतले.

* * *

चार

त्यांनी एव्हाना भेरीचं संपूर्ण वाळवंट पालथं घातलं होतं.

आदिलचा हुकूमच होता तसा.

"त्याला शोधून काढा. त्याशिवाय परत येऊ नका. तो सापडला नाही, तर परत येण्याचीदेखील आवश्यकता नाही!"

सहा-सहा जणांच्या चार टोळ्या वाळवंटाचे उभे-आडवे छेद घेत होत्या.

तो रात्रीच केव्हातरी पळून गेला असावा.

सकाळी गस्त घालताना कोणाच्यातरी...

लक्षात आलं.

भरताच्या तुरुंगात मैला वाहून नेणारा बिर्गा चाचा तिथे गेला.

पाहतो, तर तो मरून पडलेला.

तुरुंगात इतर कोणी नाही.

झाला फरारी!

आदिलला ती बातमी समजली, तेव्हा तो खवळून उठला.

''त्याचा शोध घ्या. सुटता कामा नये तो!''

त्याचंही बरोबरच होतं. भरत हातातून निसटला, तर सूड तरी कोणावर उगवणार तो?

त्या रात्री आपल्या पोरीचं काय होणार, हे लक्षात येताच भरतच्या वडिलांनी डोळे मिटले, ते उघडलेच नाहीत. आपला पती गेला म्हटल्यावर त्याच्या आईने शेजारच्या पहारेकऱ्याचा जंबिया उपसला आणि खसदिशी स्वत:च्या पोटात खुपसून घेतला.

मग त्या जमुनाचे हाल तरी कोणाच्या डोळ्यांदेखत करायचे?

भरत सापडलाच पाहिजे.

सकाळी-सकाळी अब्रानच्या नेतृत्वाखाली चोवीस घोडेस्वार भेरीच्या वाळंवटात घुसले.

◇◆◇

त्याच्या पायांत बेड्या. हात मागे बांधलेले.

पोटात अन्न-पाणी नाही.

मनात उत्साह नाही.

जातो कुठे जाऊन-जाऊन?

पडला असेल दोन-चार मैलांच्या टापूत कुठेतरी.

सापडेल.

पण लवकरच अब्रानच्या माणसांचा गैरसमज दूर झाला.

भरतचा मागमूसही लागायला तयार होईना.

धसला कुठेतरी वाळूत!

पण असं सांगून मौलवींना ते पटायचं नाही.

शोधा-शोधा... त्याला शोधून काढा.

एक तंगडं घोड्याच्या मागच्या खुराला बांधून फरपटत न्यायचाय त्याला.

मौलवींचीच आज्ञा!

रात्र उलटायला लागेपर्यंत सहा तुकड्या वाळंवटात वणवण भटकत होत्या.

''अब्रान... आता ?''

''मला वाटतं, तो एखाद्या गावापर्यंत–''

''कसं शक्य आहे ? भेरीच्या वाळवंटानंतर लागणारं पहिलं गाव सत्तावीस मैल आहे भेरीपासून.''

''त्याला कोणाचीतरी मदत मिळाली असेल तर.... ?''

''हां, ती शक्यता आहे.''

''आपण तौलीत चौकशी करू.''

अगदी उजाडता-उजाडता अब्रानची टोळी तौलीपाशी येऊन धडकली. वाळवंटालगतच्या पहिल्याच झोपडीपाशी अब्रानचा घोडा थांबला. घोड्यावर बसल्या-बसल्याच त्याने हातातल्या बंदुकीची नळी एका दरवाज्यावर वाजवली.

आतले बोलण्याचे आवाज थांबले. मध्ये साधारण अर्धा मिनिट गेला. अब्रान पुन्हा दार ठोठावण्याच्या तयारीत असतानाच दरवाज्याला फट पडली. एक तरुण बाहेर डोकावला.

''कोण पाहिजे ?''

फटीतून बाहेर येत त्याने विचारलं. मागचा दरवाजा बाहेर येताच पुन्हा लावून घेतला.

''आमचा एक कैदी पळाला आहे. त्याला आम्ही शोधत आहोत.''

''कोणत्या गावाहून आलात ?''

''भेरी.''

''भेरी ?... काय वेड लागलं काय ?''

''का ?''

''मौलवीच्या कैदेत राहिलेला माणूस बाहेर पडला, तरी एक मैल चालत जाण्याइतकी तरी त्याची अवस्था चांगली असते का ? आणि तुम्ही सत्तावीस

मैलांचं वाळंवट तुडवून कैद्याला शोधायला तौलीत आला!''

अब्रानलाही जरा लाजल्यासारखं झालं.

भेरीचा कैदखाना यातनाघर म्हणून प्रसिद्ध होता. तिथल्या अतोनात छळांची ऐकीव वर्णनं आसपासची गावं गप्पा-गप्पांत हमखास करायची; आणि ती अगदीच अवास्तव नसायची.

आता या भरतचा काय कमी छळ झाला का?

खरंच, सत्तावीस मैल कसा येईल तो?

पण...

या तरुणाचं वागणं असं संशयास्पद का वाटतंय्?

बाहेर डोकावताना आतलं काही दिसणार नाही, ह्याची काळजी घेण्याकरता त्याने बारीक फट केली होती. का आपल्याला उगाच तसं वाटतंय्? दार का बंद करून घेतलं त्याने?

''आत कोण आहे?''

''मित्र.''

''काय करताय्?''

''पत्ते खेळत बसलो आहोत.''

''सकाळी-सकाळी...?''

''अस्सल पिणाऱ्यांना... आणि धंदेवाईक जुगाऱ्यांना कोणताच काळ निषिद्ध नसतो.''

''ठीक आहे. प्यायला पाणी मिळेल का?''

''मिळेल की! या ना आत!''

तरुणापाठोपाठ अब्रान घरात शिरला.

हे घर म्हणजे एकच मोठी खोली होती. त्यातच पार्टिशन टाकून स्वयंपाकघर तयार केलेलं होतं.

तो खोलीचं निरीक्षण करत असतानाच त्या तरुणाने त्याला प्यायला पाणी दिलं.

''काय नाव तुझं ?''

''दीदारसिंग.''

''आणि हे दोघं– ?''

''मित्र आहेत. हा गोली; हा गगन.''

पाणी पिऊन त्याने दीदारच्या पाठीवर थाप मारली.

''हंऽऽ चालू द्या तुमचं.''

असं म्हणत तो बाहेर पडला.

दीदारने त्यांच्या टोळीतल्या माणसांची संख्या आधी आणि आता जाताना मोजली असती, तर त्याच्या लक्षात आलं असतं....

दोन माणसं टोळीबरोबर परत गेलीच नाहीत.

दोनातला एक तर चक्क अब्रानच होता !

◇◆◇

''अब्रान, तुला त्यांचा संशय येतोय का ?''

''होय.''

''का, त्याच्या बोलण्यात तर तसं काही वाटलं नाही मला.''

''नाही. तो बोलला, तेव्हा त्यांच्यावर माझाही विश्वास बसला होता.''

''मग ?''

''त्याने आधी दरवाजा बंद ठेवण्याची फार खबरदारी घेतली; आणि नंतर, मध्ये बराच वेळ गेल्यानंतर, मला संशय येऊ नये म्हणून आत बोलवलं.''

''पण होतं का कोणी आत ?''

''नव्हतं. आपला कैदी तर निश्चितच नव्हता.''

''तर मग तुला उगाचच संशयानं घेरलं आहे.''

''कशावरून ?''

''मम्मू, त्यांनी त्याला लपवण्याकरता खूप खबरदारी घेतली. पण एक चूक त्यांच्याही लक्षात आली नाही.''

''कोणती ?''

''कोपऱ्यात आपल्या बेडीच्या साखळीचे तुकडे पडले होते.''

अब्रान शांतपणे म्हणाला, तसा महम्मद दचकला.

''तुझी खात्री आहे अब्रान–?''

''होय ?''

''मग वाट कशाची पाहतोस ?''

''आपला धोका गृहीत धरून त्यांनी त्याला दुसरीकडे हालवलं असेल, तर तोही सापडणार नाही; आणि ती पोरं मात्र सावध होऊन बसतील.''

महम्मदने मान डोलावली.

''बरोबर आहे तुझं म्हणणं ! पण आपण असे किती वेळ वाट पाहत राहणार ?''

''फार वेळ नाही. कोणीतरी जेवण घेऊन तरी भरतला भेटायला जाईलच की नाही ? त्या वेळी आपण त्याचा पाठलाग करू. कोणतेही कष्ट न घेता भरतपर्यंत पोहोचू आपण ! धीर तेवढा धरायला हवा.''

''आणि कोणी बाहेर पडलंच नाही, तर.... ?''

◇◆◇

''तर आपण तिघांना ताब्यात घेऊन बोलतं करू.''

मम्मू आणि अब्रान शांतपणे दीदारसिंगच्या घरावर नजर ठेवून बसून राहिले. भरतला न घेता आदिल मौलवीसमोर जाण्यापेक्षा इथे दोन दिवस गेले, तरी त्यांची तयारी होती.

पण त्यांचं नशीब जोरावर असावं.

अर्ध्या तासात गोली घाई-घाईनं दीदारच्या घरातून बाहेर पडत होता.

''गगन, बाहेरचा माणूस भेरीचा आहे; आणि तो भरतची चौकशी करतोय् !''

''होय. दीदार त्याला सांभाळू शकेल मला वाटतं.''

''पण संशय दूर व्हावा म्हणून तो आत यायला हटून बसला तर.... ?''

''तर... ? तर खरंच पंचाईत होईल.''

''खोली एकच आहे. ह्याला कुठे लपवायलाही जागा नाही.''

''आणि ह्याला त्याने पाहिलं, की हा मेला. आणि आपणही !''

''काय करावं ?''

''असं केलं तर– ?''

''काही सुचतंय् ?''

''हं, उचल त्याला. जरा खाली ठेवू.''

''काय करतोयस ?''

''उचल तर खरं. त्यातल्या त्यात प्रयत्न करू.''

''मागच्या दारातून...''

''बाहेर त्याची माणसं आहेत.''

''मग ?''

''धर.''

दोघांनी त्याला उचललं. खाली ठेवला. गोलीने चारपाईवरची चादर वर उचलली.

''त्या खालच्या ट्रंका बाहेर काढायला मदत कर. काम झपाट्यानं उरकलं पाहिजे. पण थोडा आवाज झाला, तरी संपलं सगळं !''

दोघांनी ट्रंका-पेट्या बाहेर काढल्या. भरतला उचलून चारपाईखाली ठेवला. त्याच्यापुढे पुन्हा ट्रंका वगैरे सारून दिल्या. चारपाईवर व्यवस्थित चादर टाकली.

गगन आणि गोली काहीतरी डोकं चालवून त्या तरुणाला लपवतील, ह्याची दीदारला खात्री होती. त्यामुळे त्याने बराच वेळ अब्रानला तंगवलं. त्याचा संशय फारच बळावल्यावर मात्र त्याने मनाचा धडा करून बिनदिक्कतपणे त्याला आत घेतलं. क्षणभर त्याचा श्वास घुटमळला; पण आपल्या अपेक्षेप्रमाणे गोली आणि गगनने चोख व्यवस्था केली आहे, हे पाहून त्याच्या उरावरचं दडपण उतरलं.

अब्रान निघून जाताच दीदारने पहिल्यांदा दार बंद करून घेतलं. तो मटकन् चारपाईवर बसला.

थोड्या वेळानं घोडे निघून जाण्याचे आवाज ऐकू आले.

"गोली, कुठाय् रे तो?"

"तुझ्या खाली!"

दीदार ताडकन् उठला. त्याला वाटलं, आपण त्याच्या अंगावरच बसलो की काय?

"चारपाईच्या खाली."

"काढायचा का बाहेर?"

"जरा वेळ वाट पाहू. नाहीतर... पण त्याला बाहेर काढायचो; आणि तो अब्रान परत हजर व्हायचा! मग मात्र पंचाईत होऊन बसेल."

"काही होणार नाही ना त्याला?"

"छे! अगदी सुरक्षित आहे तो."

"टाका चार डाव."

"टाका."

◇◆◇

तिघंजण आता कंटाळवाणं, रटाळ खेळत राहिले. पण अर्धा तास घालवण्याचं त्यांच्याकडे दुसरं साधनच नव्हतं. अर्ध्या तासानं दीदार उठला, खिडकीच्या फटीतून त्याने दिशा न्याहाळल्या; आणि त्यांच्यापैकी कोणीही दिसत नाही, याबद्दल खात्री करून तो आत वळला.

"हं, चला, आता त्याला वर ठेवू."

दोघांनी त्याला मदत केली.

भरत पुन्हा चारपाईवर आला.

"ए, गोरक्ष काय म्हणाला होता?"

"सकाळपर्यंत शुद्धीवर येईल."

"मग अजून कसा काय शुद्धीवर येत नाही तो?"

"आता आपण कसं सांगणार ? कदाचित कल्पनेपेक्षाही जास्त हाल झाले असतील त्याचे. त्याला आणखी विश्रांतीची आवश्यकता असेल."

"मला वाटतं, त्याच्या पोटात अन्न नव्हतं. उपाशीपोटी वाळंवट पार केलं असेल त्याने, तर आणखी दोन-तीन दिवस तरी तो उठू शकणार नाही."

"पण तसं होतं, तर पहाटे कसा शुद्धीवर आला ?"

"गोरक्षच्या औषधाच्या परिणाम असेल तो."

"आपण आपलं गोरक्षलाच बोलवून आणू या का ?"

"जातो ना ! कारण कालही मीच गेलो होतो ना ! आता ते काम माझंच झालं."

"तसं नाही रे, विचारलं आपलं. तुला कंटाळा आला असेल, तर हा गगन–"

"नको, मीच जातो."

गोलीने दाराबाहेर पाहिलं. रस्त्यातून नेहमीची माणसं दिसत होती. भरीचे स्वार खूप दूर निघून गेले होते. आता काही ते परत येतीलसं वाटत नव्हतं.

तो बाहेर पडला आणि पळत-पळत गोरक्षच्या घराकडे निघाला.

◇◆◇

गोरक्षच्या दवाखाना असा नव्हता. ठराविक वेळेला तो घराच्या ओसरीत आपलं बैठं डेस्क मांडून बसत असे. आजारी माणसं तपासायला येत. ह्याला नाडीपरीक्षा चांगली येत होती; त्यामुळे रोग्याला झोपवून तपासायचा प्रश्न, सहसा उद्‌भवत नसे. कोणाचं पोट तपासायचं झालंच, तर रोगी सरळ ओसरीवरच आडवा होत असे.

टेबल, पडदा.... असल्या दिखाऊपणाची गोरक्षच्या दवाखान्याला कधीच गरज भासली नव्हती. औषधातही त्याचा भर सगळा वनस्पती आणि आयुर्वेदिक औषधांवर होता. कोणी विदेशी औषधांचं नाव काढलं, तरी गोरक्षचं पित्त खवळत असे आणि तो रोग्याला आणि त्याच्या बरोबरच्या माणसांना तो हाकलून देत असे. आपल्या आयुर्वेदापुढे सगळी औषधं हात

टेकतात; फक्त निदान करणाऱ्याला अक्कल पाहिजे, असं त्याचं मत होतं.

गोली त्याच्या घरापाशी आला, तेव्हा गोरक्षच्या समोर अवाबेन आपल्या आजारी पोराला घेऊन बसली होती आणि तो तिला कुठली तरी मुळी दाखवून तिचा लेप कसा तयार करायचा, ते सांगत होता.

अवाबेन गेल्यावर इतर दोन-चार रोगी सोडून तो गोलीकडे वळला.

"काय रे गोली ?"

"तू सकाळी येणार होतास ना ?"

"हो, पण अपस्माराचा एक रोगी आला होता. त्यात बराच वेळ गेला. निघणारच होतो मी. कसा आहे तो ?"

"कुणास ठाऊक !"

"म्हणजे.... ?"

"पहाटे तो एक-पाच मिनिटं शुद्धीवर आला होता. आम्ही त्याला ते बाटलीतलं औषध पाजलं."

"निम्मं पाजलं ना ?"

"हो."

"मग ?"

"नंतर पुन्हा तो झोपला, तो अजून शुद्धीवर आलाच नाही."

"अँ ! असं कसं होईल ?"

"अरे ! मग तो ढोंग करतोय् का ?"

"मेला नाही ना ?"

"छे ! ते आम्ही कशाला पाहतोय् ?"

"ठीक आहे. तू हो पुढे. मी या चार जणांना तपासतो आणि येतो."

"लवकर ये; नाही तर तो मेला नसेल, तर तुझी वाट पाहता-पाहता मरेल."

"आलोच !"

गोली निघून गेल्यानंतर गोरक्ष पुन्हा उद्योगाला लागला. कितीही घाई

असली, तरी एका रोग्याकरता दुसऱ्या रोग्याकडे दुर्लक्ष करणं त्याला आवडत नव्हतं. चौघांना व्यवस्थित तपासून, त्यांची औषधं देऊन मग तो आपल्या हँन्डबॅग्ज् घेऊन बाहेर पडला.

पण मग मात्र त्याने घाई केली. दोन्ही बॅगा हलवत तो भराभर चालायला लागला अन्....

कोपऱ्यावरच कोणीतरी अनोळखी तरुण त्याची वाट अडवून उभे होते.

''गोरक्ष...''

तो दचकून उभा राहिला.

''हे बघ, माझ्या खिशात रिव्हॉल्व्हर आहे आणि त्याची नळी तुझ्या दिशेनं आहे. अजिबात वेडेपणा करू नकोस.''

त्यातल्या एकाने शांत स्वरात त्याला सांगितलं.

गोरक्ष त्या दोघा तरुणांकडे आ वासून पाहतच राहिला.

* * *

पाच

दारावर टकटक होताच गगन दरवाज्याच्या दिशेनं धावला. त्याने छोटा अडसर बाजूला केला, कडी काढली; आणि झटकन् दार उघडलं.

क्षणभर त्याचा गोंधळ उडाला.

गोरक्ष अपेक्षित होता; पण त्याच्याऐवजी पुन्हा मागचा तो भेरीचा माणूसच दारात उभा होता.

सेकंदाचाही वेळ न गमावता गगनने आपला हात बाहेर काढून पंजा त्या तरुणाच्या तोंडावर दाबून त्याला मागे रेटला.

अब्रान मागे धडपडला.

तेवढ्या अवधीत गगनने झटकन् आत हात घेऊन दार दाबलं आणि दरवाज्याला कडी घालून टाकली.

''हे काय ?'' दीदारने खवळून विचारलं.

''ही चेष्टेची वेळ नाही गगन.'' तीव्र स्वरात गोली म्हणाला.

दोघांना हातानं थांबवत गगन म्हणाला....

''बाहेर तो आहे.''

''कोण तो ?''

''मघाशी चौकशीला आलेला.''

दोघं चाट!

तेवढ्यात पुन्हा दार ठोठावलं गेलं.

''दी ऽ दा ऽऽ र...''

तिघं निश्चल.

''दार उघड; नाही तर तुझी झोपडी जाळून ठेवू आम्ही!''

''तुला काय हवंय् आता?''

दीदारने वेळ घालवण्यासाठी प्रश्न विचारला. कारण तोपर्यंत गगन आणि गोलीला विचार करायला वेळ मिळणार होता.

''तुझ्या घरात भरत नाही....?''

''माझ्या घरात एक आजारी माणूस आहे. त्याचं नाव मला माहीत नाही.''

''दार उघड. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत तो माणूस हवा आहे.''

''त्याला मी तुमच्या ताब्यात देऊ शकत नाही.''

''का?''

''तो आजारी आहे.''

''असू देत की मग! तुझा काय संबंध?''

''ते वाळवंटात मरणार होता. त्याला गिधाडं खाणार होती. त्याला वाचवला, माझ्या घरी आणला. आता त्याला पूर्ण बरा करण्याची जबाबदारी माझी आहे.''

''तू वेडेपणा करू नकोस दीदार. माझं तुझ्याशीच काय, भरतशीही वैर नाही. पण मी मौलवींचा नोकर आहे. त्यांनी मला भरतला पकडून आणायला सांगितलं आहे. त्यांची आज्ञा मला कोणत्याही परिस्थितीत पाळलीच पाहिजे.''

''त्याला माझा नाइलाज आहे.''

''मग माझाही नाइलाज होईल. भरत हा आमचा कैदी आहे आणि तो

तुझ्या घरात आहे. तो परत मिळवण्याकरता, तुझं घरच काय, सगळं तौली जमीनदोस्त करावं लागलं, तरी मला माघार घेता येणार नाही. बघ, विचार करायला मी तुला पाच मिनिटांचा अवधी देतो. अल्ला तुला सुबुद्धी देवो!''

दीदार गर्रकन् मागे वळला.

''गोली... गगन....''

''विचारतोस काय ? त्याला आपण जगवला. आता त्याच्या रक्षणाची संपूर्ण जबाबदारी आपल्यावरच आहे.''

''शेवटपर्यंत साथ निभावणार ?''

''दीदार...!''

''बस्स ! मिळालं मला माझ्या प्रश्नाचं उत्तर.''

''तुझ्याकडे शस्त्रं वगैरे काय आहेत ?''

''दोन बंदुकी आहेत आणि गोळ्यांचा स्टॉक भरपूर आहे.''

''ठीक आहे. तू आणि गगन त्या बंदुकी घ्या.''

''आणि तू ?''

''मी ?... मला हा अडसर चालेल.''

''नको. तू बंदुक घे; मी अडसर घेतो.''

''नाही दीदार, तुला तर माहिती आहे, लाठीत तुलाही मी उजवा आहे.''

''पण लाठीनं बंदुकधारी माणसाशी लढत नाहीत कधी. त्या लढण्याला आत्महत्त्या म्हणतात.''

''काहीही म्हण!'' गोली बेदरकारपणे म्हणाला.

''आता... ?''

''मागे वेढा आहे का, बघ.''

गगनने मागच्या दाराच्या फटीतून पाहिलं.

एकदम वाळवंटच नजरेसमोर.

''नाही.''

''नक्की ?''

''नक्की.''

''दार उघडून बघ. बाहेर डोकावू नकोस पण.''

गगनने धडधडत्या अंत:करणानं दार उघडलं. बाहेर लोटलं.

एकही गोळी दरवाज्याच्या दिशेनं आली नाही.

''दीदार, वेळ संपत आली आहे. आपण आता निर्णयावरून मोठमोठ्यानं भांडायला सुरवात करू; म्हणजे तो आपली भांडणं मिटण्याची वाट पाहत बाहेरच थांबेल.''

दीदारने मान डोलावली. तो ओरडला....

''मूर्खांनो ! समजत कसं नाही तुम्हाला ! त्याला आपण अभय द्यायला नको ?''

गगनने लगेच विरुद्ध बाजू घेतली.

''हे बघ दीदार, त्याला तर वाचवणं दूरच, आपण आपलंही रक्षण करू शकणार नाही. त्या अब्रानची माणसं आपली चटणी करतील !''

''हो !'' गोलीने पुष्टी दिली. ''त्यापेक्षा आपण त्याला निमूटपणे त्याच्या ताब्यात देऊन टाकू. आपण त्याला वाचवायचा प्रयत्न केला. आता तो आणि त्याचं नशीब ?''

अब्रान दाढी कुरवाळत, मिशांना पीळ देत त्यांचं भांडण ऐकत होता. पण भांडणाबरोबरच आत काही हालचालीही चालू आहेत, ह्याची त्याला कल्पना नव्हती.

गोलीने चुचकारून आपलं घोडं मागच्या दारापाशी बोलवलं होतं; आणि आळीपाळीनं दोघेजण भरतचा देह घोड्याच्या पोटाशी मजबूतपणे बांधत होते.

शेवटी तो घोड्याच्या पोटाला पूर्णपणे चिकटला. दोरीची गाठ सुटणार नाही, याबद्दल खात्री पटताच गोलीने घोड्याचं तोंड नैर्ऋत्येकडे वळवलं, त्याचा खुंटाचा दोर गळ्यापाशी कापून टाकला; आणि त्याच्या पुट्ठ्यावर

हलकीशी थाप मारली.

थापेचा अंदाज घेऊन घोडं दुडक्या चालीनं वाळवंटाच्या दिशेनं पळत सुटलं.

''आता तो वाळवंटात तरी घुसेल; किंवा माझ्या घरी जाऊन उभा राहील.''

''पण वाळवंटात...''

''संध्याकाळपर्यंत येईल परत!''

''चुकणार नाही ना?''

''नाही.''

''नाहीतर शुद्धीवर आला, तरी त्याला आपली सुटकासुद्धा करून घेता येणार नाही आणि...''

''दीऽदाऽऽर!''

बाहेरून अब्रानची हाक आली.

''आता मी थांबू शकत नाहीऽऽ!''

''आम्ही कैदी तुझ्या स्वाधीन करतो आहोत.''

दीदार मोठ्यानं म्हणाला. अब्रान खदाखदा हसला.

त्याच वेळी घराचा दरवाजा खाड्कन उघडला गेला. बंदुकीची नळी भस्दिशी बाहेर आली. पाठोपाठ दीदार.

दार उघडण्याच्या त्या प्रकारानं अब्रान सावध झाला. कसलाही विचार न करता त्याने एका अंगाला सूर मारला.

त्याच वेळी दीदरच्या बंदुकीतून दणाणत सुटलेली गोळी अब्रानच्या दंडाला चाटून पुढे निघून गेली.

''दगाबाऽज...'' अब्रान कळवळून ओरडला.

त्याचं ओरडणं आणि बंदुकीचा आवाज या गोष्टींचा योग्य समन्वय घालून अब्रानची टोळी उधळत्या वेगात येऊन पोहोचली.

दीदारने पुन्हा आत येऊन दार लावून घेतलं. त्याने आणि गगनने दाराची आणि खिडकीची फ्रंट पकडली.

''नेस्तनाबूद करा ते घरं!''

संतापानं घराकडे बोट दाखवत अब्रान ओरडला. घोडेस्वारांनी झटकन् घराला वेढा दिला.

''घोडा उडवा तो!''

मग बंदुकीचा आवाज.

घोड्याचं खिकाळणं.

धप्प्!

''कोणी पळून जाऊ नये म्हणून तुझा घोडा उडवला दीदार त्यांनी.''

''उडवू देत. गंमत पहा आता....''

दीदार म्हणाला. दाराची फट थोडी मोठी करत त्याने सेफ्टी कॅच रिलीज केला आणि झटकन् गोळी झाडली.

एक स्वार कपाळावर कुंकवाची टिकली रेखाटल्यासारखी जखम घेऊन, मग कपाळ रक्तानं माखवत खाली कोसळला.

दुसरा...

तिसरा...

''थांबा!'' गोली एकदम म्हणाला, ''गोळ्या वाया नका घालवू.''

''वाया? एका गोळीला एक माणूस टिपला की!''

''तसं नाही, एका गोळीला चार माणसांचं प्रमाण देतो मी तुम्हाला!''

''हा कुठला नवीन शोध?''

''मला कव्हर द्या, बस!''

''तू बाहेर पडणार?''

''होय; त्याशिवाय इलाज नाही. मी एकेकाला या अडसरानं ठोकून काढतो. तुम्ही, मी ज्या बाजूला असेन, तिकडे लक्ष ठेवा. माझ्यावर नेम

धरणारा तेवढा अचूक उडाला पाहिजे.''

''नाही! तू....''

दीदारने आपलं वाक्य अर्धवट सोडलं आणि स्वत:शीच शिव्या देत तो सावधपणे बाहेर पाहायला लागला.

बोलून काय उपयोग?

अडसर घेऊन गोली केव्हाच बाहेर पडला होता.

एका तरुणाला असं लाकडी दांडकं घेऊन बंदुकींच्या वेढ्यात शिरताना पाहून अब्रानची छाती दडपली.

अरे, काय हा वेडेपणा?

तुझा तो अडसर का बंदुकीच्या गोळ्या अडवणार आहे?

शुद्ध आत्महत्त्या आहे ही!

पण त्याचा तो भ्रम पुढच्या काही सेकंदांतच दूर झाला.

मेंढ्यांच्या कळपात वाघाने शिरावं, तितक्या बेदरकारपणे तो वेढ्यात घुसला; आणि क्षणार्धात त्याच्या हातातला अडसर त्याच्या शरीराभोवती गरगर फिरत अब्रानची माणसं फोडायला लागला.

डोळ्याची पापणी लवते न लवते, तोपर्यन्त गोलीने त्याची चार माणसं तडातड उडवली.

अब्रानचा आ वासला गेला.

साला, या जवानाला गावाने मदत केली, तर तौलीच्या वाटे जाण्याचं धाडस होणार नाही कोणाचं!

काय हा वेग!... काय आवेश!

दोघा-तिघांनी त्या आश्चर्याच्या धक्क्यातून सावरत गोलीवर बंदुका रोखल्या; पण त्यांचे हात काही ट्रिगर दाबू शकले नाहीत.

घरातून फटाफट गोळ्या आल्या.

एकाची बरगडी खलास...

दुसऱ्याच्या दंडाचा चुराडा...

तिसऱ्याच्या गळ्यात गोळी!

अन् मग धोका अब्रानच्या लक्षात आला.

त्यांना तोंड द्यावं, तर हातातल्या अडसरानं हा कपाळमोक्ष करत राहणार; आणि ह्याच्याकडे लक्ष द्यावं, तर ते एकेकाला टिपत ह्याला संरक्षण देत राहणार!

शाबास!

विजेच्या चपळाईनं गोली त्यांच्यात गरगरत होता. अब्रानची माणसं हातात बंदुका असून त्याच्यासमोर निष्प्रभ ठरत होती.

पण लाठी फिरवत राहणं; आणि टोलेजंग अडसर फिरवणं, यात फरक आहे. दहा-पंधरा मिनिटं पहिला आवेश टिकला. नंतर त्याचे दंड भरून आले. हालचालींतला चपळपणा कमी व्हायला लागला.

तरी तोपर्यंत पठ्ठ्याने अब्रानची नऊ माणसं फोडली होती.

सहा-सात जणांना त्या दोघांनी उडवलं होतं.

आपण आता फार काळ टिकत नाही, हे लक्षात येताच गोलीने यशस्वी माघार घ्यायला सुरुवात केली. तो मागे-मागे यायला लागला.

त्याला घराकडे येताना पाहून दीदार आणि गगन आणखीनच सावध झाले. तो थकला आहे, याचा कोणीतरी फायदा घ्यायचा प्रयत्न करणार, हे त्यांच्या लक्षात आलं.

दोघा-तिघांनी प्रयत्न केलेही; पण दोघांनी त्यांना अचूक टिपलं.

गोली थेट दारापर्यंत पोचताच, दीदारने झेप घेऊन त्याला आत खेचलं. गोली एकदम उडाला आणि आतल्या बाजूला कोसळला.

"गोली–"

"दार लाव आधी!"

दीदारने झटकन् दार लावलं. दार बंद होता-होता दारावर गोळ्यांचा

वर्षाव झालाच.

''त्याचा आंगठा गेला दीदार ?''

गगन कळवळून म्हणाला.

''जाऊ देत !'' गोली शांतपणे म्हणाला, '' आंगठा गेला, तरी गोली जिवंत आहे.''

दोघांनी त्याची जखम फडक्यानं पुसली.

मुख्य म्हणजे, गोळी लागली होती; पण आंगठ्यात घुसली नव्हती. नुसती जखम होती. त्यांनी पाय तात्पुरता बांधून रक्तस्राव थांबवण्याचा प्रयत्न केला; पण फडक्यामधूनही रक्त झिरपत राहिलं.

''तू पाय वर करून पडून रहा; रक्त थांबेल.''

तो नको-नको म्हणत असतानाच दोघांनी त्याला उचलून चारपाईवर ठेवला. त्याच्या पायांखाली आधार दिला.

''दीऽदाऽऽर...!''

दीदारने दात-ओठ खात गगनकडे पाहिलं.

''मी तीन मिनिटांत घराला आग लावणार आहे.''

''गगन,'' दीदार पुटपुटला, ''त्यांनी गोलीला जखमी केलं ना... आता तर नाहीच माघार घ्यायची !''

''आपल्याला माघार घ्यावी लागेल.''

''का ?''

''घराला त्यांनी आग लावल्यावर गोली कसा पळू शकणार ?''

''अरे, मेरी बात छोडो ! प्रसंगी दहा मैल पळू शकेन मी !''

''होऽ, पण–''

''पाय तुटला, तरी पळेन. माझ्याकरता माघार नाही घ्यायची !''

''आणि त्यांचा तरी तेवढा जोर कुठे उरलाय् ? आठ-दहाजण उरले असतील जेमतेम !''

त्यांची ही बोलणी चालू असतानाच घराच्या छपरावर काहीतरी टपकलं.

तिघांनी त्या टपकण्याचा अर्थ ओळखला.

पहिला बोळा पडला होता. घराला आग लावण्यात आली होती.

''बेरहम! काफर की औलाद! आग लावलीच त्यांनी.''

''आता...?''

''बंदुकीत गोळ्या भरा.''

''आणि–?''

''चला, बाहेर पडू. ह्याला कव्हर देऊ आपण.''

''दोन बंदुका उघड्या जागेत आठ-नऊ बंदुकांशी कसा सामना देणार?''

''दीदार, माझं ऐकशील?''

''काय गोली?''

''त्या दोन्ही बंदुका माझ्याकडे द्या, मला मागच्या बाजूच्या घोड्याला खायला घालण्याच्या चौथऱ्याआड बसवा; आणि तुम्ही वाळवंटाच्या दिशेनं पळायला लागा.''

''नाही.''

''तिघांनी मरण्यापेक्षा एकानं मेलेलं चांगलं नाही का?''

''पण तो तूच का?''

''कारण मी जखमी आहे.''

घराच्या भिंतीवर काहीतरी आपटलं, भिंत हादरली; आणि वरच्या दोन विटा कोसळल्या.

''जा दीदार! आपल्याजवळ वेळ फार कमी आहे.''

दीदारने क्षणभर विचार केला. मग त्याचे डोळे लकाकले.

''चल गगन, तो सांगतो तसं कर.''

गगनने आश्चर्यानं दीदारकडे पाहिलं.

''दीदार, तू असं सांगतोस–?''

''होय. आपल्याजवळ वेळ कमी आहे. एक-एक क्षण मोलाचा आहे.''

गोली मंदपणे हसला.

दीदार आपल्याला एकट्याला सोडायला का तयार झाला, ते त्याच्या बरोबर लक्षात आलं होतं.

''गोली, मोजून पंधरा मिनिटं अडव त्यांना. हं?''

त्याने बंदुकीच्या नळ्या कुरवाळत संथपणे मान डोलवली.

* * *

सहा

अब्रानला चक्रावल्यासारखं झालं.

दोघंजण वाळवंटाच्या बाजूकडून गावाला समांतर धावत होते.

तिसरा.... ?

त्याला गोळी लागली की नाही; आणि लागली असेल, तर कुठे लागली, ते अब्रानला समजू शकलं नव्हतं. त्यामुळे, तो वाचला, असं तो गृहीत धरून चालला होता.

पण आता मात्र त्याला शंका येत होती.

तो मेला असणार!

नाहीतरी त्याला टाकून हे दोघं पळणार नाहीत.

"मम्मू, त्यांचा पाठलाग करा!"

स्वत: घोड्यावर स्वार होऊन अब्रान ओरडला.

घोडी सुटली.

पुन्हा एकदा त्याला फसायला झालं.

आठापैकी तीन जणं पाठीत भोकं पडून मेले.

गोळ्या थेट मागच्या बाजूनं.

म्हणजे... तो जिवंत आहे!

मघाशी त्यांनी ह्याला कव्हर केलं होतं; आता हा

त्यांना कव्हर करतोय्!

आधी या चिमुरड्या गावातल्या केवळ तीन तरुणांनी कोणाचीही मदत नसताना आपल्याला दाद दिली नाही, म्हणून अब्रान खवळला होता. त्याची सोळा माणसं या तिघांनी उडवली होती.

त्यात ही भर...

एकोणीस संपले!

आणि हे असेच चकवण्यात यशस्वी होत राहिले, तर आपल्यासकट जे सहाजण उरले आहेत, तेही संपायला वेळ लागणार नाही.

''तुम्ही त्या दोघांना ताब्यात घ्या. मम्मू, घाबरू नका. त्यांच्याजवळ बंदुका नाहीत. मी त्या तिसऱ्याला पाहतो.''

पाचजण त्याच्या मागावर सुटले.

एकटा अब्रान परत फिरला.

मात्र, गोली कुठे आहे, ह्याचा अंदाज घेऊन त्याने आपली दिशा बदलली होती.

गोली चौथऱ्याच्या मागे लपून बसला होता. बसल्या-बसल्या तीन जण त्याने टिपले होते.

पण आता त्याला काहीच उद्योग नव्हता. घोडेस्वार दोघांचा पाठलाग करत बंदुकीच्या रेंजबाहेर गेले होते.

रिकामपण आल्यानंतर गोलीला पायाचा ठणका जाणवला. इतक्या वेळात पहिल्यांदा तो अस्पष्टपणे कण्हला.

मग दोघांना त्यांच्या नशिबाच्या हवाली करत त्याने एकदा जळक्या घराकडे पाहिलं.

एव्हाना छप्पर कोसळून पडलं होतं; आणि घराने चारी बाजूंनी पेट घेतला होता. बसल्याजागी घराची उष्णता त्याचं अंग भाजत होती.

गावाकडे पाहत तो विषण्ण हसला. मग पचकन् थुंकला.

''मुर्दाड साले!''

त्या एका शब्दात गावाबद्दलचा त्याचा सगळा राग व्यक्त झाला होता.

गावातलं एक घर जळत होतं; आणि आग विझवायला एकही माणूस पुढे सरसावला नव्हता. रस्ते ओस. माणसं घरांतून लपून बसली होती.

आणि याच मुर्दाड गावावरची कित्येक आक्रमणं दीदार, गोली आणि गगन या तिघांनी स्वत:वर झेलली होती; जिवावर उदार होऊन गावाला प्रत्येक वेळी संकटातून वाचवलं होतं.

एकदा त्याला वाटलं, असंच उठावं आणि याच जळक्या वाश्यांनी सगळ्या गावाला आग लावून द्यावी.

गावाबद्दल निराशाजनक विचारांनी त्याच्या तोंडात कडवट चव निर्माण झाली; आणि कपाळाला आंठ्या घालत तो पुन्हा थुंकला.

अन् त्याच वेळी त्याच्या अंगावर कोणाचीतरी सावली पडली.

तो विलक्षण दचकला; पण एकदम मागे वळला नाही.

शेजारी दोन बंदुका होत्या; पण हालचाल करायला संधी नव्हती.

त्यांच्यातल्याच कोणीतरी त्याला अलगदपणे गाठलं होतं.

मागच्या माणसाचं अस्तित्व आपल्या लक्षात आलं नाही, असं दाखवत गोली चौथऱ्यावर डोकं टेकवून शांतपणे बसून राहिला.

सावली अलगदपणे पुढे सरकली.

त्याच्या अगदी मागे कोणीतरी येऊन उभं राहिलं.

गोलीला आश्चर्यचकित करून धक्का द्यावा, या हेतूनं अब्रान त्याच्या अगदी कानाशी वाकला आणि पुटपुटला –

"अजिबात हालचाल करू नकोस गोली, माझ्या –"

अन् उलटाच परिणाम झाला.

गोलीने ताडकन् डोकं मागे नेलं आणि त्याच वेळी हातावर शरीराचा भार देत त्याने आपल्या तंगड्या जीव खाऊन मागे उडवल्या.

अब्रानचा वरचा श्वास वर, खालचा खाली!

अक्षरश: फेकला गेला तो!

पण हातातलं रिव्हाल्व्हर मात्र त्याने चिवटपणानं धरून ठेवलं होतं.

बसलेला दणका पार सॉलिड होता.

नाकावर गोलीचा टणक हंडा आपटला होता; आणि त्याने झाडलेल्या लाथा ओटी-पोटीत बसल्या होत्या.

डोळे पांढरे व्हायची वेळ आली अब्रानवर!

तेवढा वेळ गोलीला हालचाल करायला पुरेसा होता. त्याने झटकन् बंदुकीला हात घातला आणि पलटी घेऊन तो मागे वळला.

अन् त्याच वेळी अब्राननेही लोळण घेतली.

गोळी चुकली.

मग बघता-बघता पारडं फिरलं.

गोलीच्या दुर्दैवानं त्याची बंदूक ऑटोमॅटिक मोशनची नव्हती; आणि चेम्बर फिरवून सेफ्टी कॅच पुन्हा रिलीज करण्याइतका वेळ त्याला द्यायला अब्रान मूर्ख नव्हता.

अब्रानच्या रिव्हॉल्व्हरमधून सट्‌क्न एक गोळी सुटली.

गोलीच्या हातातून बंदुक गळून पडली. त्याचा हात लुळा पडला.

उजव्या हाताचं मनगट रक्तबंबाळ!

अब्रान भयाण हसला.

गोली अगदी शांत उभा राहिला.

पण अब्रान आता त्याच्यावर एक कण विश्वास टाकायला तयार नव्हता. हा तरुण खतरनाक आहे; आणि संधी मिळालीच, तर तो पुन्हा प्रयत्न करेल, हे त्याला केव्हाच कळून चुकलं होतं. गोलीला आता तो एकही संधी देणार नव्हता.

"त्या बंदुकांपासून बाजूला हो. बाहेर ये... आणखी... आणखी... हं, थांब. सरक. तिकडे.... थांब पलीकडे... बस्स!"

गोली आता अगदी मोकळ्या जागेत उभा होता. मनात आणलं, तर एका गोळीत अब्रान त्याला थंड करू शकणार होता.

गोलीच्या हातात आता खरंच काही उरलं नव्हतं.

सगळं गाव गर्भगळित होऊन घरा-घरांतून लपून बसलं होतं. दारा-खिडक्यांच्या भोकांना डोळे लागले होते.

आणि ज्या तिघांवर मृत्यूची टांगती तलवार होती, ते तिघं छाती ताणून बेदरकारपणे अब्रानच्या नजरेला नजर देऊन उभे होते.

गोलीच्या हाता-पायांतून खूप रक्त गेल्यामुळे त्याला खूप थकवा आला होता; पण त्याचा धूर्तपणा लक्षात घेऊन त्याला कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आली नव्हती. तिघांची झडती घेऊन त्यांचे हात मागे बांधण्यात आले होते. त्यांच्या पायांतही दोरांचे फास टाकलेले होते. फासांचं एक-एक टोक अब्रानच्या माणसांनी धरून ठेवलेलं होतं; आणि तिघांनाही एकमेकांपासून दहा-दहा फुट अंतरावर उभं करण्यात आलं होतं.

या तिघांत गगन जरा कच्चा आहे, हे ओळखून अब्रानने आपला मोर्चा गगनकडे वळवला.

आधी काही न बोलता त्याने बंदुकीच्या संगिनीचं टोक सपकन् गगनच्या पायात खुपसलं. अपार वेदनेनं गगन किंचाळला.

''गगन, भरत कुठे आहे?''

''मला माहीत नाही.''

''ठीक आहे.''

खस्दिशी संगिनीचं टोक उपसलं गेलं;

आणि पुन्हा त्याच जागी भस्दिशी रुतलं.

गगन प्राणपणानं किंचाळला.

''गगन, भरत कुठे आहे?''

''माहीत नाही.''

''ठीक आहे.''

संगीनीचं टोक या वेळी बाहेर आलं नाही. अब्रानने शांतपणे बंदूक फिरवायला सुरवात केली. पाय आतून खरवडला गेला आणि बेंबीच्या

देठापासून ओरडत गगन खाली बसला.

''गगन, भरत–''

''माहीत नाही.''

''वा! पीळ भारी आहे.''

''असणारच!'' तीव्र स्वरात गोली म्हणाला, ''आम्ही मौलवीच्या मेलेल्या अन्नावर पोसलेलो नाही.''

अब्रानला गोलीचं ते बोलणं फार लागलं. वरकरणी हसत त्याने गगनच्या पायात रोवलेली बंदुक तशीच खुपसती सोडून दिली आणि तो गोलीच्या दिशेनं वळला.

''गोली, तू कृपा करून मध्ये बोलू नकोस. तुझ्या शस्त्रापेक्षाही तुझी जीभ जास्त तिखट आहे. माझा तोल गेला, तर मी तुझं मुंडकं उडवून टाकीन.''

''मग, वाट कशाची पाहतोयस?''

''तुझ्याशी मी द्वंद्व खेळणार आहे. त्यात जिंकलास, तर पुढे काय, हा प्रश्नच येणार नाही. कारण, मी तेव्हा मेलेला असेन. पण मी जिंकलो, तरी मी तुला मारणार नाही. तुला आणि दीदारला मी भेरीला घेऊन जाईन. तुला इस्लाम धर्माची दीक्षा दिली जाईल आणि...''

गोली इतका वेळ गप्प का बसला होता, ते आता अब्रानला समजलं. तो तोंडात थुंकी साठवत होता.

अब्रान जवळ येताच तो पचदिशी त्याच्या तोंडावर थुंकला.

मग मात्र अब्रानला संताप अनावर झाला. एक किंकाळी फोडत त्याने गोलीच्या पोटात गप्कन् लाथ घातली.

गोली मागे धडपडला, खाली पडला; आणि त्याच्या जखमी पायावर अब्रानने आपला जाड बुटाचा पाय चोळमटला.

गोलीच्या तोंडातून हूं नाही, का चूं नाही!

थोडा वेळ गोलीला लाथा-बुक्क्यांनी तुडल्यावर अब्रान शांत झाला.

''गोली, दीदार तुझा मित्र आहे ना?''

''होय.''

''मग तो मुसलमानच आहे की!''

''मैत्रीत काय फरक पडतो?''

''तू इस्लाम धर्माचा राग का करतोस मग एवढा?''

''अब्रान, तू असा असंबद्ध आणि निर्बुद्ध प्रश्न विचारावास, यात काही नवल नाही. तुझ्या त्या निर्बुद्ध आदिल मौलवीच्या मठ्ठ भाषणांचा, प्रवचनांचा परिणाम झाला असणार तुझ्या मनावर! धर्म कशाशी खातात, असा प्रश्न त्या धर्मांध मौलवीसमोर पडलेला; तिथे तू तरी निराळी बुद्धी काय दाखवणार? देवळं तोडून त्या जागी मशिदी बांधणं आणि हिन्दूंना जबरदस्तीनं इस्लाम धर्माची संथा देणं, यालाच इस्लाम धर्माचा गाभा मानता तुम्ही! कोणताही धर्म असला, तरी तो आपापल्या स्थानी श्रेष्ठ असतो, हे कसं कळणार तुम्हाला? एक हिन्दू तरुण आणि एक मुसलमान यांच्यात अतूट मैत्री कशी निर्माण होते, असा प्रश्न पडतो तुम्हाला!

''लक्षात ठेव अब्रान, मी संताप व्यक्त करतोय तो इस्लामबद्दलचा नाही; पण त्या धर्माची तत्त्वं अंधपणे राबवून त्यांचा अपमान करणाऱ्या मौलवी नि त्याच्या अनुयायांचा!''

''त्याच मौलवीसमोर तुला मी गुडघे टेकून नाक घासायला लावीन.''

''चुकीची कल्पना आहे तुझी! तुझ्या सात पिढ्या खाली उतरल्या, तरी शक्य होणार नाही ते.''

अब्रान त्याच्या आव्हानाकडे तात्पुरतं दुर्लक्ष करून पुन्हा गगनपाशी आला.

गगनची अवस्था फार कठीण होती. त्याचा पाय तसूभर हलला, तरी संगिनीवर उभी असलेली बंदूक डोलायला लागत होती आणि वेदनांचा डोंब उसळत होता.

अब्रानला आपल्या दिशेनं पुन्हा आल्याचं पाहून गगनच्या पोटात गोळा उठला. त्याचे डोळे भीतीने डबडबले.

''गगन...''

''ए! तू मलाच काय धरलंयस्?''

''भरतला कुठे लपवलं, ते मला तुझ्याकडून कळायला हवं गगन.''

''पण मलाही ते माहीत नाही.''

''असं कसं?''

''मी झोपलो असताना त्या दीदारने हा उद्योग केला आहे.''

''मी सांगतो...'' शांत स्वरात दीदार म्हणाला.

अब्रान गर्रकन् त्याच्या दिशेनं वळला.

''बोल!''

''तो बघ... वाळवंटातून येतोय!''

अब्रानने वाळवंटाकडे वळूनही न पाहता फाडकन् दीदारच्या तोंडा भडकावली. दीदारचा ओठ फाटून त्यातून रक्त आलं.

''मी चेष्टा करत नाही अब्रान, तू खरंच वाळवंटाकडे नजर टाक.''

अब्रानने पाहिलं.

एक घोडा दुडक्या चालीनं गावाकडे येत होता.

पण त्यावर स्वार नव्हता.

''घोड्याचं रूप घेतलं काय त्याने?''

''नाही.''

''मग, मला तो घोड्यासारखा का दिसतोय्?''

''कारण तो घोडाच आहे!''

''मग भरत कुठाय?''

''त्या घोड्याला जरा पुढे येऊ देत. तुला भरत दिसेल.''

गोलीने एकदा पश्चिमेकडे सरकणाऱ्या सूर्याकडे पाहिलं, एक आपल्या दिशेनं येणाऱ्या घोड्याकडे पाहिलं; आणि मग तो दीदारकडे पा हसला.

त्याने सांगितल्याप्रमाणे घोडं बरोबर दीदारच्या घरापाशीच आलं हो

अब्रान घोड्याकडे पाहत होता. तो जवळ-जवळ येत चालला, तसा घोडाच्या पोटाला बांधलेला माणूस त्याला दिसला.

"तो... तो भरत आहे ?"

त्याने आश्चर्यानं विचारलं.

"होय."

अब्रानने खूण करताच एकजण धावला, पुढे होऊन त्याने घोडं पकडलं; आणि त्याच्या भोवतीचा दोर कापून भरतला जमिनीवर ठेवलं.

"तो बेशुद्ध आहे."

"जा, त्या गोरक्षला घेऊन या."

दीदारने चमकून गोलीकडे पाहिलं.

केव्हापासून दोघांच्याही डोक्यात तो प्रश्न सलत होता...

अब्रानला खात्रीलायक बातमी समजली कशी ?

आता त्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं.

अब्रानने गोरक्षलाच ताब्यात घेतला होता.

मग बरोबरच ! तरीच तो आला नाही.

थोड्या वेळानं गोरक्ष आला.

कपडे फाटलेले, जागोजागी माराच्या खुणा, चेहरा काळा-निळा पडलेला; आणि डोक्याला टेंगळं !

आल्या-आल्या तो दीदारच्या गळ्यात पडून रडायलाच लागला.

"फार मारलं त्यांनी मला; नाहीतर मी त्याला काही सांगितलं नसतं. घरच्यांनाही भोसकून ठार मारतो म्हणाला. मग माझा नाइलाज झाला."

"मी तुला दोष देत नाही गोरक्ष. तू या प्रकारातला नाहीस. इतका मार खाईपर्यंत तू दम धरलास, हेच मी खूप समजतो."

"हा सगळा मार एकाच वेळी दिला त्याने ! आपल्याला का मारण्यात येत आहे, तेही मला समजलं नाही." रागा-रागानं अब्रानकडे पाहत गोरक्ष म्हणाला. "नाही तर, इतका मार कशाला खावा लागला असता मला ?"

''गोरक्ष, आता त्या भरतकडे बघणार का जरा ?'' अब्रानने पुढे होत विचारलं.

त्याला पुढे येताना पाहून गोरक्ष टरकला. दीदार बांधला गेला आहे, तो आपलं रक्षण करू शकणार नाही, हे विसरून तो झटकन् दीदारच्या मागे लपला. मग आवेशात म्हणाला,

''नाही बघत जा ! हरामखोर लेकाचा !''

अब्रान खदखदून हसायला लागला.

''गोरक्ष, तो सांगतो, तसं कर.''

शांतपणे दीदारने सांगताच, खरी परिस्थिती त्याच्या लक्षात आली. तो गंभीर झाला.

मग एकाएकी त्याला एक कल्पना सुचली.

''मी त्याला तपासेन; पण माझी अट आहे.''

''कोणती ?''

''त्याच्यावर मी प्राथमिक उपचार करीन. त्याला काय झालं आहे; त्याला काय औषधं दिली, ते मी एका चिठ्ठीत सविस्तर लिहीन. त्यातच पुढचे उपचारही लिहीन.''

''कशाकरता पण हे ?''

''भेरीला अल्लाह वलीद नावाचा हकीम आहे.''

''हो, आहे.''

''त्याच्याकडून तुम्ही हे उपचार करवून घ्या त्याच्यावर.''

''का, तुला करता येणार नाहीत ?''

''येतील; पण मी करणार नाही.''

''अरे, का पण ?''

''अब्रान, हा तुझा कैदी महत्त्वाचा आहे. तुला तो भेरीला नेलाच पाहिजे. आणि तो भेरीपर्यंत जिवंत राहावा, असं वाटत असेल, तर त्याच्यावर मी औषधोपचार करणं आवश्यक आहे. तर माझी फी म्हणून तुला या तिघांना

सोडून द्यावं लागणार आहे. ते इथून गेले, तरच मी भरतला हात लावणार आहे.''

गोरक्षने टाकलेला पेच पाहून दीदारही जाम खूष झाला.

नाही तरी, भरत अब्रानच्या हाती गेला होता. मग उगाच मरण्यात काय अर्थ आहे ? त्यापेक्षा जगलो-वाचलो, तर अब्रानला पाहून घेता येईल.

अब्रानला मात्र काय करावं, सुचेना. तो गोंधळात पडला. गोरक्षने ते ओळखून पुढची चाट मारली.

''लवकऽर.... त्याची हालत... फार खराब वाटतंय मला!''

''ठीक आहे.'' अब्रान एकदम निर्णयावर येत म्हणाला, ''सोडा त्यांना! दीदार, तुम्ही तिघं कोणत्याही प्रकारे गडबड न करता इथून नाहीसे व्हा. गडबड केलीत, तर मी गोरक्षची मान उडवीन.''

तिघांची सुटका होताच दीदारने गोली आणि गगनला आधार दिला; आणि त्यांना घेऊन तो निघून गेला.

ते नाहीसे झाल्यानंतरच गोरक्ष भरतकडे वळला.

त्याने त्याची नाडी तपासली. त्याच्या शरीराला काळी तेलं लावली. ती चांगली चोळली. मग अल्लाह वलीदच्या नावे एक पानभर उपचारांची चिठ्ठी लिहून अब्रानच्या हातात दिली.

''अब्रान, लवकर जा. ह्याच्यावर झटकन् उपचार होणं आवश्यक आहे.''

''पण... मेला नाही ना तो ?''

''वेडा आहेस काय ? जा लवकर; नाही तर मरेल.''

अब्रान भरतला घेऊन त्याच्या पाच साथीदारांसह निघून जाताच गोरक्षभोवती गाव जमा झालं. दीदार, गोली आणि गगनही आले.

''गोरक्ष....''

''दीदार, बंदोबस्ताच्या तयारीला लाग.''

''का ?''

"तुम्ही त्या भरतकरता प्राणपणानं लढत होतात. पण गाढवांनो, त्याला मरून आता चौदा तास होऊन गेले आहेत. भेरीत त्यांना हे समजेल; आणि...!"

दीदार आणि गोली त्याच्या तोंडाकडे आ वासून पाहतच राहिले!

* * *

सात

त्याच्या बरोबरच्या माणसांइतकीच मुक्कामावर पोहोचण्याची त्यालाही घाई झाली होती. दोन दिवसांच्या अविश्रांत मेहनतीनं आणि प्रवासाच्या दगदगीनं त्याच्या शरीराचा भाग न् भाग विश्रांती मागत होता.

वाळवंटातून घोड्यावरचा प्रवास करणं म्हणजे गंमत नाही.

दिवसा करावा, तर सूर्याच्या उन्हानं शरीर वितळायला होतं – स्टोव्हवर धरलेल्या प्लॅस्टिकसारखं!

रात्री शरीर पार कुडकुडतं. रस्ता चुकण्याचा धोकाही प्रचंड प्रमाणावर असतो.

आणि घोड्याचे पाय धसत असतात, ते निराळेच!

दोन दिवसांत सत्तावीस मैलांचं वाळवंट तुडवून ते तौलीला आले होते; आणि आता परत भेरीला चालले होते. रात्र संपत आली होती. गाव अवघं मैल-दोन मैल राहिलं होतं.

आता धीर धरवत नव्हता.

सकाळी-सकाळी 'लोटा–परेड'ला नंबर लागावा; म्हणून माणूस नंबरात तासभरसुद्धा सहनशीलपणे उभा

राहतो; पण आत गेल्यावर नाडीची निरगाठ बसली, तर शांतपणे ती सोडवण्यापेक्षा त्याचा कल ती हिसका-हिसक करून तोडण्याकडेच असतो.

त्यातलाच प्रकार हा!

पण त्यांच्या दुर्दैवानं त्यांना भरधाव घोडे फेकून गाव गाठता येत नव्हतं. इतर वेळी स्पर्धात्मक वेगात त्यांनी घोडी गावात घुसवली असती एव्हाना; पण या वेळी तसं करणं शक्य नव्हतं.

त्यांच्याबरोबर एक महत्त्वाचा कैदी होता; पण तो बेशुद्धावस्थेत होता

''अब्रान,''

''हं, बोल मामू.''

''त्याला आधी अल्लाह वलीदकडे न्यायचा, का मौलवीकडे?''

''मी तोच विचार करतो आहे.'' दाढी कुरवाळत अब्रान म्हणाला.

''आधी वलीदकडे न्यावा, तर मौलवी म्हणणार, त्याला इकडेच का नाही घेऊन आलात?''

''पण आधी वाड्यावर नेला, तर असंही म्हणतील – मूर्खांनो, त्याला आधी वलीदकडे न्या! मरेल तो!''

''मग ....?''

अब्रानने चिडून कैद्याकडे पाहिलं.

तो आपला आरामात!

एका काठीला दोन बाजूला पक्क्या गाठी मारून लंबुळकी झोळी केलेली. त्यात कैदी झोपलेला. दोनजण एकीकडे घोडे पुढे-मागे होऊ नयेत; म्हणून काळजी घेत काठीची टोकं सांभाळतायूत!

''इस काफर की औलाद ने तो नाक में दम कर दिया।''

''हाँ; पण काय करायचं तरी काय?''

''आपण असं करू. हे दोघं त्याला घेऊन माझ्याबरोबर अल्लाह वलीद मियाँकडे चलतील; तुम्ही पुढे होऊन मौलवींना खबर द्या!''

''वाह! क्या गजहब का दिमाग पाया है अबान तूने!

गावाजवळ येताच त्यांच्यात फाटाफूट झाली. दोघं मौलवीच्या वाड्याच्या दिशेनं वेगात उधळले; अब्रान अल्लाह वलीद हकीम मियाँच्या घराकडे वळला.

वलीदच्या घरासमोर ते येऊन थांबले, तेव्हा हकीम मियाँ नुकतेच उठले होते आणि नमाज पढायला जाण्याची तयारी करत होते. तेवढ्यात दारावर थाप पडली.

''हाँ रसूल, आता हूँ... आता हूँ।''

आतून आवाज आला.

''हकीममियाँ, रसूल नाही; मी अब्रान आहे. एक अत्यवस्थ रोगी आणला आहे. जल्दी दरवाजा खोलो.''

''अब्रान ?''

घाई-घाईत दार उघडलं गेलं. ऐंशीच्या पुढचा खुटखुटीत म्हातारा झपाझप पावलं टाकत बाहेर आला. त्याच्या देहाची काठी झाली होती, डोक्यावरचे केस अल्लाला प्यारे झाले होते, दाढीत शोधूनही काळा केस सापडला नसता, भुवयाही संपूर्ण पांढऱ्या होत्या; पण तब्येत मात्र आजही उत्तम होती. म्हातारा रोज दीड मैल चालत जाऊन नमाज पढून यायचा. समोर कोण आहे, ते कळण्यासाठी आजही त्याला डोळे बारीक करण्याची गरज भासत नव्हती. सर्वसाधारण पदार्थ खाण्याकरता त्याला ते खलबत्त्यानं बारीक करावे लागत नव्हते.

तो बाहेर आला, तेव्हा मरीजला ओसरीवर आणून ठेवण्यात आलं होतं.

बाहेर येताच त्याचं अनुभवी नाक आक्रसलं गेलं. कपाळावर आंठ्या पडल्या.

''ये क्या मजाक है ?''

खणखणीत आवाजात त्याने अब्रानला सवाल केला.

''मजाक ? मरीज ....''

''मेलाय् तो !''

''मेला ?''

''केव्हाच ! त्याला मरूनही खूप तास झाले असतील.''

''मियाँ, एकदा खात्री करून घ्या.''

''अरे, खात्री कसली करतोस ? कुजट वास सुटलाय् ना !''

''नाही, पण तुम्ही बघा.''

म्हातारा रागा-रागानं पुढे झाला आणि मरीजावरचं आवरण त्याने दूर केल.

''ह्याला मरून किमान चोवीस तास झालेत !''

तिघांचे चेहरे खाड्कन् पडले.

चोवीस तास ?

अन् मग त्या गोरक्षने त्याला संध्याकाळी तपासून तेलं-बिलं लावली, हकीम मियाँकरता चिठ्ठी लिहून दिली, हे कसं ?

एकदम त्याच्या डोक्यात प्रकाश पडला.

आपल्याला व्यवस्थित फसवण्यात आलं आहे. प्रेत ताब्यात देऊन, भरत जिवंत आहे आणि त्याने जगवण्याकरता त्याच्यावर त्वरित उपचारांची आवश्कता आहे, असं भासवून त्या गोरक्षने गोली, गगन, आणि दीदारची सुटका करवून घेतली आणि आपल्याला पळवून लावलं.

आपण आपले उल्लू के पट्ठे बनून एका प्रेताला सांभाळून आणत बसलो.

''या प्रेताला तेल कोणी लावलं ?''

विरल दाढीचे पांढरे केस कुरवाळत हकीममियाँने विचारलं.

''ते.... तो एक वैद्य होता. का ?''

''या तेलामुळेच सगळा देह कुजला नाही ! नाही तर तुकडे पडले असते त्या झोळीतच त्याचे !''

''मियाँ, ह्याला मरून नक्की चोवीस घंटे झाले ?''

''कदाचित् त्याहीपेक्षा जास्त !'

''पण.... पण कृपा करून तुम्ही मौलवींना असं सांगाल का, की दोन-तीन तासांपूर्वीच हा प्रवासात मेला आहे.''

''का, असं का ?''

''हा मौलवींच्या कैदखान्यातून पळालेला कैदी आहे. ह्याला शोधून काढण्याचं; आणि त्याला जिवंत परत आणण्याचं काम माझ्यावर सोपवण्यात आलं होतं. मौलवींना कळलं की....''

''अच्छा, अच्छा ! दोन तासांपूर्वी मेला असं सांगेन मी. पण तू शक्यतो लवकर ह्याची लाश दहन करण्याची व्यवस्था कर. कारण तेलाचा परिणाम संपायला आलाय्. जर शरिराचे तुकडे पडले, तर माझा खोटेपणा उघडकीला येईल; आणि मौलवी मला देहातांची सजा फर्मावतील.''

''ते मी पाहतो.''

''जा, जल्दी कर.''

अब्रानने खूण करताच दोघांनी झोळी उचलली आणि ते वेगात बाहेर पडले.

''ए, ती झोळी तशीच हिंदू घाटावर न्या. तिथल्या पंड्याला म्हणावं, दहा-वीस मिनिटांत तुला काय संस्कार वगैरे करायचे असतील, ते करून हे मढं जाळून टाक !''

''अब्रान, मला वाटतं, तू हा निर्णय परस्पर घेऊ नकोस.''

''का ?''

''ह्याला इस्लाम कबूल करायला लावण्याची मौलवींची तमन्ना होती; पण हा पठ्ठ्या तसाच मेला ! निदान त्याचं प्रेत दहन न करता दफनावं, असं त्यांना वाटलं तर...?''

क्षणभर अब्रान बुचकळ्यात पडला.

''ठीक आहे, कबरस्तानात...''

''एका काफराला आपल्या कबरस्तानात कसं दफन करायचं ? मरण्यापूर्वी त्याने इस्लाम धर्म स्वीकारला असता, तरची बात अलग होती.''

''मग असं करा, ह्याला घेऊन तुम्ही वाड्यावर जा!''

''आणि तू?''

''मी माझं निम्मं शरीर दफन करायला पाठवून देतो; आणि निम्मं दहन करायला जाऊ देत!''

''अब्रान, हे... हे... बोलणं चांगलं नाही. आम्हाला काय, तू सांगशील तसं करू आम्ही. ह्याची सगळी जबाबदारी तुझ्यावर होती. आम्हाला काही मौलवीसाहेब विचारणार नाहीत. पण तू संकटात पडू नयेस म्हणून...''

''कबूल आहे दोस्त, पण त्याचं प्रेत मौलवींना न दाखविता त्याची काहीतरी विल्हेवाट लावणं गरजेचं आहे! त्यांच्यासमोर ठेवतानाच प्रेताचा हातबीत गळून पडला तर....?''

''मग....? जाळू, का पुरू?

''जाळा! एवढा हिंदू म्हणून मेला बिचारा, तर त्याच्या पद्धतीनं जाऊ द्या त्याला. आणि कृपा करून वाड्यावर येऊ नका. एकदम संध्याकाळी माझी गाठ घ्या. वाड्यावर काय घडलं, ते मी तुम्हाला सांगून ठेवीन. उद्या त्याप्रमाणेच तुमचे जबाब असू द्या. काय?''

''हाँ!''

ते दोघं गावाला बाहेरून वळसा घालून हिंदू घाटाकडे निघून गेले. धडधडल्या अंत:करणानं अब्रानने घोड्याला टाच दिली.

◇◆◇

''हुजूर –''

त्याच्या चाहुलीसरशी मौलवी गर्रकन मागे वळला. अब्रानला एकट्याला पाहून त्याच्या कपाळावर आंठ्या पसरल्या.

''कैद्याची हालत कशी आहे अब्रान?''

''माफ करा हुजूर.... तो... तो...''

मौलवीने आपली धारदार नजर अब्रानवर रोखली. त्या नजरेने अब्रानच्या काळजाचं पाणी-पाणी झालं.

''कुठाय् तो ?''

''अल्लाह वलीद हकीम मियाँकडे नेला होता त्याला.''

''मग ?''

''मियाँ म्हणतात..... तो तो प्रवासातच मेला केव्हा तरी !''

मौलवी एकदम ताठरला. त्याचे डोळे वटारले गेले.

अब्रान घामानं चिंब भिजला.

''तो आजारी होता ?''

''होय.''

''वाटेत हाल केले असतील तुम्ही त्याचे ?''

''नाही हुजूर. तो कैदी तुम्हाला जिवंत हवा आहे, हे माहीत असताना आम्ही ती गुस्ताखी कशी करू ? प्राणापेक्षा जपला होता त्याला. तेवढ्या करता एक झोळी एक तयार करून त्यात त्याला झोपवला होता. ती काठीला बांधून सावकाश आणला त्याला.''

''मग.... मेला कसा तो ?''

अब्रान खाली मान घालून उभा राहिला.

बोलणार तरी काय ?

मरणाऱ्याला कसं जगवणार ? त्यातून.... तो मेलेलाच ताब्यात मिळाला होता.

पण हे सांगणार कसं ?

''ठीक आहे, घेऊन ये त्याला.''

''का... काय ?''

''त्याचं प्रेत घेऊन ये मूर्खा !''

अब्रान पुन्हा एकदा अंतर्बाह्य ढवळून निघाला.

घेऊन येऊ ?

कुठून घेऊन येऊ ?

भुरू-भुरू जळत असेल की त्याचा देह आता !

''तुला ऐकू आलं नाही का ?''

''क्षमा करावी खाविंद-''

''हंऽ आता काय आणखीन ?''

''जाळला त्याला !''

''जाळला ?''

तारस्वरात मौलवीने विचारलं. दाणदाण पावलं टाकत तो अब्रानच्य जवळ आला.

फडाऽऽड्!

''तुझी ही मजाल ?''

''माझा कुसूर नाही हुजूर. वलीद मियाँनीच मला सांगितलं – त्याला गावातसुद्धा नेऊ नका. आधी जाळून टाका.''

''का ?''

''त्याच्या जखमा चिघळल्या होत्या. त्यात किडे झाले होते. त्याचा संसर्ग झाला असता, तर कोणीतरी आजारी पडलं असतं. त्याचंही शरीर चिघळलं असतं, त्याच्याही शरीरात किडे झाले असते; आणि गावात ती साथच पसरली असती ! म्हणून मी परस्पर निर्णय घेतला. नाही तर मी त्याला घेऊन वाड्यावरच यायला निघाली होतो.''

अब्रानने ऐन वेळी थाप ठोकून दिली होती आणि ती पचली होती. ते किडे कसले होते ? ते संसर्गजन्य कसे ? हे प्रश्न मौलवीच्या डोक्यातही आले नव्हते. अब्रानने योग्य तेच केलं, याबद्दल खात्री पटताच त्याचा राग निवळला.

''ठीक आहे अब्रान, तुझा काहीच दोष नाही.''

अब्रानने सुटकेचा नि:श्वास टाकला.

''कुठे सापडला तो तुम्हाला ?''

''तौलीत.''

''तो..... तो तौलीपर्यंत गेला होता ?''

''होय !''

''ओ हो हो हो ! कयामत का छोकरा था ! तीन दिवस उपाशी राहून, हाता-पायांत बेड्या असताना, त्याने सत्तावीस मैल वाळवंट तुडवून जावं !''

''तौलीने त्याला सहारा दिला होता.'' पुटपुटत्या स्वरात अब्रानने तक्रार मांडली.

''अं ? तौलीत कोणाची हिम्मत झाली ही ?''

''तीन पोरं आहेत – दीदारसिंग, गोली आणि गगन नावाची.''

''अच्छा ! मग त्यांना पकडून का नाही आणलंत ?''

''आज्ञा करा. शंभर माणसं घेऊन जातो.''

''पंचवीस नाही पुरली ?''

''त्यातले आम्ही पाचचजण परत आलो.''

अब्रान शांतपणे म्हणाला.

''इतकी माणसं– ''

''तिघांनी मारली !''

मौलवी अविश्वासानं त्याच्या तोंडाकडे पाहतच राहिला.

''अब्रान, कसं घडलं हे ?''

अब्रानने हकीगत सांगताना, आपण कसे फसलो, तेवढा भाग वगळून सर्व हकीगत मौलवीच्या कानांवर घातली. ऐकताना मौलवी वारंवार आश्चर्यात पडत होता.

अब्रान काही भित्रा नाही, का मठ्ठ नाही.

तरी, केवळ तीन तरुणांनी, दोन बंदुका आणि एका अडसराच्या साहाय्यानं त्याची इतकी माणसं मारली ?

अब्रानची कीव करावीशी वाटली त्याला.

शेवटी तो शांतपणे म्हणाला –

''अब्रान, तुझ्या स्वामिनिष्ठेवर मला शक नाही; म्हणूनच तुझ्या हकीगतीवर विश्वास ठेवतो मी आणि तुला एक संधी देतो. तू आणि सुलतान – पंचवीस माणसं घेऊन जा. कोणत्याही परिस्थितीत परवा सूर्योदयापूर्वी ते

तरुण जिवंत, वा मृत माझ्या समोर हजर झालेच पाहिजेत. समजलं ?''

अब्रानने मान डोलावली.

''आणि –''

आता पुढे काय सांगतो हा ?

''ते जमलं नाही, तर सरळ वाळवंटात तोंड खुपसून आत्महत्त्या करा. परत येण्याची आवश्यकता नाही.

मग अब्रानकडे पाठ वळवून तो आतल्या दालनात निघून गेला.

* * *

आठ

''गोरक्ष –''

''दीदार, बंदोबस्ताच्या तयारीला लागा.''

''का ?''

''तुम्ही त्या भरताकरता प्राणपणानं लढत होतात. पण गाढवांनो, त्याला मरून आता चौदा तास होऊन गेलेत. भेरीत त्यांना ते समजेल; आणि....''

दीदार, गोली आणि गगन त्याच्या तोंडाकडे आ वासून पाहत राहिले.

त्या परिस्थितीत गोरक्षने केलं, ते अत्यंत योग्य होतं. त्याच्या बुद्धिमत्तेची पावतीच होती ती. एक मुडदा अब्रानच्या ताब्यात देऊन या तिघांची त्याने सुटका करवली होती. पण त्यातूनच आता कठीण परिस्थिती निर्माण होणार होती. आदिल मौलवी 'धर्मगुरू' त्यांना सोडणार नव्हता. त्याच्या क्रूरपणाच्या कित्येक हकीगती मशहूर होत्या. असा हा माणूस आपली फसवणूक सहन करेल, हे शक्यच नव्हतं. उलट, त्या घटनेचं भांडवल करून तो सर्वशक्तीनिशी तौलीवर तुटून पडणार होता. कदाचित, तौली नेस्तनाबूद

करण्याकरता त्याला कारणच मिळाल्यासारखं होणार होतं.

गाव तर हे असं!

एक जण आवाज उठवणार नाही. मदत-बिदत मिळण्याची शक्यता नाही.

म्हणजे गाव वाचवण्याच्या प्रयत्नात, आपल्यामुळे गाव उद्ध्वस्त होण्याचा काळिमा मात्र लागणार!

काय करावं?

गावकरी जमले होते. ते तिघांकडे नुसते टकमक पाहत राहिले. जणू ते त्रयस्थ होते; आणि हा या तिघांचाच घरगुती मामला होता.

"दीदार!"

"चला! नीट विचारपूर्वक काहीतरी ठरवायला हवं."

"तुझ्या खोलीवर?"

"काय हरकत आहे? ते काही लगेच परत येत नाहीत नक्की!"

"आणि आले, तर आले! लगेच परत आले, तर पाच-सहाच येतील. आता त्यांच्या बापाला आपण ऐकत नाही." गोली त्वेषानं म्हणाला.

गगनने त्यावर कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही; कारण त्या वेळच्या प्रसंगात आपण चरकलो होतो, हे त्याला मान्य होतं; आणि त्याला ते डाचत होतं. त्याने एखादं आवेशयुक्त वाक्य टाकलं असतं; आणि जर कोणी टोमणा मारला असता, तर जन्मभरची जखम होऊन बसली असती ती एक.

दीदारच्या खोलीवर येताच गोरक्षने आधी कोणाला कुठे लागलंय्, ते बारकाईनं तपासलं आणि मग जखमांची नीट मलमपट्टी केली, तोपर्यंत तिघं आपल्याला विचारात गढून गेल्यासारखेच होते. गोरक्षचं ते काम संपायला तास लागला. मग तोच म्हणाला,

"दीदार, आता तुम्हाला विचार करायला सवड आहे. नीट काय ते ठरवा. एक घाव - दोन तुकडेच करून टाका. गावातलं कुणी मदतीला यायचं

नाही. मी एकच करू शकतो....''

तिघांनी प्रश्नार्थक मुद्रेनं त्याच्याकडे पाहिलं.

''ते गावात शिरण्यापूर्वी त्यांच्यातल्या कोणाला लागलं-बिगलं, तर त्या माणसाला घेऊन ते माझ्याकडे येतील.''

''हं?''

''अशी जेवढी माणसं माझ्याकडे येतील, त्यातला एकही परत पाठवणार नाही मी!''

''म्हणजे?''

''माझ्याकडे एक विषारी वनस्पती आहे. तिचा गुणधर्म असा आहे की, तिच्या साहाय्याने कोणत्याही तीव्र वेदना दहा-पंधरा मिनिटांकरता थांबवता येतात; पण तो लेप पंधरा मिनिटांत साधारपणे वेदनांची पुन्हा जाणीव व्हायला लागली, की साफ पुसून काढावा लागतो.''

''नाहीतर?''

''नाहीतर पहिल्यापेक्षा जास्त वेदना होतात. त्या काळात विष अंगात भिनत असतं. पुन्हा पाच मिनिटांनी वेदना थांबतात आणि नंतर माणूस तडफडू लागतो.''

''तसं केलंस, तर ते काम तुझंच आहे, याबद्दल अब्रानची खात्री पटेल. त्याने तुला ताब्यात घेतलं तर...?''

''त्याला मी काहीच कळू देणार नाही. आणि यावेळी मीही सावध असेन. अब्रानने मला छळायला प्रयत्न केला, तर जन्माची अद्दल घडवीन त्याला.''

''ठीक आहे गोरक्ष, तू तयारीला लाग. अब्रानची जास्तीत जास्त माणसं तुझ्याकडे पाठवण्याची व्यवस्था करतो मी.''

गोरक्ष निघून जाताच तिघं गंभीर झालं.

''गोली, काही सुचतंय्?''

''सुचतंय्; पण...''

गोलीने मध्येच वाक्य तोडून तिरप्या नरजेनं गगनकडे पाहिलं. गगन ओशाळला.

''गोली, मघाच्या घटनेवरून मला एकदम बाद ठरवू नकोस तू.'' तो अपराधी स्वरात म्हणाला. ''त्या वेळी माझ्या मनानं कच खाल्ली होती, हे कबूल करतो. आता त्याबद्दल मलाही लाज वाटतीय्. मी वचन देतो, पुन्हा माझं मन कोणत्याही प्रकारानं विचलित होणार नाही.''

''शाबास गगन!'' त्याला मिठी मारत दीदार उद्‌गारला.

''आपण तिघं एकदिलानं, खंबीरपणे दंड थोपटून उभे राहिलो, तर भैरीतले झाडून सर्व तरुण आले, तरी त्यांना आपण पुरून उरू.'' उत्साहानं गोली म्हणाला.

''बोल तू. या वेळी योजनेचा सर्वांत धोक्याचा भाग मी स्वत:कडे घेऊन संध्याकाळच्या भ्याडपणाचं प्रायश्चित्त घेणार आहे.''

''त्याची आवश्यकता नाही गगन. तू–''

''आवश्यकता आहे! त्याशिवाय माझा आत्मविश्वास परत येणार नाही.''

''पण मला कळत नाही, तू स्वत:ला भ्याड का समजतोस? त्याची माणसं काय आम्ही दोघांनी मारली का? तुझी मदत नसती, तर हे एवढं कसं जमलं असतं? मी अडसर घेऊन फळीत घुसलो, तेव्हा किती सुंदर कव्हर दिलात तुम्ही मला!

''आणि खरं सांगायचं तर गगन, अब्रानने तुझ्यावरच लक्ष केन्द्रित केलं होतं. तुझ्याऐवजी ते माझ्यावर केलं असतं, तर मीही असाच घाबरलो असतो.''

''मीही!'' दीदार म्हणाला.

गगन काही बोलला नाही. पण आपल्या जागी दीदार किंवा गोली

असते, तर त्यांच्यातलं कोणीही अजिबात घाबरलं नसतं, ह्याची त्याला कल्पना होती. इतकं कशाला, गगनवरचं त्याचं लक्ष उडावं, म्हणून खुद्द गोलीने अब्रानला स्वत:कडे वळवण्याकरता किती तरी प्रयत्न केले होते.

''बरं, ते मरू देत. तुझ्या डोक्यात काय प्लॅन आहे गोली ?''

दीदारने त्या विषयावर पडदा पाडण्याच्या इराद्यानं विचारलं.

''माझ्या प्लॅनचे तीन भाग आहेत.''

''आणि आपण तिघं आहोत. बोल तू.''

''गावातला सर्वात मोठा आरसा कोणाकडे आहे ?''

''आरसा ?''

''हं.''

''पाह्यला पाहिजे. का ? त्याचा इथे काय संबंध ?''

''आहे, म्हणून तर.''

''ठीक आहे. मी रमणशेठच्या दिवाणखान्यातला सहा फुटी आरसा मिळवू शकतो. काय करायचं त्याचं ?''

अब्रान आज निघाला, तर तो सकाळपर्यंत भेरीला पोहोचेल. विश्रांती घेऊन, नवीन तयारीनं तो संध्याकाळी तौलीला यायला निघेल.''

''हंऽ''

''रात्रीच तो पोचला, तर आपल्याला आरशाचा उपयोग करता येणार नाही. पण तो जर सकाळी आला तर....''

''सूर्यकिरणं परावर्तित करायची ?''

''होय !''

''शाबास... पुढे ?''

''त्यांचे घोडे बिथरतील. त्यांना गोंधळायला होईल. त्या गोंधळाचा फायदा घेऊन एकाने दोन्ही हातात तलवारी घेऊन त्यांच्यात शिरायचं आणि सरळ त्यांची कत्तल करायची. जमतील तेवढी माणसं जखमी करायची !''

क्षणभर दीदार विचारात पडला.

आत्महत्त्याच होती ती !

एक जण तरी सावध होऊन वार करेल की नाही ?

''ठीक आहे,'' गगन गंभीरपणे म्हणाला, ''तिसऱ्याचं काम काय ?''

''तिसऱ्याचं काम आत्ता सुरू होतं !''

''हंऽ !''

''कोणी तरी या क्षणी सामला जायला निघायचं ! कोणत्याही परिस्थितीत, दारा बुलंदला सगळी परिस्थिती समजावून सांगून सकाळपर्यंत दारासह तौलीत हजर व्हायला हवं !''

''गगन, तू–''

''मी सामला जाणार नाही.''

''काय ?''

''तुमच्या दोघांपैकी कोणीही जावं.''

''हे बघ, हा प्लॅन माझा आहे. म्हणजे मी इथेच पाहिजे.''

''मग, दीदार जाईल.''

''मी ?.... कसं शक्य आहे ?''

''का नाही ?''

''जो माणूस त्यांच्या फळीत घुसणार, त्याला नीट पळता तर यायला हवं ?''

''हंऽ !''

''तुझा आणि गोलीचा पाय जायबंदी आहे. म्हणजे मलाच ते काय करायला नको का ?''

''मला ते काहीही माहीत नाही.''

''गगन, हा प्लॅन माझा आहे. त्याचं नेतृत्व माझ्याकडे आहे. मी सांगतो,

ते तुला ऐकायलाच पाहिजे. तू या क्षणी सामला रवाना हो.''

गगनने जळजळीत नजरेनं गोलीकडे पाहिलं. मग अभिप्रायार्थ दीदारकडे पाहिलं.

दीदारने नुसते खांदे उडवले.

पक्षातून 'फुटून' स्वतंत्र पक्ष काढण्याची कल्पना त्यांच्यापैकी कोणाच्याही डोक्यात आयुष्यात येणार नव्हती; त्यामुळे गगनचा नाइलाज झाला. तो तिरमिरीनं उठला.

''ठीक आहे. होऊ दे तुमच्या मनासारखं!''

''अरे! दारा बुलंदला बोलवून आणण्याचं काम तुला–''

''मी जातो म्हटलं ना? त्यावर आता चर्चा नको.''

काही न बोलता त्याने खोलीचं दार उघडलं आणि दोघांकडे एक जळजळीत कटाक्ष टाकून दार खाडकन आपटून लावलं.

दोघं एकमेकाकडे पाहून मंदपणे हसले.

◇◆◇

खरं म्हणजे दोन दिवसांची अपार मेहनत; आणि त्यानंतरचं अपयश – या दोन्ही गोष्टींचा थकवा अब्रानच्या शरीरावर आणि मनावर व्यापलेला होता. विश्रांतीची त्याला आवश्यकता होती. पण मौलवीने दिलेली मुदत विचारात घेऊन, त्याला तो विचार बाद करावा लागला.

दिवसभर विश्रांती – तीही अत्यावश्यक म्हणूनच घेतल्यावर संध्याकाळी अब्रानने सुलतानला बोलावणं पाठवलं. त्याला सगळी कल्पना असल्यामुळे तो त्याच्या बोलवण्याची वाटच पाहत होता.

दोघांनी नीट विचार करून शेलके पंचवीसजण बरोबर नेण्याकरता निवडले, बरोबर भरपूर दारूगोळा लादलेले दोन घोडे घेतले; आणि सगळी तयारी झाल्याची खात्री पटताच त्यांनी रात्री भेरी सोडलं.

निरोप घेण्याकरता मौलवीकडे आले, तर त्याने त्यांची गाठच घेतली नाही. एका नोकराबरोबर निरोप होता –

''त्यांना म्हणावं, यशस्वी होऊन आलात, तर सोन्याची कडी घ्यायलाच या एकदम! तोपर्यंत तोंड दाखवण्याची आवश्यकता नाही.''

पहिल्यांदा अब्रानला मनोमन पटलं –

आपला ठाकूर मूर्ख आहे, क्रूर आहे; त्याला कोणाचीही पर्वा नाही!

निराशेनं संतापात गाव सोडला त्याने.

◇◆◇

पुन्हा जपून प्रवास करणं आलं!

भेरीला येताना ते प्रेत जपून आणलं. आता आपल्याच माणसांच्या प्रेतांचा सडा पडू नये, म्हणून जपून जायला हवं. दोन घोड्यांवर चिक्कार दारूगोळा लादलेला. हादऱ्यानं स्फोट-बीट झाला, तर इथेच चिंधड्या उडतील सगळ्यांच्या!

अगदी पार उजाडलं, तेव्हा कुठे तौली दृष्टिपथात येतंय्, असं वाटायला लागलं.

सुलतानने लगाम खेचला. घोडं उभं केलं. त्याच्या जोडीनं टपकणारा अब्रानचा घोडा उभा राहिला. त्याने हात वर करताच मागची माणसं थांबली.

''समोर दिसतंय्, तेच तौली ना?''

''होय.''

''मला वाटतं, आपण आपली माणसं दोन गटांत विभागावीत.''

''छान! आधीच आपली माणसं मोजकी पंचवीस! त्यात ती दोन गटांत विभागायची?''

''मला सांग अब्रान,'' सुलतान त्याच्याकडे रोखून पाहत म्हणाला, ''भरत मेला होता, हे त्या गोरक्षला माहीत होतं, की नाही?''

''होय.''

''तरी त्याने तुला चकवलं.''

''मी मूर्ख आहे, बास! आता पुन्हा–''

''तू खरंच मूर्ख आहेस! दुसरा काय बोलतोय्, ते आधी ऐकून घेऊन मग बोलायचं, तर तेही तुला.....''

''बरं, बोल!''

''त्याने तुला हातोहात फसवलं.''

''हंऽ''

''आपण फसवलं, हे अब्रानला भेरीला गेल्यावर समजेल, हे त्याच्याही लक्षात आलं असेल, की नाही?''

''हां....''

''म्हणजेच, आपण परत येणार, हे तौलीने गृहीत धरलेलं आहे.''

अब्रानच्या डोक्यात आता कुठे प्रकाश पडला. त्याने मान डोलवली.

''त्यांनीही काही तयारी केली असेलच, की नाही?''

''हांऽऽ, ती शक्यता आहे.''

''आहे ना? म्हणूनच मी म्हणतो, आपण टोळी विभागू. जी टोळी समोरून येईल, तिच्यावर त्यांचं लक्ष केंद्रित होईल. तू बारा माणसं घेऊन आलास, अशा समजुतीनं ते तुझ्या बाजूला एकवटतील. त्याच वेळी मी पिछाडीनं हल्ला चढवला, तर त्यांचे हाल कुत्रा खाणार नाही.''

अब्रान त्या कल्पनेनं खदखदून हसला.

''ही कल्पना फार सुरेख आहे.'' भसाड्या आवाजात तो म्हणाला.

त्याने संमती देताच सुलतानने टोळी दोन तुकड्यांमध्ये विभागली. दारूगोळ्याचीही विभागणी झाली. एका टोळीचं नेतृत्व सुलतानकडे गेलं; दुसरी टोळी अब्रानच्या नेतृत्वाखाली राहिली. त्याचीच टोळी आघाडी

सांभाळणार होती; कारण गावाने अब्रानला पाहिलेलं होतं. आणि सुलतान मागच्या बाजूनं गावात घुसणार होता. दोन्ही बाजूला हल्ले झाले, की गाव कोंडीत सापडणार होतं. त्याच्या मते फार तर तासा-अर्ध्या तासात तिघं त्यांच्या हाती येणार होते.

त्या सुखद विचारांनी दोघांच्याही डोळ्यांसमोर सोन्याची कडी चमकायला लागली होती.

"अब्रान, आणखीन मोजून अर्ध्या तासानं तू गावावर चालून जा. तोपर्यंत मी गावाच्या पिछाडीला गेलेला असेन. ठीक आहे?"

"हां."

सुलतानने आपल्या टोळीला मागे येण्याची खूण केली. तो तिरप्या रस्त्यानं फुटला. गावाच्या नजरेत न येता त्याला लांबून वळसा घालून पिछाडी गाठायची होती.

तोपर्यंत विश्रांती मिळून आपण ताजेतवाने होणार, म्हणून अब्रान खूष झाला होता.

पण...

आपल्या भविष्यात काय वाढून ठेवलं आहे, याची कल्पना असती, तर अब्रानने आघाडी सांभाळण्याचं कधीच मान्य केलं नसतं.

कारण, दीदार आणि गोली त्यांची ती विभागणी दुर्बिणीतून स्पष्टपणे पाहत होते.

त्यांच्यापुढे एकच प्रश्न होता–

आरसा धरण्याकरता एका माणसाची गरज होती. उन्हाचे कवडसे बरोबर टोळीच्या डोळ्यांवर चमकावून त्यांना काही काळ अंध करून टाकणं, हे एकच सोपं काम त्याने करायचं होतं; पण हे फार महत्त्वाचं होतं.

गोली आणि दीदारपैकी एकजण पुढची आघाडी सांभाळायला समर्थ

होता. दुसऱ्याने पिछाडीला हल्ला थोपवून धरला असता.

''गोली, शेजारच्या रतनला जरा बोलवून आण. तिला नुसतं सांग, दीदारला तुझी मदत हवीय्.'' दुर्बिणीवरची नजर न काढता दीदार म्हणाला.

परिस्थितीचं गांभीर्य ओळखून गोली रतनच्या घराकडे धावला.

गावात तेवढी एकच तरुणी होती, जी सगळे विरोध मोडून निश्चितपणे त्यांच्या मदतीला येणार होती!

* * *

नऊ

अब्रानने मोजून अर्धा तास जाऊ दिला. मग त्याने आपल्याबरोबरच्या बारा जणांना कूच करण्याची खूण केली. तो स्वत: सर्वात पुढे, त्याच्या दोन बाजूला दोन घोडेस्वार, मागे पाचजण; आणि त्याच्या मागून दारूगोळ्याच्या घोड्याबरोबर चारजण, अशी त्याने मांडणी केलेली होती.

इशारा मिळताच टोळी पुढे सरकायला लागली. गावापासून अगदी तीनशे फुटांवर येताच अब्रानने वेग वाढवला.

अन् त्याच वेळी दीदारने रतनला खूण केली.

रतन एका घराआडून पुढे आली. वाळूत पालथा टाकलेला प्रचंड आरसा तिने आडवा धरला.

चम्!

परावर्तित झालेला प्रखर सूर्यप्रकाश सर्वांचे डोळे दिपवून गेला. अब्रानची विचित्र हालचाल झाली. त्याचे दोन्ही हात लगामावरून सुटून डोळ्यांवर आडवे आले. आणि त्याच वेळी त्याचा घोडा किंकाळत मागच्या दोन पायांवर उभा राहिला.

परावर्तित किरणांनी आपलं काम योग्य प्रकारे करायला सुरुवात केली आहे, हे पाहताच दीदार हातातल्या दोन तलवारी सावरत वाळवंटाच्या दिशेनं पळायला लागला.

आणि अर्ध्या वाटेतच मूढवत् थबकला.

कुठून तरी गगन अचानक उगवला होता आणि एव्हाना अब्रानपर्यंत पोहोचला होता.

हा.... हा इथे कसा ?

दीदारला संताप अनावर झाला. पण ही संताप व्यक्त करण्याची वेळ नव्हती. तो तीरासारखा टोळीत घुसला होता. त्याला संरक्षण देणं महत्त्वाचं होतं.

गगनच्या अंगात जबरदस्त वीरश्री संचरली होती आणि मृत्यूची पर्वा न करता तो टोळीवर तुटून पडला होता. काय होतंय्, ते समजण्यापूर्वीच त्याने तिघांची मुंडकी छाटली होती; आणि आता तो चक्क अब्रानच्या अंगावर धावून चालला होता.

मूर्ख !

हल्ला करायचाच, तर पहिला अब्रानला उडवायचा !

आता सावध झाला तो.

अब्रानला पाहायला कष्ट पडत होते. कारण, प्रसंगावधान राखून गगन ज्या माणसाकडे जाईल, त्याच्या डोळ्यांवर किरण येतील, अशा तऱ्हेनं रतन आरसा हालवत होती. पण अब्रानला गगनच्या हालचालींचा अंदाज आला होता आणि त्याचा वार टाळावा, म्हणून तो गडाबडा लोळत बाजूला झाला होता.

तरी एक ओझरता वार त्याच्या बरगडीतून रक्त काढून गेलाच होता.

त्याच वेळी दीदार तिथे येऊन पोहोचला होता आणि पहिल्याच झपाट्यात त्याने दोन मुंडकी धडावेगळी केली होती. तो गगनच्या मदतीला

धावला होता.

पण काही तरी चुकलं होतं.

सावध झालेल्या कोणाला तरी दीदार दिसला होता. दीदारच्या मानेभोवती फास बसला होता; आणि तो अत्यंत वेगाने धडपडत लांब ओढला गेला होता.

''गीदड की औलाऽद!'' त्वेषानं म्हणत भस्दिशी वाळू गगनच्या तोंडावर उधळली. त्याची ती कृती अनपेक्षित असल्यामुळे गगनला तोंड चुकवायला संधीच मिळाली नाही. वाळूचा मारा तोंडावर झाला. वाळू नाका-तोंडात जाऊन त्याचा जीव घाबरा झाला. डोळ्यांतही भरपूर वाळू गेल्यामुळे त्याला पुढचं काही दिसेनासं झालं.

आणि कोणीतरी त्याच्या पोटात गप्कन लाथ मारली. आतडी आवळत तो उताणा पडला. पण वाळूला पाठ टेकताच त्याने कुशीला उसळी मारली.

म्हणूनच वाचला तो!

एक भाला रप्कन् वाळूत रुतला होता.

त्या भाल्याचाच आधार घेऊन गगन उठला. अजून नीट दिसत नव्हतं; पण आसपास सगळे शत्रूच होते. बिनदिक्कतपणे त्याने भाला फिरवायला सुरुवात केली.

कोणीतरी भोसकलं गेलं आणि खच्चून ओरडलं.

आधीच घोडे कावरे-बावरे झालेले. त्यांना काबूत ठेवता-ठेवता नाकी नऊ!

त्यात ही किंकाळी!

घोडे उधळले.

अब्रान अनवधनानं ओरडला,

''दारूगोळा असलेली घोडा सांभाळा!''

गगनला तेवढं पुरेसं होतं.

एका सैनिकाच्या पोटात भाला खुपसून त्याने त्याची बंदुक हिसकावली आणि मिचमिच्या डोळ्यांनी पाहत तो त्या घोड्याच्या दिशेनं धावत सुटला.

अब्रानच्या ते लगेचच लक्षात आलं. क्षणभर त्याच्या काळजाचा ठोका चुकला. दुसऱ्या क्षणी त्याने गगनच्या पाठीचा नेम धरला आणि ट्रिगर दाबला.

गोळी उडाली.

पण .....

थेट आकाशाच्या दिशेनं!

फासाचा दोर तलवारीनं कापून दीदारने स्वत:ची सुटका करून घेतली होती आणि त्याने अब्रानच्या दिशेनं मुसंडी मारली होती. ऐन वेळी अब्रानच्या हाताला खालून फटका बसला होता.

दीदारने गगनला वाचवण्याकरता जिवाचा आटापिटा केला होता; पण गगनची आयुष्यरेषाच वाळवंटात लुप्त झालेली होती, त्याला कोण काय करणार?

कालच्या भ्याडपणाचा कलंक धुऊन टाकण्याचा निश्चयच केला असावा त्याने.

धावता-धावता दोघांना उडवत तो दारूगोळ्यानं लादलेल्या घोड्याच्या दिशेनं धावत सुटला आणि पळायच्या तयारीत असलेलं ते घोडं रेंजमध्ये येताच, सरळ शत्रूला पाठीवर घेऊन खंबीरपणे उभा राहिला.

तो काय करू पाहतोय्, ते लक्षात आल्यावर सर्वांचीच धांदल उडाली होती. अब्रानला त्याच्या दिशेनं कोणाला तरी पाठवायचं होतं; पण दीदारने त्याचा पार दम काढला होता. त्याच्या हातातली बंदूक उडाली होती आणि दीदारच्या हातातल्या तलवारीनं त्याच्या शरीरावर जखमाही केल्या होत्या.

पण कोणीतरी त्याचं कार्य केलं.

गगनच्या पाठीवर गोळ्यांचा वर्षाव झाला.

अरे!

इतकं सगळं करून, पराक्रम न गाजवता मरणार आपण?

छे!

आणखी काही सेकंद तरी जगायलाच हवं!

जबरदस्त इच्छाशक्तीनं तो तसाच उभा राहिला. मोठ्या कष्टानं त्यानं बंदूक ताणली आणि त्याच्यापासून लांब पळू पाहणाऱ्या घोड्याच्या सामानाचा नेम धरला.

ट्रिगर दाबला.

ठो!

नंतर तो खाली कोसळला.

पुढे काय झालं, ते त्याला कळू शकलं नाही; पण त्याला अपेक्षित असलेला परिणाम मात्र त्याच्या शेवटच्या नेमानं साधला होता.

प्रचंड स्फोटांच्या मालिकेनं वाळवंट दणाणलं.

त्या जागेपासून सगळे दूर धावत सुटले.

दीदार सर्वात पुढे पळत होता. अश्रूंनी भरून आलेले डोळे पुसायलाही त्याला सवड नव्हती.

गेला बिचारा!

मेला.

आपण भ्याडपणा केला, हे मनाला फार डाचलं होतं त्याच्या पराक्रमाची शर्थ करून मेला!

कलंक धुतला गेला.

गगन मेला.

पुन्हा दिसणार नाही.

त्या गोलीला काय सांगू आता?

त्याला कसं तोंड दाखवू?

त्या अब्रानमुळे घडलं सगळं!

खवळून तो मागे वळला... तर –

त्याच्या मागे एकटा अब्रान !!

क्रुद्ध होऊन दीदार मागे वळलेला पाहून अब्रान हादरला, थबकला; आणि ओरडला, ''गोळी घाला त्याला !''

तर मागून कोणाचीच चाहूल नाही.

गर्र्कन् वळून पाहतो तर –

नुसते स्फोट ! आगीचे लोळ !

आणि समोर –

कृतांत काळासारखा दीदारसिंग खंबीरपणे उभा !

◇◆◇

आपलं कामही दीदारइतकंच – किंबहुना, त्याच्यापेक्षाही अवघड आहे, ह्याची गोलीला जाणीव होती. दीदार गनिमी काव्यानं लढणार होता, त्याच्या मदतीला रतन होती; पण गोली एकटा होता आणि टोळीला चकवण्याची कोणतीही योजना अजून तरी त्याच्या डोक्यात तयार होऊ शकली नव्हती.

काय करावं ?

गगन सामला गेलाय, तो एव्हाना दाराला घेऊन परतीच्या वाटेवर असेल.

मदत येईपर्यंत ह्यांना कोणत्याही परिस्थितीत थोपवलं पाहिजे.

त्याचा घोडा भरधाव वेगात गाव पार करत होता; आणि त्याच वेगात त्याचे विचार त्या प्रश्नाभोवती फेऱ्या मारत होते –

काय करावं ?

शेवटी, प्रसंग येईल त्याप्रमाणे वागावं, असा सोपा निर्णय घेऊन त्याने डोक्याचा त्रास बंद करून टाकला होता.

गावाच्या अगदी मागच्या टोकाकडच्या शेवटच्या भिंतीच्या आडोशाला त्याने घोडा उभा केला. समोरच्या वाळवंटाचं तो निरीक्षण करत राहिला.

छे ! वाळवंटच आहे. काय हे ?

नुसतं वाळवंटच.... नजर पोचेल तिथपर्यंत !

अशी एकही मोक्याची जागा नाही, जिथे लपून एकेकाला टिपून काढता येईल.

अन् अगदी अचानकपणे आपण लपलेल्या घराच्या भौगोलिक वैशिष्ट्याची त्याला जाणीव झाली. उत्साहानं त्याने संपूर्ण घराचं निरीक्षण केलं. मग तो दरवाज्यापाशी आला.

दारावर थाप.

''कोण आहे ?''

''मी.... गोली. दार उघडा.''

भित्र्या हालचाली करत दरवाज्याला फट पडली. म्हातारा बाहेर डोकावला.

''गोली, पाया पडतो मी तुझ्या. आमचं घर या प्रकारात –''

''आजोबा, वेळ आली, तर तुमचं घरच काय, तौली गावही उरणार नाही.''

कडवट स्वरात गोली म्हणाला.

म्हाताऱ्याच्या घशाला एकदम कोरड पडली. भकास नजरेनं गोलीकडे पाहत तो आवंढे गिळायला लागला.

''आणि तसं होऊ नये म्हणूनच मी प्रयत्न करतोय्. प्राण वाचवायचे असतील, तर ताबडतोब घरातून बाहेर पडा. हल्ला इकडून होणार आहे. मी प्रतिकार केला नाही, तर पहिलं तुमचंच घर जमीनदोस्त होईल आणि सगळी माणसं कापली जातील. त्यापेक्षा रिकामं घर माझ्या ताब्यात द्या, प्रतिकाराला मला आडोसा मिळेल.''

आधी म्हातारा नुसता हबकून पाहत राहिला. मग गोलीचं बोलणं त्याच्या मेंदूपर्यंत पोचताच त्याने भराभरा हालचाल केली. घरातल्या झाडून सगळ्या माणसांना त्याने बाहेर काढलं.

''काय ही आज-कालची पोरं ! उगाच संकट ओढवून घ्यायचं; आणि

मग बसायचं निस्तरत !''

असं रागारागानं पुटपुटत तो दुसऱ्या कोणाच्या तरी घरात लपण्याकरता निघून गेला.

इतर वेळ असती, तर म्हाताऱ्याला काहीतरी खरमरीत उत्तर देऊन गोली मोकळा झाला असता.

गंमतच असते माणसाची !

आपल्यावर संकट आलं, की 'माणुसकी'ला जागून कोणीतरी आपल्या मदतीला यावं, अशी त्याची अपेक्षा असते; पण तोच प्रसंग दुसऱ्यावर आला म्हणून माणूस मदतीला धावून गेला, तर लोकांना ती नसती उठाठेव वाटते.

गोलीचं लक्ष टोळीच्या हालचालीकडे लागलं असल्यानं तो वाद घालत बसला नाही, इतकंच !

योग्य अशी सर्वांत पहिली हालचाल म्हणून त्याने आपला घोडा सरळ त्या घरात घुसवला. मग दार आतून बंद करून घेतलं. मग तो घराच्या खिडक्या तपासायला लागला.

मस्त !

वाळवंटाकडच्या बाजूला जी खिडकी होती, त्यातून वाळवंटाचा विस्तृत भाग दिसत होता; आणि खिडकीच्या फळ्यांना दहा-बारा भोकंही होती.

या म्हणावं आता !

खिडकीपाशी स्टूल घेऊन तो आरामात बसला. एका भोकाला डोळा लावून ठेवायला मात्र तो विसरला नाही.

त्याला फार वेळ वाट पाहावी लागली नाही.

आघाडीचा हलकल्लोळ सुरू होत असतानाच पिछाडीकडून भरधाव वेगात येणारे घोडेस्वार त्याच्या दृष्टीस पडले. तो सावरला.

एका भोकात बोट लावून त्याने वीट हालवून पाहिली. ती हालताच बाहेर काढली. त्या जागेतून बंदुकीची नळी बाहेर काढून तो त्यांच्या टप्प्यात

येण्याची वाट पाहत बसला.

ठो!

ठो!

बंदुकीतून दोन गोळ्या सुटल्या. दोन घोड्यांच्या पाठी मोकळ्या झाल्या.

◇◆◇

अरे!

या आघाडीवरही प्रतिकार?

सुलतान जरा चमकला. त्याने इतरांना घोडे मागे घ्यायला लावले. मग, ज्या दिशेनं गोळ्या आल्या होत्या, त्या दिशेवर त्याने आपलं लक्ष केन्द्रित केलं.

फक्त ते घर!

दुसरा कुठे आधार नाही.

त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुललं.

"त्या घरावर एक गोळा टाका."

घराच्या दिशेनं बोट दाखवत त्याने हुकूम सोडला.

त्याने घर कोणत्या संदर्भात दाखवलं, ते गोलीच्या लक्षात आलं; पण त्यांच्याजवळ दारूगोळा आहे, हे माहीत नसल्यामुळे, त्याने घर उडवायला सांगितलंय्, हे गोलीला कळलं नव्हतं. तो आपला निर्धास्त होता.

या पुढे! की उडलातच समजा!

अँ!

हे काय? ही कसली विनोदी कसरत?

एकाने दोन घोडे समांतर उभे केले होते आणि एकेक पाय दोन्ह घोड्यांच्या पाठीवर देऊन तो दोन घोड्यांवर उभा होता.

दुसऱ्याने त्याच्या हातात एक प्रचंड बेचकं दिलं. ते त्याने दोन्ही हातां घट्ट पकडून ठेवलं.

बेचक्याचं रबर आपलं हे ऽ एवढं लांब लोंबतंय्!

त्यात कसला तरी दोन नारळांएवढ्या आकाराचा गोळा ठेवला.

दुसरा तरुण गोळा ताणतोय.

मग एकदम धोका जाणवला.

अरेऽऽ हे या घरावर दारूचा गोळा टाकतायत.

अस्सं !

गोळा ताणला गेला; आणि त्याच वेळी गोलीने गोळी झाडली.

ठो !

गोळी त्यांच्यापर्यंत पोचणार नव्हती; पण तिने योग्य परिणाम मात्र साधला. घोड्यावर उभा असलेला माणूस दचकला. घोडी बिचकून हालली.

अरे-अरे-अरे-अरे....

रप् !

ठो !

त्या दोघांच्या अक्षरश: ठिकऱ्या-ठिकऱ्या उडाल्या.

पण केवळ हीच युक्ती उपयोगी पडणार नव्हती.

गोलीचं डोकं भराभर काम देत होतं, त्यानुसार त्याच्या हालचाली होत होत्या.

समोर गोंधळ होता. प्रचंड धुराळा होता.

घोड्यावर टांग टाकून गोली बंदुकीसह बाहेर पडला. वेगाने दौडत त्याने तो पट्टा आडवा पार केला.

गोंधळ संपला, तेव्हा गोली त्यांच्या टोळीत शिरला होता.

शांतपणे त्याने आपला घोडा हुकूम देणाऱ्या माणसाच्या जवळच आणून उभा केला.

तो संतापून ओरडत होता....

"मूर्खांनो, इज्जत घालवता काय माझी ? आपण बंदुकीच्या रेंजबाहेर आहोत. कसलाही प्रतिकार न करता उगीचंच चार माणसं गमावली. चला,

उडवा ते घर!''

त्याच्या हुकुमानं ज्या दोघांनी घर उडवलं, त्यात एक तोच तरुण आहे... ज्याला उडवण्याकरता आपण ते घर उडवण्याची आज्ञा देतोय.... हे सुलतानच्या लक्षात आलं असतं तर...?

एक तरुण जादा आहे; आणि अनोळखी आहे.... हे त्याच्या लक्षात आलं; पण त्याच वेळी आणखीनही एक गोष्ट त्याच्या लक्षात आली....

त्या तरुणाने आपल्या पार्श्वभागाखाली बंदुकीची नळी खुपसून ठेवली आहे; आणि तो म्हणतोय....

''तुझ्या माणसांनी चुकीची हालचाल केली, तर मी बंदुकीचा ट्रिगर दाबीन हं!

* * *

दहा

''ए! ती नळी काढ.''

''काय?''

''मला घोड्यावर बसायला त्रास होतोय्.''

''वा! साक्षात मृत्यूवर स्वार आहेस बेटा तू. हे भाग्य फार थोड्यांना लाभतं!''

''अरे! चुकून ट्रिगर दाबला जाईल ना!''

''जाऊ दे की! ती काळजी मी कशाला करू? मला उडवण्याकरताच त्या घरावर गोळा टाकायला लावलास ना?''

''म्हणून काय नळी खुपसतोस काय?''

गोली खदखदून हसत राहिला. हसण्याबरोबर त्याचं शरीर गदगदतं होतं आणि सुलतानचा जीव वर-खाली होत होता.

''तुला या गोष्टीचा पश्चात्ताप होईल.''

''असं? का बरं?''

''अब्रान आला की –''

''मघाशीच स्फोटाचा आवाज ऐकलास ना? आता कसली अब्रानची आशा करतोस? मेला तो!''

सुलतान हबकला.

''काय नाव तुझं ?''

''सुलतान.''

''तुझ्या माणसांना ते दारूगोळा लादलेलं घोडं लांब नेऊन दारूगोळा उडवायला सांग.''

''छे-छे ! ते शक्य नाही.''

''तर मग मी गोळी ठोकतो.''

''अरे, नको ए !''

''सांग त्यांना –''

''हा शैतान सांगतो, तसं करा.''

खवळून सुलतान ओरडला.

पाच मिनिटांत पुन्हा एकदा स्फोटांनी आसंमत दणाणला.

''घोड्यांच्या किट्स्मध्ये बंदुका वगैरे बांधा.''

सगळे जण पुन्हा अडखळले.

''सुलतान –''

''अरे, तो सांगतो तसं करा.''

सर्वांनी आपापल्या बंदुका किट्ला बांधल्या.

''घोड्यांची तोंडं वाळवंटाच्या दिशेला वळवा.''

वळली.

''मारा लाथा !''

घोडे उधळले; वाळवंटाच्या दिशेनं पळून गेले.

''चला, बाळांनो, हात वर करून गावाच्या दिशेनं चालायला लागा.''

आता तर ऐकायलाच हवं होतं.

सगळे चालायला लागले.

''सुलतान, उतर खाली.''

सुलतान उतरताच गोलीने त्याचाही घोडा वाळवंटाच्या दिशेन

पिटाळला.

"हात वर. हं, चालायला लाग."

स्वतंत्ररीत्या काम करून गोलीने मिळवलेला हा पहिलाच विजय होता; त्यामुळे गोलीला क़धी एकदा गावात शिरतोय् आणि दीदारला गाठतोय्, असं होऊन गेलं होतं.

सुलतान तावातावानं चालत होता. अब्रानच्या टोळीनं गाठलं, की या लाजिरवाण्या परिस्थितीतून आपली सुटका होईल, अशी आशा त्याला अजूनही वाटत होती.

पण त्याच वेळी, दीदारच्या तावडीतून सुटका करवून घेण्याकरता अब्रान आतुरतेनं त्याचीच वाट पाहत होता, त्याचं काय ?

दीदारचा तो क्रूर आवेश पाहूनच अब्रानच्या छातीचे ठोके भराभरा-भराभरा चुकले होते.

"अब्राऽऽन !"

अब्रानने झटकन् आपल्या तुमानीकडे पाहिलं आणि ती ओली नसल्याची खात्री करून घेतली.

"तू माझ्याशी द्वंद्व खेळण्याची प्रतिज्ञा करून चुकला होतास, नाही ? आता तुझी प्रतिज्ञा पूर्ण करण्याची वेळ आली आहे."

असं म्हणत असतानाच चित्त्यासारखी ताड्कन् झेप घेऊन तो अब्रान-समोर उभा ठाकला.

अन् पहिल्यांदाच एक गोष्ट अब्रानच्या लक्षात आली–

आपण फार भित्रे आहोत ! या तरुणाशी आपण मुक्त द्वंद्व करू शकत नाही. आपला त्या वेळी जो रुबाब होता, तो दीदार कैदी होता आणि आपल्या ताब्यात होता, म्हणूनच होता !

दीदार म्हणाला, ते खरं आहे–

मौलवीचं अन्न मुर्दाड आहे ! आणि आपण तर लहानपणापासून

त्याच्याच अन्नावर पोसले गेलो आहोत.

''दीदार,'' मागे सरकत अब्रान ओरडला, ''हे तुला महागात जाईल. मी एकटा नाही.''

''महागात जाईल, तर जाऊ देत! मौलवीच्या कुत्र्या, मी आजपर्यंत स्वत:करता, स्वत:च्या इच्छेनं जगलो; आता स्वत:करताच मेलो, तर मला काय वाईट वाटणार? पण एक काळ्या दगडावरची रेघ समज – तू शंभर सशस्त्र सैनिकांच्या बंदोबस्तात आलास, तरी हा दीदार तुला कच्चा फाडून खाईल.''

''का, का पण?''

''कुत्र्या! माझा एक दोस्त तुमच्यामुळे मेला आणि मी दोस्तीला जागणारा माणूस आहे.''

''तो.... तो त्याच्या मरणानं मेला.''

काहीतरी करून सुलतान येइपर्यंत अब्रानला वेळ काढायचा होता.

''तो त्याच्या मरणानं मेला? ठीक आहे. तू तुझ्या मरणानं मरशील. घे–''

असं म्हणून दीदारने खाडकन् त्याच्या पोटात लाथ मारली.

अब्रान कळवळत खाली पडला.

''गगनच्या याच पायात तू संगीन रोवली होतीस, नाही?''

त्याच्या पोटात गोळा!

आता हा आपल्या पोटात संगीन खुपसणार!

''ऊठ!''

आणि आपली चूक त्याला उमगली.

संगीनीचं टोक भसदिशी त्याच्या पायात रुतलं होतं.

ब्रह्मांड आठवलं त्याला. सगळं वाळवंट त्याच्या पायाच्या वेदनेत सामावून वर चढत डोक्यापर्यंत भिनलं; मग डोळ्यांसमोर गरगरलं.

''संगीन उपस – संगीन उपस!''

तो कळवळून ओरडला.

''का ? पायात संगीनीचं टोक फिरत असताना गगनला काय वाटलं असेल, ह्याचा अनुभव घे की !''

आणि दीदारने खरंच बंदूक फिरवली.

गुरासारखा ओरडला अब्रान.

त्याचं ते ओरडणं ऐकून दीदारला हास्याच्या उकळ्या फुटल्या.

''संगीन काऽऽढ !''

''काढतो. द्वंद्व खेळतोस ?''

''खेळतो !''

''ठीक आहे. येऊ देत तुझी कोण माणसं येणार आहेत ती ! त्यांच्या समोरच होईल सगळं ते !''

''तोपर्यंत–''

''ही संगीन अशीच डोलत राहणार !''

अब्रान कळवळला. त्याच्या जिवाचा संताप-संताप झाला. पण त्याने ते तिघं ताब्यात असताना दया दाखवली नव्हती; दीदार कसा दया दाखवेल ?

ते कार्टं तर सारखं दस्त्यावर बोट मारून संगीन झुलवत होतं !

''परिस्थिती पालटेल दीदार ! त्या वेळी मी या सगळ्याचा सूड घेईन.''

''मला माहीत आहे; म्हणूनच तर मी तुला छळून घेतोय्. परिस्थिती पालटतीय्, असं वाटलं, तर मी पहिल्यांदा तुझंच मुंडकं उडवीन.''

''तू ?''

बोलता-बोलता अब्रान एकदम गप्प झाला.

''आँ ?''

दीदारने पाहिलं, तर सात-आठ माणसं चालत-चालत येत होती. एका माणसाच्या पाठीवर बंदुकीचा नेम धरून गोली घोड्यावर बसून त्यांच्या मागोमाग येत होता.

सुलतान आणि अब्रानचं एकमेकांकडे लक्ष गेलं.

दोघांच्या आशा मावळल्या.

चेहरे पडले.

जवळ येताच सुलतान रडक्या स्वरात म्हणाला–

"अब्रान, हे दोघं सैतान आहेत."

"तरी मी सांगत होतो." आशा पूर्णपणे काळवंडल्यामुळे खवळत अब्रान म्हणाला, "पंचवीस माणसं पुरणार नाहीत. पण त्या मौलवीच्या टाळक्यात शिरेल, तेव्हा ना ? मरा आता !"

त्याचा तो उद्वेग पाहून दीदार आणि गोली मनापासून हसायला लागले.

"दीदार," दूरवर दिशा न्याहाळत गोली म्हणाला, "गगन एव्हाना यायला हवा होता रे !"

"गगन–"

दीदारचा चेहरा खर्र्कन् उतरला.

गोली चमकला.

"का, काय झालं दीदार ?"

"गगन शौर्यानं लढला."

"गगन लढला ?"

"होय. या अब्रानची सगळी माणसं त्यानेच मारली ?"

"पण..."

"तो सामला गेलाच नाही गोली !"

"आहे कुठे ?"

"गगन आता आपल्यात नाही गोली. आता आपण..."

दीदार त्याच्या आठवणींनी रडायला लागला. गगनचा पराक्रम त्याच्या डोळ्यांसमोर ताजा होता.

"गगन गेला ?"

गोलीला तो एक प्रचंड धक्काच होता.

"हो !"

''तर मग हो अब्रान... सुलतान....ह्यातलं कोणीही परत जाणार नाही.'' गोली कठोर स्वरात म्हणाला.

''तुम्ही आमचं काय करणार आहात गोली ?''

शांत स्वरात सुलतानने विचारलं.

''तुम्हाला भोसकत-भोसकत ठार करणार आणि तुमची प्रेतं गिधाडांपुढे टाकणार !''

''तर मग, मी तुला द्वंद्वाला आव्हान करतो. निदान शूराचं मरण तरी येईल आम्हाला !''

''मी तुमचं आव्हान–''

''थांब दीदार !'' गोली त्याचं वाक्य तोडत म्हणाला, ''या दोघांना तू कसलीही संधी देऊ नकोस. माझं तर मत आहे, ह्यांना आत्ताच गोळ्या घालून, नाही तर संगीनींनी चोचून ठार करावं. हे त्याच लायकीचे आहेत.''

''गोली, त्यांनी आपल्याला एकदा सोडलं होतं.''

''चुकतोस, तू दीदार. गोरक्षने त्याच्यासमोर पेच टाकला नसता, तर अब्रानने आपल्याला कधीच सोडलं नसतं. अब्रानबद्दल तरी माझ्या मनात चुकीच्या कल्पना नाहीत. आणि ज्या अर्थी मौलवीने अब्रानच्या मदतीला सुलतानला पाठवलं, त्याअर्थी सुलतान त्याच्याहून काकणभर सरसच असेल.''

''मी त्यांना एक संधी देणार आहे गोली.''

''तुला पश्चात्ताप होईल.''

''नाही, पश्चात्तापाची पाळी येणार नाही, अशी आपण खबरदारी घेऊ....''

गोलीला दीदारचं वागणं अजिबात म्हणजे अजिबातच पटत नव्हतं. पण दीदार म्हणेल त्याप्रमाणे वागणं, हा आजपर्यंतचा प्रघात होता. गोली आणि गगन – दोघांनीही स्वत:वरच ते बंधन घालून घेतलं होतं.

त्याने अभिप्रायार्थ फक्त खांदे उडवले.

''गोली, ह्यांच्याशी मी लढणार आहे. पण तू माझ्याशी लढणाऱ्याच्या मागे असशील. त्याच्या हातून कोणतीही चुकीची हालचाल होतीय्सं वाटलं, तर सरळ डोक्यात गोळी घालायची. काय ?''

ते ऐकून गोली खूष झाला.

चांगली संधी होती. 'चुकीची हालचाल' कोणती, ते गोलीलाच ठरवायचं होतं.

केव्हाही डोक्यात गोळी झाडणं शक्य होणार होतं.

''पहिलं कोण ?''

''मी.''

अब्रान घाई-घाईनं म्हणाला.

गोली जरा विचारात पडला.

आपण आलो, तेव्हा हा गयावया करून दीदारची मनधरणी करत होता; आणि आता हा एवढा शूर कसा काय झाला ?

काही तरी काळंबेरं आहे.

दीदारने खस्कन् अब्रानच्या पायात खुपसलेली संगीन उपसली आणि तीच बंदूक अब्रानच्या हातात दिली.

त्या बरोबर गोलीने त्याच्या डोक्याला आपल्या बंदुकीची नळी लावली.

दीदारने दुसरी बंदूक घेतली; नळी वाकवून तिची चेम्बर्स् तपासली.

''ठीक आहे अब्रान, हा सुलतान आकडे मोजेल. एकेका आकड्याला आपण विरुद्ध दिशेला एक-एक पाऊल टाकू. शंभर आकडे झाले, की थांबायचं. त्यानंतर तू मला गोळी घालायला मोकळा आहेस.''

अब्रानने मान डोलवली. तो झटकन् दिशा बदलून दीदारच्या पाठीला पाठ चिटकवून उभा राहिला. गोली लगेच त्याच्या साइडला उभा राहिला.

सुलतानने अंक मोजायला सुरुवात केली.

एक... दोन... तीन... चार....

प्रत्येक अंकाला दोघांची पावलं विरुद्ध दिशेला पडत होती. अंतर वाढत

होतं.

सत्तावन..... अठ्ठावन....

अब्रान सावध झाला.

त्याची संधी आता त्याच्यापासून चार-पाच पावलांच्या अंतरावर होती.

ती हुकली नाही, तर सेकंदात बाजी पलटेल! नाही तर....

गोलीच्या गोळीनं कवटीचा भुगा!

त्रेसष्ट....चौसष्ट....पा....

अब्रान हालचाल करणार आहे, अशी अंधुकशीदेखील कल्पना गोलीच्या मनात नव्हती. त्याच्याकडून दगा अपेक्षित होता; पण तो या स्वरुपाचा नव्हता!

अब्रान अचानकपणे खाली बसला.

त्याला अडकून गोली तोंडावर धडपडला.

अन्.....

क्षणार्ध!

"तो मरेल!"

अब्रान एकदम किंचाळला, तेव्हा कुठे बाजी हातातून गेल्याचं दोघांच्या लक्षात आलं.

त्याने झेप घेऊन रतनच्या पोटावर बंदुकीची नळी टेकवली होती.

"शाब्बास अब्रान!"

बाजी पालटलेली पाहताच सुलतान खूष होऊन ओरडला.

गोलीने जळजळीत नजरेनं दीदारकडे पाहिलं.

ती किंकर्तव्यमूढ होऊन एका जागी खिळून होता.

"हातातल्या बंदुका फेका!"

अब्रान गरजला.

दीदारच्या हातून बंदूक गळून पडली. गोलीनेही त्वेषानं आपली बंदूक फेकून दिली.

अब्रान आणि सुलतान खदखदून हसायला लागले. मग दीदारची हनुवटी कुरवाळत अब्रान म्हणाला,

"बेटा! तरी मी तुला म्हणालो होतो – बाजी पलटेल! ती पलटली. आता मी तुला कधीच संधी देणार नाही, अन् सोडणारही नाही. अपमानाचा पुरेपूर बदला घेईन मी!"

"आणि मी–?" सुलतान त्वेषानं म्हणाला, "या गोलीने मला बंदुकीच्या नळीवर बसवलं होतं. आता मीसुद्धा त्याला बंदुकीच्या नळीवर बसवणार! कळू देत त्याला, नळी खुपसून ट्रिगर दाबला, की कसा माणूस फाटतो ते!"

"गोली," अपराधी स्वरात दीदार म्हणाला, "माफ कर दोस्ता, या वेळी तरी मी तुझं ऐकायला पाहिजे होतं! माझ्या हट्टीपणामुळे आज माझ्याबरोबर तुझेही प्राण धोक्यात आले."

गोलीने नुसता प्रचंड सुस्कारा टाकला.

त्याला आपल्या आणि दीदारच्या प्राणापेक्षाही रतनची काळजी जास्त वाटत होती.

ती सुंदर होती, तरुण होती, अनाघ्रात होती.

आणि... या दोन नराधमाचं तिच्याकडे लक्ष गेलं होतं!

* * *

अकरा

रस्ता निर्मनुष्य. ओसाड. दारा-खिडक्यांच्या फटींना आणि भोकांना तेवढे डोळे फुटलेले.

प्रत्येकाची नजर धास्तावलेली.

काय करणार आता या दोघांचं ?

तो एक गगन तर मेला.

हेही मरणार ?

कोणता हिडिस प्रकार पाहावा लागणार आता ?

आणि...

ती रतन ? तिच्या आणि गोलीच्या घरातले लोक तेवढे सुलतान आणि अब्रानसमोर दयेची भीक मागतायत.

पोरं अजाण आहेत.

दया करा.

वगैरे-वगैरे.

सुलतान आणि अब्रानचे कान आता किटले आहेत.

ते मख्ख !

आता या दोघांना सोडायला काय वेडे आहोत का आम्ही ?

सापासमोर काठी आपटली गेली; आता तो

मेलाच पाहिजे !

डूख धरून लांबवर पाठलाग करत येतो तो.

हे दोघं सापापेक्षा भयंकर, विषारी, जहाल.

यांना कसं सोडणार ?

पहिल्यांदाच विरोध करताना विचार करायला हवा होता.

आपण कोणाला विरोध करतो ? आपली लायकी काय ? आपलं मनुष्यबळ किती ?

आता रडून-भेकून काय उपयोग ?

तेही त्यांचे नातेवाईकच. आता क्षमेची भीक मागतायत !

हे नाही.

हे निगरगट्ट !

म्हणे, सैतानाच्या पाया पडण्यापेक्षा आम्ही मृत्यू स्वीकारू.

स्वीकारा.

घी देखा, लेकिन बडगा नहीं देखा !

बंदुकीच्या नळीवर बसवलं, की कळेल.

''सुलतान–''

सुलतानने प्रश्नार्थक मुद्रेनं अब्रानकडे पाहिलं.

''या मुलीचं काय करायचं ?''

त्याच्या त्या प्रश्नानं रतनचा श्वास घुसमटला.

आता....

इज्जतीवर घाला पडणार !

दीदार काही करू शकणार नाही. गोली काही करू शकणार नाही.

गाव तर मुडद्यांतच जमा.

थिजलेल्या नजरांनी पाहत राहतील सगळे.

हे दोन लांडगे गावादेखत तुटून पडायला कमी करणार नाहीत.

''तुझा काय इरादा आहे ?''

''माझा नेक इरादा आहे. लडकीचं आणखी दुसरं काय करणार?''

अब्रान डोळे मिचकावत खदखदा हसला.

रतनच्या जिवाचं पाणी-पाणी झालं.

गोलीने दात-ओठ खाल्ले.

दीदार तडफडला.

रतनची आई तटकन् उठून पुढे आली.

'ए, म्हातारे! .....हो मागे! तुझ्याबद्दल नाही चाललेलं.''

ठॉक!

बंदुकीचा दस्ता छातीत.

म्हातारी डोळे पांढरे करत जमिनीवर.

''मला वाटतं अब्रान, मौलवीला खूष करण्याची ही संधी आहे.''

''म्हणजे.... ?''

''या दोन प्रेतांबरोबर आपण त्याला ही नजाकत नजर करू!''

त्यात आर्थिक फायदा खूप होता; पण हाता-तोडांशी आलेला घास दुसऱ्याला 'असाच' देण्याची कल्पना मात्र असह्य होती.

पण त्याने होकार दिला.

न देऊन करतो काय?

या सुलतानने चुगली केली; आणि एक सुंदर पोरगी आपल्याला नजर करण्याऐवजी अब्रानच्या हट्टामुळे वाया गेली, असं मौलवीला कळलं तर?

प्राण जाण्यापेक्षा लडकी जाऊ दे!

त्यांचा तो निर्णय ऐकून रतनला हायसं वाटलं.

समोर असलेलं मरण पुढे ढकललं गेलं!

उद्याची बात उद्या.

संधी साधून निसटता येईल. निदान आत्महत्त्या तरी करून घेता येईल.

पण ते ऐकून दीदार आणि गोलीचे चेहरे मात्र काळवंडले.

रतनच्या हालांबद्दल दोघांच्याही मनात चुकीच्या कल्पना नव्हत्या.

''ठीक आहे. आता या दोघांचं काय करायचं ?''

''त्या दीदारचं काय करायचं, ते तू ठरव. गोलीला मी बंदुकीच्या नळीवर बसवून ट्रिगर दाबणार !''

''चल, उठव त्याला. पाहू दे तू कसं करतोयस ते. तोपर्यंत मलाही सुचेल काहीतरी.''

सुलतान लगेच आपल्या उरलेल्या चार-पाच माणसांकडे वळला.

''ए, तिथे खड्डा खणा.''

त्याने दाखवलेल्या जागेवर संगिनी खुपसल्या गेल्या.

दीदार, गोली आणि अब्रान अशा तिघांच्या तीनच बंदुका शिल्लक होत्या. उरलेल्या दोघांनी सरळ दीदारच्या तलवारी वापरल्या.

चांगला हातभर खड्डा तयार झाला.

''बघू ती बंदूक.''

एकाने अदबीनं सुलतानच्या हातात बंदूक आणून दिली. सुलतानने चेंबर्स् तपासून घेतली.

''हंऽ'' नळी जोडत तो समाधानानं म्हणाला, ''हा दस्ता इथपर्यंत पुरला गेला पाहिजे. काय ?''

माणसाने आज्ञाधारकपणे मान डोलवली.

''नाहीतर ट्रिगर पुरून टाकशील !''

''नाही-नाही.''

त्याच्या माणसांनी ते काम अगदी उत्तम प्रकारे पार पाडलं.

''ऐन वेळी आडवी नाही ना होणार ? हालवून बघ.''

त्याच्या माणसांनी बंदूक हालवून दाखवली. थोडी हालल्यासारखी वाटत होती; पण तो भास होता. पक्केपणाची खात्री पटताच सुलतानने पुन्हा मान डोलवली.

''त्याचे हात नीट करकचून बांधा.''

हात आधीच बांधले होते. मागे वळवून, ते आणखी घट्ट बांधण्यात आले.

''आता त्याच्या पायात घोट्याशी दोऱ्या बांधा.''

दोन बोटं जाडीच्या दोऱ्या गोलीच्या दोन्ही घोट्यांना बांधण्यात आल्या.

''हाँऽऽ आता उचला त्याला. गोली, वेड्यासारखं काही केलंस, तर रतन मरेल, हे लक्षात ठेव.''

चौघांनी त्याला उचलला. गोलीने यत्किंचितही प्रतिकार केला नाही.

''बसवा!''

''कुठे?''

''कुठे काय, त्या नळीच्या टोकावर बसवा!''

चौघं हवालदिल झाले.

काय या माणसाच्या डोक्यातून निघेल....!

त्याला उचलता-उचलता मेटाकुटीला व्हायला आलं होतं. आणि आता त्याला छातीपर्यंत वर उचलायचं!

''हं, ठेवा! बसवा-बसवा. अरे ठेवा नाऽऽ!''

गोलीला अक्षरश बंदुकीच्या नळीवर बसवण्यात आलं. तोल जाऊ नये म्हणून दोघांनी त्याला दोन्ही बाजूंनी धरून ठेवला होता.

''ए, तुम्ही पायाच्या दोऱ्या ताणून धरा!''

त्याचा क्रूरपणा पाहून अब्रानही थक्क झाला होता.

सगळ्या गोष्टी मनाप्रमाणे झालेल्या पाहून सुलतान प्रसन्न होऊन हसला.

''गोली, मला तू बंदुकीच्या नळीवर बसवलं होतंस, तेव्हाच मी तुला सांगितलं होतं – हे तुला महागात जाईल! तू मला नळीवर बसवलंस, तेव्हा माझ्याखाली बसायला घोडा तरी होता. तुला मी बंदुकीच्या नळीच्या टोकावरच बसवलं आहे. आणि तरीही तू जिवंत राहू शकतोस.''

गोलीने चमकून सुलतानकडे पाहिलं.

''त्यासाठी मला काय करायला हवं?''

''तुला मौलवीसाहेबांचा जयजयकार करायला हवा. इस्लामचा स्वीकार करायला हवा.''

गोली तुच्छपणे हसला.

सुलतानने खांदे उडवले. शांत, नाटकी स्वरात तो म्हणाला,

"माझा तू अपमान केल्यानंतरही चांगुलपणा, माणसुकी म्हणून तुला जगण्याची एक संधी मी बहाल केली होती. पण तुझी मरण्याचीच इच्छा असेल, तर माझाही नाइलाज आहे."

तो पुढे होताच सर्वांचे श्वास रोखले गेले.

गोलीच्या नातेवाइकांनी त्या दृश्याकडे पाठ फिरवली.

दीदारने खाली मान घालून डोळे घट्ट मिटून घेतले.

अन्–

ठो!

दीदारने दचकून मान वर केली.

आं?

हे काय?

गोली अजूनही जिवंत होता, आश्चर्यानं इकडे-तिकडे पाहत होता, त्याला धरून ठेवणारेही पूर्णपणे भांबावले होते; आणि सुलतान मात्र स्तब्ध उभा होता.

मग हातापायातलं त्राण गेल्यासारखा सुलतान गुडघ्यांत वाकला आणि धप्‌दिशी वाळूत पालथा पडला.

काय झालं, आणि कसं झालं?

नंतर!

गोलीने त्या गोंधळलेल्या क्षणाचा पुरेपूर फायदा घेतला. सर्व ताकद एकवटून त्याने आपले पाय जवळ ओढले आणि दोऱ्या धरलेली माणसं पुढे होलपटताच त्यांच्या तोंडावर गोलीचे पाय आदळले. मग तो झटकन बाजूला झाला.

क्षणार्धात दीदारनेही परिस्थिती ओळखून अब्रानच्या अंगावर झेप घेतली. अब्रान मागे धडपडला. त्याच्या उरावर दीदार पडला.

हात तर मागे बांधलेले.

काय करावं ?

"अब्रान, हालू नकोस. तू हाललास, तर मी तुला चावेन ! आणि माझे दात विषारी आहेत."

असं म्हणून दीदारने अक्षरश: कुत्र्याच्या पद्धतीनं अब्रानचं मनगट जबड्यात पकडलं.

आता... ?

हा म्हणतो ते खरं नसेल, तर ठीक आहे. पण खरं असेल तर.... ?

उगाच विषारी परीक्षा पाहायला नको.

"हात सोडा माझे !"

गोली गुरगुरला.

परिस्थितीनं पलटी घेतलेली पाहून सुलतानच्या माणसांनी निमूटपणे त्याच्या हाता-पायांच्या दोऱ्या कापून टाकल्या.

हात-पाय मोकळे होताच गोली पहिल्यांदा सुलतानच्या दिशेनं धावला आणि एका लाथेत त्याने सुलतानला सुलटं केलं.

सुलतानच्या थेट कपाळात–

हिंदू-स्त्रीने कुकंवाची टिकली लावावी, तशी एक गोळी !

गोली आश्चर्यानं थक्क !

कोणाचं काम हे ?

कोण एवढा अचूक नेमबहादर ?

आणि मुख्य म्हणजे, या गावात कोण इतका धाडसी आहे ?

सर्वदूर पाहतो तर–

लांबवर पाच घोडेस्वार.

त्यातला एक....

हो, गोरक्षच तो !

मग हे चौघं....

दारा बुलंद ?

त्या एका नावासरशी त्याच्या अंगात हुरूप आला.

''दीदारला मोकळं करा !''

दोघं जण दीदारच्या दिशेनं धावले.

अब्रान फुसफुसत, रागारागाने बाजूला झाला.

''अब्रान, आता वेडेपणा करू नकोस. ती बघ....'' दूरवर बोट दाखवत गोली म्हणाला, ''ती पाचही माणसं आमची आहेत, आमच्या मदतीला आली आहेत; आणि त्यांच्यापैकीच कोणी तरी, इतक्या लांबून सुलतानच्या कपाळाचा वेध घेतला आहे.''

घडलेल्या सगळ्याच घटना इतक्या अनपेक्षित, आणि वेगात घडल्या होत्या, की अब्रानला काहीच सुचत नव्हतं. इतक्या लांबून कोणी नेम मारू शकतो, ही गोष्टच त्याला नवीन होती; त्यामुळे तो नुसता बावळटासारखा आ वासून पाच जणांकडे पाहत होता.

पाचही स्वार जवळ आले. गोरक्ष अभिमानानं दीदारकडे पाहून हसला.

''गोरक्ष, तू कसा काय गेलास सामला ?''

दीदारने विचारलं.

''कसा म्हणजे... ? गगनकडून तुझा निरोप मिळाला. गेलो मी !''

दीदारने अर्थपूर्ण नजरेनं गोलीकडे पाहिलं.

तेवढ्यात, पिंगट घाऱ्या डोळ्यांचा एक अवाढव्य तरुण घोड्यावरून खाली उतरला.

''तूच दीदार काय ?''

''होय. आणि हा गोली.''

''मी दारा बुलंद !''

दोघांनीही माना डोलवल्या. या चौघांमधला हाच दारा बुलंद असणार, याबद्दल त्यांची खात्री होती. त्याचं वर्णन त्याच्या डोळ्यांच्या वैशिष्ट्यांसकट राजस्थानभर पसरलं होतं.

''हा मधुर, हा बादल, त्याच्या पलीकडे आहे, तो शीतल.''

''आणि गगन कोण ?'' मधुरने विचारलं.

''तो आता नाही !''

गंभीर स्वरात दीदारने उत्तर दिलं.

गोरक्ष ते ऐकून ताड्कन् उडाला.

''काय म्हणतोस !''

दीदारने गगनच्या मृत्यूची हकीगत सांगितली. ती ऐकत असतानाच दाराला गोली आणि दीदारच्या कल्पकतेची खात्री पटली.

''दीदार, काय घडलं, ते पहिल्यापासून नीट सांगशील का ?''

त्याने विचारलं.

दीदारने वाळवंटात भरत दिसल्यापासूनची सर्व हकीगत सांगितली. शेवटी तो म्हणाला,

''तुझ्या गोळीनं मेला तो सुलतान; आणि हा अब्रान !''

दाराची पिंगट घारी नजर अब्रानवर रोखली गेली आणि त्याच्या हृदयाचा थरकाप उडाला.

मेलो आता आपण !

आणि त्याचं वाटणं चुकीचं नव्हतं. या तरुणाला जगण्याचा अधिकार नाही, या निर्णयापर्यंत दाराच्या आधी मधुर येऊन पोचला होता.

दाराच्या डोळ्यांसमोर भेरीचा मौलवी तरळायला लागला.

''दीदार, अब्रानला मी तुमच्यावर सोपवतो.'' शांत स्वरात दारा म्हणाला. ''लक्षात ठेवा, अब्रान जगण्याच्या लायकीचा नाहीच; आणि तो सहज मरण देण्याच्या लायकीचाही नाही.''

''पण तू काय करणार आहेस ?''

''आम्ही दुपारी भेरीला जाणार आहोत.''

''तुम्ही..... ! आणि आम्ही ?''

''तुमच्यापैकी कोणीही भेरीला येणार नाही.''

त्याचा तो निर्णय ऐकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

दाराच्या भूमिकेचं कारण एकट्या मधुरच्या लक्षात आलं होतं आणि त्याला ते पटलं होतं.

सगळे एकमेकांच्या तोंडाकडे टकमका बघत असताना मधुर मात्र मंदपणे हसून दाराकडे पाहत होता.

दीदार आणि गोली – हेच तौलीचे आधारस्तंभ होते.

त्याचं जिवंत राहणं ही सामाजिक गरज होती; म्हणूनच त्यांच्या बाबतीत दारा कोणताही धोका पत्करायला तयार नव्हता.

* * *

बारा

काल रात्रभर मौलवीला शांत झोप लागली नव्हती.

असं का व्हावं, ते त्याचं त्यालाही कळत नव्हतं; पण अर्धवट झोपेत त्याला सारखी भरतची निरनिराळी रूपं दिसत होती आणि दचकून जागं व्हायला होत होतं.

लाल पीतांबर नेसून देवघरात बसलेला भरत!

त्याची ती प्रसन्न पूजा!

गीतेचा अध्याय!

"माझा हा देव तुला काहीच करणार नाही. कारण, ती दगडाची मूर्ती आहे. पण हाच देव कोणा शक्तिमान् हृदयात जन्म घेईल. तो तसा तुझा नाश करेल. त्या वेळी तू असहाय्य असशील....!"

मग त्याने मारलेला ठोसा.

त्याच्या घराची उडालेली धूळधाण.

कैदेतले त्याचे हाल.

त्याची ती उडी. त्यातला तो प्रंचड आवेश. ती मगरमिठी.

आणि...

तो मेल्याची बातमी!

सगळं आलटून-पालटून दिसायचं. छातीत धस्स होऊन जाग यायची.

आला... तो बलाढ्य माणूस आला, ज्याच्या हृदयात तो प्रकाश निर्माण झाला आहे.

आसपास कोणी नाही, अशी खात्री पटताच तो स्वत:वर चिडायचा.

मूर्ख!

दगडाच्या मूर्ती अशा कधी कोणाच्या हृदयात प्रकाशतात का? स्वत:ला कट्टर इस्लामचा पुरस्कर्ता म्हणवतोस ना तू? आणि काफरांच्या वल्गनांवर विश्वास ठेवतोस?

हृदयाची धडपड कमी झाली, की तो पुन्हा झोपेच्या आधीन व्हायचा.

पुन्हा तेच!

"एक ना एक दिवस असा येईल, की हा ईश्वरी अंश कोणा मानवाच्या रूपानं तुमच्यासमोर उभा ठाकेल! त्या वेळी तुम्ही गलितगात्र असाल, तुम्ही शरण याल; पण तो तुम्हाला क्षमा करणार नाही!.... त्या वेळी तुम्हाला माझे शब्द आठवतील!

हॉ-हॉ-हॉ-हॉ-हॉ-हॉ!

सगळी रात्र अशी भीतीच्या लपंडावात पसार झाली.

पहाटे तो उठला, तेव्हा त्याला भयंकर थकवा जाणवत होता. कोणीतरी भांडतंय्, बोलतंय – असे आवाज कानांत घुमत होते.

आणि तरीही पठ्ठ्या वेळेवर उठला होता.

नमाज पढायला निघाला होता.

"हुजूर, आजपण रथ हिंदू मुहल्ल्यातूनच घ्यावयाचा?"

तो रथात बसताच सेवकाने अदबीनं विचारलं.

"अलबत! आणि हे बघ हसन, हाच प्रश्न रोज-रोज विचारत जाऊ नकोस. आम्ही हमेशा हिंदू मुहल्ल्यातूनच नमाज पढायला जाणार. त्या घरावरून जाताना, घराची सुनसान पडझड पाहून आम्हाला आनंद होतो. एका काफराला आपण कशी सजा दिली, ते आठवून आम्हाला स्फूर्ती येते.

समजलं ?''

सेवकाने मान डोलावली.

घोडे धावायला लागले.

थोड्याच वेळात आदिल मौलवी आपल्या विचारांत गढून गेला.

अन् हिंदू मुहल्ल्यातून जाताना त्याची समाधी भंग पावली.

भरतचं घर जवळ आलं होतं आणि खड्या आवाजात कोणीतरी श्लोक म्हणत होतं –

''शांताकरं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम्।....

''हसन –''

''जी ?''

''कुठून आवाज येतो आहे ?''

''त्या घरापासून खाविंद.''

''रथ थांबव.''

त्याची आज्ञा होताच रथ थांबला. मौलवीने डोकं बाहेर काढलं. भरतच्या घराची जागा आता मोकळी होती. त्यावर मशाल खोचून एक धिप्पाड तरुण म्हणत होता–

''लक्ष्मीकांत कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वंदे विष्णुं भवभयहरं सर्व लोकैकनाथम्।''

तीन तरुण त्याच्या समोर बसून भक्तिभावानं त्याचे श्लोक ऐकत होते.

''हसन, त्या चौघांना इकडे बोलवून आण.''

हसन विनम्रपणे खाली उतरला. बिचकत त्या चौघांपर्यंत पोहोचला.

हो. चौघेही दणकट होते. मारली तोंडात तर ....?

''ए!''

श्लोक म्हणणाऱ्या तरुणाने आवाज बंद केला. मख्खपणे तो हसनकडे वळला.

''तुम्हाला मौलवी माहीत आहेत का ?''

तरुणाने इतर तिघांकडे पाहून पुन्हा हसनकडे पाहत नकारार्थी मान डोलवली.

''नाही ?''

''आम्ही या गावात नवीन आहोत.''

''असं ? मग लक्षात ठेवा. आदिल मौलवी हे या भेरी गावचे अनभिषिक्त राजे आहेत. इतर गावांत जो मान ठाकुरांचा, तोच भेरीत मौलवींचा.''

''बरं, पण हे सांगण्यामागचा उद्देश ?''

''त्या रथात मौलवी बसले आहेत; आणि त्यांनी तुम्हा चौघांना बोलवलं आहे.''

तरुण उठला, तसे त्याचे तीन साथीदारही उठून उभे राहिले.

''आणि त्यांना दुरुत्तरं करू नका. काय ? त्यांचा संताप फार वाईट आहे.''

''पण त्यांना संताप यावा, असं आमच्या हातून काय घडलं आहे ?''

''ते .... संस्कृतवर त्यांचा फार राग आहे.''

''अस्सं ! बरं, चल.''

हसनच्या मागोमाग चौघं अत्यंत अदबीनं मौलवीच्या रथापर्यंत आले. मौलवी त्यांच्याकडे जळजळीत नजरेनं पाहत होता. मुखियाची पिंगट-घारी बेडर नजर मौलवीच्या नजरेशी मिळाली अन् मौलवीला थोडंसं अस्वस्थ झाल्यासारखं वाटलं.

''तुम्ही ज्या पडक्या जागेवर बसला होता–''

''ती आपल्या मालकीची आहे का ?''

''नाही, त्या जागी दोन दिवसांपूर्वी एक घर होतं.''

''आम्ही ते पाडलं नाही. आपला काहीतरी ...''

''खामोष ! ते घर आम्हीच पाडलं.''

''माफ करा मौलवीसाहेब, मला आपल्या बोलण्याचा एकंदर रोखच समजलेला नाही.''

''सांगतो. तू आता काय म्हणत होतास ?''

''मी ध्यान म्हणत होतो. शान्ताकाराम् भुजगशयनम्–''

''हिंदू देवाचं वर्णन आहे ते !''

''होय. ध्यान झाल्यावर मी गीता वाचायला सुरुवात करणार आहे.''

''तोच अविचार तू करू नकोस.''

''का ?''

''या जागी राहणाऱ्या भरतने तोच अविचार केला होता.''

''गीता-पठण हा अविचार आहे ?''

''होय, निदान माझ्या नमाजाला जाण्याच्या वेळी तरी !''

''का ?''

''माझी मर्जी ! भरतने ऐकलं नाही; म्हणूनच मी त्याचं घर धुळीला मिळवलं. भरत मेला. त्याचे वडील हृदय बंद पडून मेले. त्याच्या आईने आत्महत्त्या केली.''

''आणि ....?''

''आणि त्याच्या बहिणीने विहिरीत उडी टाकून जीव दिला.''

''का ?''

''तिला माझी सेवा करणं पसंत नव्हतं.''

क्षणभर तरुणाच्या चेहऱ्यावर रागाच्या छटा पसरल्या. मग पूर्ववत कोरा चेहरा करत त्याने मान डोलवली आणि म्हणाला,

''तर मग, मी योग्य जागी आलो.''

''म्हणजे ....?''

''या उद्ध्वस्त घराच्या सांगाड्यावर बसून मी गीता वाचली, तर भरतच्या आत्म्याला शांती मिळेल !''

''हो, आणि तुझ्याही.''

तरुण तुच्छतेनं हसला.

''आदिल मौलवी, आपण धर्मगुरू आहात. तेव्हा धर्मावर मी तुम्हाला प्रवचन देणं काही खरं नाही; आणि त्याचा उपयोगही नाही. कारण परस्त्रीची अब्रू तुम्ही कोडगेपणानं लुटता; आणि त्याची कबुलीही–''

''खामोष!''

''मी तुम्हाला थोडक्यात सांगतो – मी याच ठिकाणी बसून गीतापाठ करणार आहे. जोपर्यंत नमाज पढायला मी बंदी करत नाही, तोपर्यंत तुम्ही माझ्या धार्मिक आचरणाच्या आड येऊ नये.''

''मी तुला हुकूम करतो–''

''तुमचा हुकूम तुमची प्रजा ऐकेल. मी तुमच्या प्रजाजनांपैकी नाही. मी तुमचा हुकूम मानीत नाही.''

''असं? ..... हसन–''

जादूगाराने जादू करून सेकंदात नसलेली वस्तू निर्माण करावी, तसा हसनच्या पोटात भीतीचा गोळा निर्माण झाला.

''ज .... जी?''

''या चौघांना रथाच्या मागे बांध.''

''जी!''

मेलेल्या आवाजात हसन उद्‌गारला. जागच्या जागी त्याने हालचाल केली; पण जागचा हालला नाही तो.

''सुनाई नहीं देता क्या हसन?''

''हाँ ऽऽ''

नाइलाजानं हसन हुंकारला. पुढे झाला.

हसन जवळ येईपर्यंत चारही तरुण मख्खपणे उभे होते. तो जवळ येताच समोरच्या तरुणानं उगाचच हिंस्र चेहरा करून पाय आपटत किंकाळी फोडली.

''या ऽ ल्लाऽऽ!''

हसन दोन पावलं मागे सरकत घाबरून ओरडला.

"हसन,"

मौलवी रागारागानं ओरडला.

हसन पुन्हा पुढे झाला. धीर करून त्याने एकाचं मनगट पकडलं.

आणि ....

हसन बेंबीच्या देठापासून किंचाळला आणि जागच्या जागी थयथयाट करत राहिला.

खाडकन् रथाची दारं उघडून मौलवी बाहेर आला.

पाहतो तर–

हसनच्या एक हात लांबला होता आणि मनगटापासून पुढे लुळा पडून लोंबत होता.

"ए, काय केलंत त्याला ?"

"काही नाही."

"काही नाही ?"

"खरंच काही नाही. त्याने माझा हात पकडला; म्हणून ती त्याचा पकडला, तर ....

मौलवी डोळे फाडून त्या तरुणाकडे पाहायला लागला. मग पुन्हा त्याला एकदम भरतचं बोलणं आठवलं.

हाच काय तो ?

त्या विचारानं आदिल मौलवीच्या छातीत बारीकशी कळ येऊन गेली. त्याच्या डोक्यापर्यंत मुंग्या आल्या.

"मौलवी ...." तो तरुण थंड आवाजात म्हणाला, "तुला म्हणून सांगून ठेवतो. मला पकडणं, हे एकट्या-दुकट्याचं काम नाही ! मी एकटा असतानादेखील मला वीस-पंचवीस जणांची टोळी ताब्यात घेऊ शकत नाही. आणि माझ्याबरोबर हे तिघं असतील तर–"

मौलवीच्या चेहऱ्यावर आश्चर्य, भीतीची गडद छाया होती; पण त्याची हालचाल मात्र त्याच्या अगदीच विरुद्ध होती. रथाच्या दरवाज्याला हात टेकून

त्याने तरुणाच्या छातीवर लाथ झाडली होती.

तरुण बेसावध होता. गप्कन् लाथ बसताच तो धडपडत मागे झाला.

मौलवीने धाडस केलेलं पाहून हसनालाही जोर चढला. लुळा हात लोंबकळता सोडत त्यानेही तरुणाच्या दिशेनं मुसंडी मारली, त्याचं डोकं तरुणाच्या छातीतही बसलं; पण ....

पुन्हा एकदा धक्का!

दगडावर डोकं आपटल्यासारखा हसन कळवळला आणि मागे फेकला गेला.

"मौलवी, आता एका सेकंदात तू या माणसासकट रथातून चालता हो; नाही तर तुझा रथ मी तोडून ठेवीन!"

मौलवी चपापला. त्याच्या मनानं कच खाल्ली. पण असं एकदम निघून जाणंही पळपुटेपणाचं ठरलं असतं. शिवाय, गाव त्याचा होता. हा तरुण गावात उपरा होता. काय म्हणून त्याचा रुबाब चालवून घ्यायचा?

दात-ओठ खात मौलवी रथावर चढला. सारथ्याच्या जागी बसून त्याने घोडे पिटाळायला सुरुवात केली. हसन धडपडून उठला आणि रथाच्या मागोमाग जीव खाऊन पळत सुटला.

तोच घोडे वळले. रथाचं तोंड त्या चौघांच्या दिशेनं झालं. सुसाट वेगात घोडे पुन्हा धावायला लागले.

एकदम समोरून घोडे अंगावरच येताना पाहून हसन गांगरला. त्याला पळण्याचा वेग कमी करता येईना; का बाजूला पळण्याचंही सुचेना!

आणि चारही घोडे आपले येतायत धाड-धाड धावत!

हसन मध्ये येतोय, हे मौलवीच्या तेव्हाच लक्षात आलं होतं; पण त्या चौघांवरचा त्याचा संताप इतका अफाट होता, की हसनला वाचवण्याकरता-सुद्धा घोड्यांचा वेग कमी करण्याची त्याची तयारी नव्हती.

आपलं मरण असं समोरून धावत येताना पाहून हसनने डोळे पांढरे करत आरोळी ठोकली.

अन् त्याच वेळी हसनला घोड्यांनी पायाखाली घेतलं! तो तुडवला गेला. तरीही, त्याच्या शरीरात धुगधुगी बाकी होती. रथाच्या चाकानं तीही काढून घेतली. त्याच्या पोटावरून चरचरत रथ पुढे गेला.

समोरच्या चौघांचीही अशीच अवस्था होणार, याबद्दल मौलवीची पक्की खात्री होती. पण चारही तरुण अत्यंत शांतपणे, अजिबात गडबडून न जाता उभे होते. ते पाहून मात्र मौलवी जरा सावध झाला.

हे घाबरत कसे नाहीत?

दुसऱ्याच क्षणी त्याला त्याच्या मनात उद्‌भवलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळालं.

घोडे जवळ येताच चौघेही तरुण फेकल्यासारखे वर उडाले आणि गप्‌कन घोड्यांच्या पाठीवर बसले.

त्या चपळ हालचाली पाहूनच आदिल मौलवीचा जीव दडपला!

''तुला सांगत होतो मौलवी; पण तू ऐकलं नाहीस! आता भोग त्याचे परिणाम!''

शांत स्वरात तरुण म्हणाला आणि त्याने रथ आणि घोडे यांना जोडणाऱ्या लाकडी जूवर ताडकन् फटका मारला.

''ए .. ए ... ये क्या-ये क्या करता है?''

मौलवी बेंबीच्या देठापासून ओरडत असताना घोडे रथापासून मोकळे झाले, वेगात धावणारा रथ गपकन् पुढे झुकला, जूचा तुकडा थडाड्‌कन जमिनीवर आपटला; आणि कोलांट्या घेत मौलवी रथातून उडाला. त्याच्या पाठोपाठ रथानेही तंगड्या वर केल्या.

मौलवी उडाला, तो पहिल्यांदा तोंडावरच आपटला. मग हनुवटी घासत चांगला पंधरा-वीस फूट लांब उडून पडला.

''या अल्ला ऽऽ तोबा-तोबा ...''

रक्ताबरोबरच त्याच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

ताकद एकवटून त्याने मान वर केली. त्याच्यापासून वीतभर अंतरावर

श्रीमद्‌भगवद्‌गीता होती. गीतेवर भगवान श्रीकृष्ण अत्यंत मिस्किलपणे मौलवीकडे पाहून हसत होता.

कण्हत-कुथत मौलवीने श्रीकृष्णावरची नजर हटवली. तर अर्जुन! त्याचा चेहरा एकदम भरतसारखा!

म्हणत होता ....

"प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात याच ईश्वराचा अंश असतो! एक ना एक दिवस असा येईल, की ईश्वरी अंश कोणा बलाढ्य मानवाच्या रूपानं तुमच्यासमोर उभा ठाकेल; आणि त्या वेळी तुम्ही मात्र गलितगात्र असाल! तुम्ही शरण याल; पण तो तुम्हाला क्षमा करणार नाही ..."

भणण् होत त्याने अर्जुनाच्या चित्रावरून नजर हालवली. आणि मग त्याच्या डोळ्यापुढे अंधारलं. त्याने बेशुद्ध होत मान टाकली.

सूर्य एव्हाना प्राचीच्या कडांवर सोनेरी रंगाची उधळण करायला लागला होता.

उगवत्या दिवसाचं ते दृश्य पाहून सगळा हिंदू मुहल्ला कृतार्थ होत होता.

* * *

तेरा

भलं मोठं मैदान.

मधला गोलाकार मोकळा.

इतर सगळं गच्च भरलेल.

निर्णय.

मौलवीची प्रतिज्ञाच होती तशी –

''या तो ये दारा बुलंद आज जिंदा रहेगा या मैं।''

परवाचा त्याचा अपमानच जबरदस्त झालेला.

ऐन पस्तिशीत पुढचे चार दात पडले.

हनुवटीला टाके पडले.

तेही परवडलं;

पण डोकं टेकलं, ते प्रत्यक्ष गीतेसमोर!

शेकडो हिंदूंनी पाहिलं ते!

छे! आजपर्यंत या भेरीत ताठ मानेनं जगलो, इस्लामचं श्रेष्ठत्व पटवून देत राहिलो; अन् .....

दारा बुलंद असो; नाहीतर त्याचा बाप असो, आव्हान दिलंच पाहिजे!

म्हणून शुद्धीवर आल्या-आल्या मौलवीने आपलं

आव्हान जाहीर केलं होतं. दाराने ते सहजपणे स्वीकारलं होतं. होकारार्थी मान डोलवताना मनाप्रमाणे झालं, म्हणून तो खूष होऊन हसला होता.

मौलवीला धडा शिकवण्याची संधी त्याला मिळत होती.

आलेल्या सेवकाला त्याने सांगितलं होतं ....

''तुझ्या मौलवीला सांग, दारा बुलंद कोणाचंही आव्हान ठेवत नाही. त्याने तुझं आव्हान स्वीकारलं आहे. तू म्हणशील, त्या पद्धतीनं; आणि तू म्हणशील तेव्हा .... तू सांगशील तिथे दारा बुलंद हजर असेल!''

मौलवीचं आव्हान जितकं गाजलं होतं, तितकाच दाराचा निरोपही गावभर वाजत-गाजत मौलवीपर्यंत पोहोचला होता. त्यावर चौका-चौकात उलट-सुलट चर्चाही झाल्या होत्या.

आणि तोच आजचा द्वंद्वाचा दिवस.

निर्णायक!

एका बाजूला दारा आपल्या तीनही साथीदारांशी गप्पा मारत उभा होता. द्वंद्वाचा ताण त्याच्या सूक्ष्म हालचालींतही जाणवत नव्हता. त्याच्या भव्य देहावर सर्वांच्या नजरा खिळून राहिल्या होत्या.

अन् त्याच वेळी थडथडत गावाकडून मौलवीचा रथ आला.

नजरा आपोआप त्या दिशेनं वळल्या.

मौलवीचा थाट आज निराळाच होता. धर्मोपदेशकाचं कोणतंच चिन्ह त्याच्या वेषात नव्हतं. त्याचा संपूर्ण देह पोलादी चिलखतानं झाकलेला होता. चिलखताचा रंग चमकदार पांढरा होता आणि त्यावरून सूर्यकिरणं चमकत परावर्तित होत होती. कमरेला म्यान केलेली तलवार लटकत होती, हातात चमकदार भाला होता; आणि पाठीला ढाल होती.

त्या वेषात तो अत्यंत रुबाबदार योद्धा दिसत होता.

''दारा, त्याचा इरादा काही नेक दिसत नाही.''

मधुर तक्रारीच्या स्वरात दाराच्या कानाशी पुटपुटला.

दारा मंदपणे हसला.

''आतापर्यंत दाराला आव्हान देणाऱ्या कोणत्या योद्ध्याचा इरादा नेक होता ? तरीही ते इतिहासजमा झाले. दारा बुलंद आजही त्याच शानदार बुलंदीनं वावरतोय ! आपला इरादा नेक असेल, तर आपल्यावर कोणीही मात करूच शकत नाही मधुर ! क्वचित कोणी मात केली असेलच, तर ती कायम क्षणभंगुर ठरली. खेळीचा तो अर्धा भागच ठरला. शेवट नेहमी आपल्या बाजूनंच झाला आहे.''

''पण ....

''तू काळजी करू नकोस मधुर. ज्या क्षणी मौलवी मला अन्यायानं हरवू पाहील, त्या क्षणी तू हालचाल करायला मोकळा आहेस. झालं तुझं समाधान ?''

मनावरचं दडपण एकदम नाहीसं झाल्यासारखा मधुर हसला.

आता काही काळजी नाही ! दगा होणार, असा नुसता संशय येऊ देत, या वेळी तर मौलवीची मान धडावेगळी झालेलीसुद्धा कळणार नाही कोणाला !

रथ धडधड करीत मैदानाच्या मध्यभागी येऊन उभा राहिला. मौलवी भेरीचा ठाकूर असल्यानं गावकरी मानवंदनेसाठी उठून उभे राहिले.

''घे !'' हात चोळत मधुर स्वत:शी बडबडला, ''शेवटची मानवंदना स्वीकार गावाकडून !''

त्याच वेळी मौलवी लोकांना खाली बसण्याची खूण करत होता. लोक बसले.

''लोक हो –'' संथ; पण दमदार आवाजात मौलवीने बोलायला सुरुवात केली...

''सामचे ठाकूर दारा 'बुलंद', यांना मी द्वंद्वाचं आव्हान दिलं आहे, हे तुम्हा सर्वांनाच माहीत आहे. या संदर्भात मी काही बोलू इच्छित नाही. मात्र

मी इतकं नक्की सांगतो ... हे द्वंद्व निर्णायक होईल ! कदाचित मी जिंकलो, तर दारा मरेल; आणि तो जिंकला, तर मी तुमच्यात नसेन ! म्हणून शेवटची विनंती...

''मी स्वभावानं कसाही असलो, माझ्या धर्मप्रेमामुळे माझ्यापासून कोणाला उपद्रव झाला असला; किंवा माझ्या चुकीमुळे गावाला त्रास भोगावा लागला असला, तरी... गावाशी मी कायम इमान राखलं. गावात सुधारणा करण्याकरता मी झिजलो.... हे लक्षात घेऊन माझ्या वाईट आठवणी विसरून जा; चांगल्या आठवणी तेवढ्या जपून ठेवा !

''आपला ठाकूर धर्मवेडा असला, तरी गावबुडवा नव्हता – एवढं जरी तुमच्या मनाला पटलं, तरी मी तुम्हा सर्वांचा कृतज्ञ राहीन. खुदा हाफिज !''

त्याच्या त्या छोट्याशाच; पण हृदयाला हात घालणाऱ्या भाषणानं आपला योग्य तो परिणाम साधला. गावाची सहानुभूती तात्पुरती का होईना, मौलवीच्या दिशेनं वळली. ज्यांचा त्याच्याशी जवळून संबंध आला होता, त्यांच्या नजरा पाणावल्या. दुवा मागण्यासाठी त्यांचे हात आकाशाच्या दिशेनं वळले.

त्याचा ढोंगीपणा दाराच्या बरोबर लक्षात आला होता. पण अत्यंत चलाखीनं त्याने डाव टाकला होता. द्वंद्वात मौलवी जिंकला, तर प्रश्नच नव्हता. दाराला मरायला हवं होतं. पण दारा जिंकला, तर गावकरी प्रक्षुब्ध होणार होते आणि एकदिलानं दारावर हल्ला करणार होते !

अर्थात, अशी दहा गावं या चार जणांनी थोपवली असती, ती गोष्ट वेगळी !

''लोक हो ....'' दाराने बोलायली सुरुवात केली...

''तुम्ही 'दारा बुलंद' हे नाव ऐकून आहात. त्या नावाची कीर्ती तुमच्यापर्यंत आलेली आहे. दारा बुलंद म्हणजे अनीती, अन्याय, असत्य, पिळवणूक, छळ, लूटमार, खून, दरोडे ... या सर्व प्रकारांचा कट्टर विरोधक !

त्यासाठी दाराने कैक वेळा आपल्या प्राणांची बाजी लावली आहे, कत्तली केल्या आहेत, लूटमारही केली आहे; पण...

"त्यातली कोणतीही घटना दारा बुलंदच्या स्वार्थाकरता घडलेली नाही. या दाराने टिपून अशीच माणसं मारली, जी मेली असता हजारो माणसं सुखानं जगू शकतील! हजारो माणसांच्या जीवनाचे, त्यांच्या धर्मश्रद्धांचे, त्याच्या आचार-विचारांचे निर्णय घेण्याचा अधिकार एका माणसाला का?

"तुमच्या गावातल्या भरतला गीता हा सर्वश्रेष्ठ धर्मग्रंथ वाटत होता. त्याच्यापुरती तरी ती भावना प्रामाणिकपणे खरी होती. आणि त्यापायी त्याला मात्र आपलं सर्वस्व गमवावं लागलं? हा सर-असर अन्याय आहे! आणि म्हणूनच दंड थोपटून मी तुमच्या मौलवीचं आव्हान स्वीकारलं आहे.

"धर्मावर भाषण देणं – कोणता धर्म श्रेष्ठ का कनिष्ठ, त्याचा निर्णय करणं – हे माझं काम नाही. पण एक गोष्ट मी धर्मगुरू नसूनही मला समजली आहे; आणि ती माझ्या आचरणात मी आणली आहे.

"प्रत्येक धर्म आपापल्या स्थानी श्रेष्ठ असतो. प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असतो; आणि तो असलाच पाहिजे! प्रत्येकाला धर्माचरणाचं स्वातंत्र्य हे मिळालंच पाहिजे! एखाद्या ख्रिश्चनाला पकडून, त्याला मारून-मुटकून, 'हिंदू धर्म सर्वश्रेष्ठ आहे,' असं कबूल करायला लावणं जितकं अन्यायकारक आहे, तितकंच, 'गीता हा माझा श्रेष्ठ धर्मग्रंथ आहे', या निष्ठेला चिकटून राहणाऱ्या भरतला मरण येणं अन्यायकारक आहे. आणि हे अवहेलनापूर्वक मरण... त्याच्या आई-बापाचा मृत्यू ... बहिणीची आत्महत्त्या .. ह्या सगळ्या घटनांना एक मौलवीच जबाबदार असावा, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे!

"माझी हे आव्हान स्वीकारण्यामागची भूमिका ही अशी आहे!"

आपलं बोलणं संपलं, हे दर्शविण्याकरिता दाराने मान लववली. मग तो मौलवीकडे वळला, तर तो दाराकडे आ वासून पाहत होता.

ऐ परवरदिगार! मी स्वत:ला इतके दिवस सर्वोत्कृष्ट उपदेशक समजत होतो. पण हा पठ्ठ्या तासभर असा बोलत राहिला, तर आपल्याला पार खलासच करून टाकेल की!

"तयार?"

"तयार? कोणत्या पद्धतीनं लढायचं?"

"तुला कोणतं शस्त्र हाताळता येतं?"

"कोणतंही?"

"तलवार?"

"चालेल!"

मौलवीने मंदपणे हसत टाळी वाजवली. त्याच्या एका सेवकाने त्याला ढाल-तलवार आणून दिली.

"तू हारलास, तर मरताना तुला 'इस्लाम सलामत रहेगा' असं म्हणावं लागेल."

"ते मी आत्ताही म्हणतो की! दुसऱ्याचा धर्म धोक्यात यावा, असं मला वाटण्याचं कारणच काय?"

दाराने आणखी एक मार्क मिळवला, हे लक्षात येताच मौलवीने तो नाद सोडून दिला.

"सरकार," सेवकाने नेमका भोचकपणा केला "ह्यालापण चिलखत द्यायचं का?"

मौलवी गडबडला.

"अँ? ... हाँ-हाँ-"

"असू दे मौलवी, असू दे!" दारा मोठ्यानं म्हणाला, "धर्म आणि अधर्म, न्याय आणि अन्याय हे युद्धपातळीवर तरी समान कधीच नसतात. अन्याय प्रबल असतो, तेव्हाच तर युद्ध होतं!"

मौलवीला अक्षरश: त्याच्या एक थोबाडीत द्यावीसं वाटत होतं.

हा सूव्वर की औलाद प्रत्येक संधीचा फायदा करून घेऊन आपल्याला खाली पाह्यला लावतोय!

''रहने दे सलीम! त्याची इच्छा नाही, तर त्याला चिलखत देऊ नकोस!''

तो चिडून म्हणाला.

मग दोघं समोरासमोर येऊन उभे राहिले.

बादल, शीतल आणि मधुर पांगले.

लोकांनी श्वास रोखून धरले.

युद्धाला सुरुवात होत होती.

मौलवीचा आवेश खरोखरच जबरदस्त होता. त्याची प्रत्येक हालचाल अत्यंत आक्रमक होती. हातातली तलवार बिजलीच्या गतीनं अष्ट दिशांनी तळपत होती,

आणि त्या मानानं दारा खूपच संथ होता. त्याचं धोरण बचावाचं होतं. अत्यंत विचारपूर्वक तो मौलवीचे वार आपल्या तलवारीवर तोलत होता. प्रसंगी, पिछेहाट स्वीकारत होता. त्यामुळे या तरुणाने मौलवीचं आव्हान का स्वीकारलं; आणि अख्ख्या राजस्थानने त्याला कशाकरता डोक्यावर घेऊन ठेवलं – असा प्रश्न बहुतेकांच्या मनात निर्माण केला होता.

बादल, मधुर आणि शीतलला मात्र दाराचं हे तंत्र चांगलं माहीत होतं.

आक्रमक हालचाली करून लोकांना दिपवण्याच्या हव्यासपायी मौलवी दमत होता.

दारा त्याला त्याच हेतूनं खेळवत होता.

अन् दाराची ती खेळी बऱ्याच वेळानं मौलवीच्या लक्षात आली. प्रति-हल्ल्याची संधी असूनही दाराने वार केला नव्हता आणि नुसती हूल देऊन त्याला मात्र चार वार करायला लावले होते.

ते लक्षात येताच मौलवीच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.

हा खेळवतोय ना? ठीक आहे. ह्याला प्रतिकाराची संधी द्यायची नाही. खेळवले जातोय, असं भासवत एकच वार असा करायचा, की त्या शरीर पार दोन भागांत विभागलं गेलं पाहिजे!

हा निर्णय पक्का होताच मौलवीने त्या दृष्टीनं हालचाल करायला सुरुवात केली. त्याच्या वारांमधलं बदलतं वजन दाराच्या अनुभवी तलवारीने ताबडतोब ओळखलं. त्या मागचा हेतूही स्पष्ट होता.

अन् दाराने अनपेक्षितपणे आपली चुणूक दाखवली.

इतका वेळ बचावाचं धोरण स्वीकारून असलेल्या दाराने एकदम आक्रमक पवित्रा धारण केला. मौलवीच्या चौपट वेगात दाराचे वार बरसायला लागले. बचाव करता-करता मौलवीच्या तोंडचं पाणी पळालं. वेग आणि आवेश थिटा पडायला लागला, तसं त्याचं धाबं दणाणलं.

या अल्ला-या खुदा!

अब मैं क्या करूँ?

अन् त्याच्या मनाच्या गाभ्यातच लपलेलं कपट उफाळून आलं. उजव्या हातानं दाराचे वार अडवत असतानाच त्याने सहज हालतोयसं दाखवत डावा हात उन्हात ॲड्जस्ट करून हालवायला सुरुवात केली.

चम्म्!

क्षणभर दाराच्या डोळ्यांवर लख्ख प्रकाश-रेषा चमकली.

अन् संधी साधून मौलवीची तलवार सपकन् फिरली!

प्रकाश चमकला, तेव्हाच पुढे काय होणार, हे ओळखून, दारा मागे उडी घेत खाली बसला; म्हणूनच वाचला!

सूंऽ करत तलवारीचं पातं हवा कापत पार झालं!

मूर्ख!

तो मधुर तिकडे तयारीत असेल वेड्या! असं काहीतरी करून तुझा

मौलवी डोळे फाडून त्या तरुणाकडे पाहायला लागला.
त्याला एकदम भरतचं बोलणं आठवलं. हाच काय तो ?
त्या विचारानं आदिल मौलवीच्या छातीत बारीकशी कळ येऊन गेली.
'मौलवी... तरुण थंड आवाजात म्हणाला,
'मला पकडणं हे एकट्या–दुकट्याचं काम नाही !
मी एकटा असताना देखील मला वीस–पंचवीस जणांची
टोळी ताब्यात घेऊ शकत नाही;
आणि माझ्या बरोबर तिघं असतील तर....'

अमोल
प्रकाशन